# अग्निकुंड

## संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक













लेखकः श्रीनिवास शारंगपाणी

a

# अग्निकुंड

## (संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक)

श्रीनिवास शारंगपाणी

**ई साहित्य प्रतिष्ठान**

# अग्निकुंड

लेखक:- **श्रीनिवास शारंगपाणी.**

७१४/१, नारायण पेठ, लक्ष्मी रोड,
बँक ऑफ इंडियासमोर,
पुणे-४११०३०
भ्रमणध्वनी: ९२२५६३६३५३
ईमेल: shrisharang@hotmail.com, shrisharang@gmail.com

मुखपृष्ठ – श्रीनिवास शारंगपाणी

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- १० एप्रिल २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्रीनिवास शारंगपाणी—साहित्यिक परिचय



**जन्म**: ३० ऑक्टोबर १९४९ रत्नागिरी येथे

**शिक्षण**: इंजिनियरिंग पदवी

**व्यवसाय:** वाहन उद्योगात संशोधन प्रभागात नोकरी व नंतर सल्लागार. पेटंटप्राप्त संशोधने व अनेक शोधनिबंध.

**लेखनप्रारंभ**: १९६६ मध्ये महाविद्यालयीन शिक्षणादरम्यान सुरुवात - स्वराज्य साप्ताहिकामध्ये कविता, वाङ्मयशोभा मासिकात लेख तसेच नवल मासिकामधून शास्त्रीय नवलकथा आणि गूढकथा.

**नियमित लेखन**: मराठी / इंग्रजीतून विज्ञान / विनोदी/ गूढ / सामाजिक कथा, कविता, गीते, कादंबऱ्या, नाटके इ. चे लेखन. रविवार दै. प्रभातच्या ‘रूपगंध’ पुरवणीत मार्च २०१९पासून २०२४पर्यंत सलग आणि नियमित स्तंभलेखन.

**प्रसिद्ध साहित्य**: सकाळ, साप्ताहिक सकाळ, केसरी, अमृत, मोहिनी आणि नवल यांसारख्या दर्जेदार अंकांतून लेख, कविता, कथा इ.

**कादंबऱ्या**: राजकीय रोमांचिका ‘षडयंत्र’ (१९९२, २०१९मध्ये पुनर्प्रकाशित); ‘इये स्वप्नांचिये नगरी’ (२००९, २०१८मध्ये पुनर्प्रकाशित); ‘Manipulations’ ही ‘षडयंत्र’ची स्वत:च अनुवादित इंग्रजी कादंबरी (अमेरिका / कॅनडा २००२); ‘Brahma’s Breath’ इंग्रजी विज्ञानकाल्पनिका (२०११); ‘Our Distant Cousins’ ही मंगळमोहिमेवरची भविष्यवेधी इंग्रजी विज्ञानकाल्पनिका (२०१३); याच इंग्रजी कादंबरीचे आश्लेषा महाजन यांनी केलेले मराठी रूपांतरण ‘अतिदूरचे बांधव’ २०१७मध्ये प्रसिद्ध; ‘Shining Darkness’ ही इंग्रजी कादंबरी २०२४मध्ये प्रसिद्ध.

**नाटके**: ‘Death of A Mad Mathematician’ हे विख्यात गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व अकाली मृत्यूवरचे इंग्रजी नाटक - स्वतंत्र थिएटर्सतर्फे हिंदी रूपांतरण २०१७मध्ये रंगमंचावर; मराठी रूपांतर आकाशवाणीवर प्रसारित; ‘प्रीतिसंभव’ हे मराठी संगीत नाटक, ‘काळे ढग-पांढरे ढग’ व ‘पॅलिंड्रोम’ ही सामाजिक नाटके ई-साहित्यद्वारा प्रकाशित. ‘काळे ढग-पांढरे ढग’ आणि ‘पॅलिंड्रोम’ ही नाटके नभोनाट्य स्वरूपात फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या FTII Radio ने प्रसारित केली.

**कथासंग्रह**: ‘विज्ञान-गूढकथा’ विज्ञान आणि गूढकथांचा संग्रह (२०११); ‘पॉलिकिलर्स व इतर विज्ञानकथा’ हा विज्ञानकथा संग्रह (२०१९) आणखी एक विज्ञान-गूढकथा संग्रह ‘अनागताच्या तळाशी’ प्रसिद्धीच्या मार्गावर.

**कवितासंग्रह**: शालेय कुमारांसाठी आश्लेषा महाजन यांनी लिहिलेल्या ७० मराठी कवितांचे इंग्रजी गेय कवितांमध्ये मी रूपांतर केले असून ते ‘School दुनिया’ या शीर्षकाखाली २०१३मध्ये प्रसिद्ध.

**गीते**: मी लिहिलेल्या ९ गीतांचा ‘ओठात धुंद मदिरा’ हा आल्बम. संगीतकार- शरद करमरकर गायक- रवींद्र साठे, सुवर्णा माटेगावकर आणि शरद करमरकर. ५ गीते आकाशवाणीकडून तसेच फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या FTII Radio द्वारा स्वीकृत.

**विशेष गौरव**: ‘षडयंत्र’ या कादंबरीचा साप्ताहिक सकाळच्या १९९२मध्ये प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट पुस्तकांच्या यादीत समावेश आणि सातारा साहित्य-संमेलनात उत्कृष्ट पुस्तक असा नामोल्लेख; ‘Brahma’s Breath’ कादंबरीसाठी सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. गोविंद स्वरूप यांची प्रशस्ती; ‘विळखा’ या कथेला पुणे-पोस्ट आयोजित कथा स्पर्धेमध्ये पारितोषिक.

**इतर उपक्रम**: सामान्यांसाठी उपयुक्त संशोधन आणि नवनिर्मिती, शास्त्रीय विषयांवर देश-विदेशातून व्याख्याने व सादरीकरणे. आकाशवाणीवर व इतरत्र अनेक भाषणे व कथाकथन.

श्रीनिवास शारंगपाणी यांची ही नाटके ई साहित्यतर्फ़े प्रकाशित झाली आहेत.

ती वाचण्यासाठी वरील कव्हरवर क्लिक करावे.









# अर्पणपत्रिका

कृतक स्वातंत्र्यसैनिकांच्या उपेक्षित
पत्नींना आदरपूर्वक समर्पित...

# मनोगत



‘अग्निकुंड’ हे नाटक लिहिण्याची प्रेरणा मला माझ्या आयुष्यात भेटलेल्या व्यक्तींनीच दिली. माझ्या वडिलांच्या ओळखीचे एक गृहस्थ मला लहानपणी खूप थोर वाटत कारण त्यांनी उच्चशिक्षित असूनही सरकारी नोकरी किंवा वकिलीचा व्यवसाय न करता शिक्षणक्षेत्राला वाहून घेतलं होतं. पण मी मोठा झाल्यावर त्यांनी केलेले अनेक कारनामे मला कळले आणि धक्काच बसला. अनेक तत्त्वहीन ‘उद्योग’ केलेला हा माणूस माझ्या मनातून लगेच उतरला. असेच एक दूरच्या नात्यातले गृहस्थ मोठ्या सरकारी पदावर होते परंतु ते आपल्या सामान्य जीवनात आणि निवृत्तीनंतर तर जास्तच, दुसऱ्याकडून सेवा घेण्यात धन्य मानत. एवढंच नव्हे तर बारीक-सारीक गोष्टींतही चिकित्सा करून दुसऱ्यांना कायम त्रास होईल आणि आपल्याला हवे ते साध्य करून घेण्यात ते वाकबगार होते. केवळ स्वातंत्र्यसैनिक म्हणवून घेण्यासाठी, सरकारी सवलतींचा लाभ घेण्यासाठी आणि ताम्रपट मिरवण्यासाठी धडपडणारे

तथाकथित स्वातंत्र्ययोद्धे मी बरेच पाहिले. अशा दांभिकतेवर प्रहार करावा असे तीव्रतेने वाटू लागले. अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपापले संसार वाऱ्यावर सोडून स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतला पण आधारहीन झालेल्या त्यांच्या स्त्रिया आणि मुले हे सगळे कसे जगत असतील याची त्यांना जराही काळजी नसावी? काही थोर स्वातंत्र्यसैनिक निश्चितच अपवाद आहेत कारण त्यांनी कुटुंबाची व्यवस्था पाहून मगच ते परागंदा झाले. माझ्या दृष्टीने वाऱ्यावर सोडलेला संसार कष्टाने आणि नेटाने करणाऱ्या स्त्रिया याच अधिक आदराला पात्र आहेत. हेच मी ‘अग्निकुंड’ मध्ये अधोरेखित केले आहे.

*श्रीनिवास शारंगपाणी*

पुणे—मार्च २०२५

# अग्निकुंड

(संपूर्ण स्वतंत्र सामाजिक नाटक)

**नाटकाचा काळ:** १९९०च्या आसपास

**पात्र-परिचय**

१. अप्पासाहेब: अप्पासाहेब लोंढे. स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक क्रांतीचे प्रणेते, जुन्या पिढीतील नेते—वय ७३—दात नसल्यानं बोबडं बोलतात
२. केतकी फडके: अप्पासाहेबांची नात पण लांबच्या नात्यातली
३. मनोहर फडके: केतकीचा नवरा
४. निखिल फडके: मनोहर-केतकीचा तरुण मुलगा
५. अर्पिता साने: निखिलची मैत्रीण-प्रेयसी
६. माईसाहेब: अप्पासाहेबांची पत्नी वय ६९
७. डीसीपी सुब्रह्मण्यम: मनोहरचे मित्र / पोलिस ऑफिसर
८. इन्स्पेक्टर वाघमारे: डीसीपी सुब्रह्मण्यमचा चमचा-चेला
९. सुदाम वायचळ: अप्पासाहेबांचा शिष्य—कार्यकर्ता
१०. नोनी: आदिवासी तरुणी
११. इशऱ्या: आदिवासी तरुण—नोनीचा प्रियकर

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

(स्थळ: उच्च-मध्यमवर्गातील घराचा दिवाणखाना. एका टोकाला आरामखुर्चीवर अप्पासाहेब पहुडले आहेत तर दुसऱ्या सोफ्यावर मनोहर एका खुर्चीवर बसून चहा पीत पेपर वाचत आहे.)

अप्पासाहेब: (चुळबुळत) कायपाशून जी पाठ धयय्येय् ती अगदी पिच्छा शोडत नाहीये…

मनोहर: (तिरस्काराने कटाक्ष टाकीत पुटपुटतो) काय हे नखरे. पाठ दुखत्येय्. आरामात लोळत असतात दिवसभर. यांचं ना सुख दुखतंय् दुसरं काही नाही. (मुद्दाम त्यांच्याकडे पाहून चहाचा घोट घेतो) वा: काय फक्कड झालाय चहा. मझा आला.

अप्पासाहेब: (काही क्षण मनोहरकडे आशाळभूतपणे पाहत) काय म्हणायात?

मनोहर: मी? हां हां. चहा छान झालाय् असं म्हणत होतो.

अप्पासाहेब: छया, छया. आम्ही चहा केव्हाच शोडला—शत्तय-एक वयषं झाली अशतील.

मनोहर: पण तुम्ही त्र्याहत्तर वर्षांचे आहात ना?

अप्पासाहेब: हो मग?

मनोहर: मग काय मग? म्हणजे तुम्ही तीन वर्षांचे असताना सोडलात का चहा?

अप्पासाहेब: अहो एखाद-दुशयं वयष इकडं-तिकडं. त्यात काय एवढं?

मनोहर: हं. म्हणजे तुम्ही चहा धरलात कधी? आणि सोडलात कधी? म्हणजे साधारणपणे एक वर्षाचे असताना चहा प्यायला लागला असाल आणि तिसऱ्या वर्षी सोडून दिला असाल—असंच ना?

अप्पासाहेब: हो. म्हंजे—म्हंजे मी तशा यहानच होतो पण वडीय, काका अशा आमच्या कुटुंबामधे शत्याग्यही मंडयींची शतत ऊठबश अशायची. तेव्हाच केव्हा तयी मीही शपथ घेतयी. चहा न घेण्याची.

मनोहर: पण दूध घेता ना?

अप्पासाहेब: हो, हो. आता बापूशायख्यांचे विचाय मनात युजय्यावय—

मनोहर: बापू कोण?

अप्पासाहेब: अहो अशं काय कयताय् जावईबापू…

मनोहर: पुन्हा बापू?

अप्पासाहेब: नाही म्हंजे 'ते' बापू म्हंजे महात्मा गांधी.

मनोहर: हां हां. बरं मग त्यांचं काय?

अप्पासाहेब: म्हंजे अगदी त्यांच्याशायखं शेयीचं दूध नाही जमत प्यायया—पण कुठयंही दूध चायतं आम्हाया.

मनोहर: (एकीकडे) आम्हाला? म्हणजे हे कोण राजे आहेत की काय? पण राजेलोकांपेक्षा यांचे लाड काही कमी नाहीयेत…

अप्पासाहेब: काय म्हणताय्?

मनोहर: काही नाही. शेळीचं दूध तब्येतीला फार छान नाही का?

अप्पासाहेब: हो हो तय. म्हणून तय विनोबांची आणि बापूंची तब्येत चांगयी याहियी—हायअपेष्टा शोशूनही.

मनोहर: आणि तुमचीही! तुम्ही काय कमी हालअपेष्टा सोसल्यायत का? (अप्पासाहेब लाजतात.)

अप्पासाहेब: हां. बापूजींच्या एका हाकेशयशी आम्ही श्वातंत्याशाठी—

मनोहर: (वाक्य पुरं करतो) धगधगत्या अग्निकुंडात उडी घेतली… आम्हाला ठाऊक आहे—चांगलंच पाठ आहे! (अप्पासाहेब ओशाळतात. तितक्यात केतकी एका ग्लासात दूध घेऊन येते.)

मनोहर: (केतकीकडे बोट दाखवून) तुमच्यासाठी बघा खास दूध घेऊन आल्येय् केतकी. (केतकीकडे वळून) केतकी, मी विचार करतोय् एक बकरी पाळण्याचा.

केतकी: बकरी? ती कशाला?

मनोहर: म्हणजे अप्पासाहेबांची आबाळ नको व्हायला. त्यांना विनोबा आणि बापूजींसारखं शेळीचं दूध प्यायला जमत नाही ना.

केतकी: काहीतरीच काय?

मनोहर: खरंच. आत्ता अप्पासाहेब म्हणत होते की शेळीचं दूध प्यायला जमत नाही म्हणून. ते जमवून देणं आपलं कर्तव्य नाही का?

अप्पासाहेब: कशाया, कशाया उगीच तुम्हाया त्याश?

मनोहर: (हलक्या आवाजात) आत्ता काय कमी त्रास देताय् का?

अप्पासाहेब: काय म्हणताय्?

मनोहर: मी म्हणतोय्—त्यात कसला त्रास?

केतकी: (मनोहरच्या बोलण्याकडे मान वेळावून दुर्लक्ष करीत) आता अप्पासाहेबांना भेटायला एकजण येणारेत हां तेव्हा त्यांना काहीबाही विचारत बसू नका हं. दूध पिऊन त्यांना आराम करू दे,

मनोहर: (पुटपुटतो) आरामच तर चाललाय् ना लेकाच्याचा गेले कित्येक दिवस. खायचं-प्यायचं, आराम करायचा अन् निरर्थक बडबड करायची… (अप्पासाहेब डोळे विस्फारून पाहत बसतात)

केतकी: काही म्हणालात का तुम्ही?

मनोहर: छे, छे. त्यांना खाऊन-पिऊन आराम करू दे असंच म्हणतोय् मी.

केतकी: माहित्येय्. तुमच्या डोळयांना कायकाय खुपतं ते. (अप्पासाहेबांकडे वळून) हां हे घ्या..

अप्पासाहेब: अग केतकी…

केतकी: काय अप्पा?

अप्पासाहेब: अग केतकी, ग्याशाऐवजी एखांद्या पितयी पेय्यातून किंवा भांड्यातून देतेश का?

केतकी: ठीकाय् अप्पा. (आत जायला निघते)

अप्पासाहेब: केतकी, आता आत चाययीच आहेश तय दुधात थोडं जायफय आणि वेयदोड्याची पूड टाकून आण. आणि हो, पितयी भांडं कय्हईचं आहे ना ते बघ हं.

मनोहर: (दुसरीकडे तोंड करून-हलकेच) आयला काय माजलाय् थेरडा? आणि कल्हई कशाला हव्ये दुधाच्या भांड्याला. हेच बेणं आमच्या डोक्याला कल्हई करणाराय् असं दिसतंय्. आणि काचेच्या ग्लासात दुधाचं काय विष होणारे का?

(अप्पासाहेब मनोहरकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहतात)

मनोहर: हे बघा आणखी डोहाळे. अरे भो*** फुकट मिळतंय् तर घे ना. उगीच का नखरे करतोयस? वेलदोडे काय, जायफळ काय? जे समोर येतंय् ते पी ना मुकाट्यानं—

(पुन्हा अप्पासाहेब मनोहरकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहतात. केतकी आत जाते. काही क्षण दोघे एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेनं पाहतात. मनोहरच्या चेहऱ्यावर तिरस्काराचा भाव आहे तर अप्पासाहेबांच्या चेहऱ्यावर “हा का असं तुटक

a

वागतोय्” असा भाव. केतकी पितळेचं भांडं घेऊन येते. अप्पासाहेब दूध घटाघटा पितात.)

अप्पासाहेब: नाई म्हंजे काचेच्या ग्याशापेक्षा पितयीच्या पेय्यामधी प्यायचेयं चांगयं.

मनोहर: (आपल्याशीच) हा असं घाईत पितोय् की जसं काही उद्या जगातलं दूध संपणारच आहे. बापूजी पितळेच्या पेल्यातून दूध पीत होते वाटतं?

(तितक्यात दारावरची बेल वाजते. मनोहर उठून दार उघडायला विंगेत जातो. “अप्पासाहेब हायेत का?” “काय काम आहे?” “त्यान्ला भेटायचंय्” असा संवाद ऐकू येतो व पाठोपाठ एक चाळिशीतील गावाकडचा गृहस्थ येतो.)

गृहस्थ: मी सुदाम वायचळ. ऱ्हानार कुळथवाडी, तालुका…

मनोहर: असू दे, असू दे. भूगोलाची उजळणी नको. अप्पासाहेबांचं आणि आपलं…

सुदाम: ते आमचे गुरू हायेत, मारगदरशक आहेत आणखीन्…

मनोहर: असू दे, असू दे. बसा इथं. (स्वगत) आता हा कुळथवाडीचा वायचळ काय वायफळ बडबड करणार ते ऐकावंच लागेल.

(सुदाम अप्पासाहेबांच्या पायावर डोकं ठेवतो. तितक्यात केतकी येते आणि कौतुकानं ते दृश्य पाहते.)

सुदाम: आप्पासायेब म्हंजी आमाला द्येवासारकेच हायेत. सोतंत्र्यासाटी त्यांनी…

मनोहर: (वाक्य पुरं करतो) धगधगत्या अग्निकुंडात उडी घेतली!

(अप्पासाहेब ओशाळतात. सुदाम चमकून मनोहरकडे पाहतो.)

केतकी: (मनोहरजवळ येते आणि म्हणते) पाहा, पाहा कसे दुरून लोकं येऊन अप्पांच्या पाया पडतात.

मनोहर: मग?

केतकी: आणि तुम्ही पहिल्यांदा भेट झाल्यावर पाया पडायला नकार दिलात.

मनोहर: पण मी नमस्कार केला होता की त्यांना तेव्हा...

केतकी: तो कसला दुरून आपलं कर्तव्य म्हणून.

मनोहर: हे बघ केतू, मी उगीचच उठल्या-सुटल्या कुणाच्याही पाया पडत नाही हे तुला माहित्येय्.

केतकी: तुम्ही मला केतू म्हणालात.

मनोहर: अग, ते प्रेमानं म्हटलं.

केतकी: हुंः. मला ठाउकेय्... मी एकदा या खोलीत येत असताना तुम्ही निखिलला काय म्हणालात ते.

मनोहर: काय म्हणालो मी निखिलला?

केतकी: (किंचितशी चिडून) हेच की. की अप्पा राहू आणि मी केतकी—केतू असे माझ्या कुंडलीतले ग्रह आहेत म्हणून.

मनोहर: अग मी म्हटलं होतं अप्पा राहू देत इथं तेवढंच केतूला—म्हणजे तुला बरं वाटेल.

केतकी: माहित्येय्, माहित्येय् तुम्हाला काय म्हणायचं होतं ते. पण तुम्ही अप्पांशी नीट वागत नाही.

मनोहर: म्हणजे?

केतकी: तु-तुम्ही त्यांची चेष्टा करता.

मनोहर: केतू—आय मीन केतकी—खरं सांगू? मला या असल्या दांभिक राष्ट्रभक्तांविषयी चीड आहे.

केतकी: तुम्ही कशावरून म्हणता की ते दांभिक आहेत म्हणून—त्यांच्या भक्तांकडे, हितचिंतकांकडे पाहा एकदा. सगळे किती मानतात त्यांना.

मनोहर: अग असे गुळाच्या ढेपेला स्वार्थी मुंगळे येऊन चिकटतातच.

केतकी: म्हणजे हे सगळं खोटं आहे?

मनोहर: अर्थात्.

केतकी: मला नाही वाटत तसं.

मनोहर: तुला एके दिवशी समजून चुकेल…

केतकी: पाहूच या.

(अप्पासाहेब दुरूनच केतकीला हाक मारतात)

अप्पासाहेब: केतकी, अगं केतकी…

केतकी: काय अप्पा?

अप्पासाहेब: हे शुदाम वायचय. हे आज इथंच याहतीय—मीच त्यांना तशं शांगितयंय्. उद्या-पयवा गावी पयत जातीय.

केतकी: ठीकाय् अप्पा.

मनोहर: (स्वगत) याचं काय जातंय्… हाच आहे आयत्या बिळावर नागोबा. आणि ही पण कशी लागलीच म्हणत्येय्—(वेडावून दाखवीत) ठीकाय्. आयला, हा अप्पा घराची धर्मशाळा करून टाकणार असं दिसतंय्.

# प्रवेश दुसरा

(निखिलची खोली—अस्ताव्यस्त. निखिल रेडिओ लावून गाणी ऐकत बसलाय्. केतकी येते आणि पसाऱ्याकडे पाहून संतापते.)

केतकी: अरे निखिल, काय हा पसारा? कुणी आवरायचा तो? (निखिल गाणी ऐकण्यात गुंग असल्यानं त्याला ऐकू जात नाही. केतकी ओरडते आणि पाठीत हलकासा धपाटा घालते,) निखिऽऽल…

निखिल: (कावून) काय?

केतकी: अरे (वेडावून) क्कॅय म्हणे क्कॅय. अरे कसं सगळं वाटेल तसं पडलंय्. जरा आवर ना खोली तुझी. (स्वत: आवरायला सुरुवात करते.)

निखिल: अग आई कश्शाला पण? राहू दे की. मी आवरीन एक्झॅम झाल्यावर.

केतकी: एक्झॅम झाल्यावर? आणि ही गाणी ऐकणं ही काय एक्झॅमची तयारी चाललीय् वाटतं…

निखिल: हे बघ आई तू मला उगीच पिडू नकोस. गाणी ऐकून अभ्यासाचा मूड तयार होतो.

(केतकी पुस्तकं नीट ठेवताना. पुस्तकातून एक फोटो खाली पडतो,)

केतकी: आणि हे पाहिल्यावर मूड आणखी चांगल्या प्रकारे तयार होत असेल नाही का?

(निखिल केतकीच्या हातातला फोटो हिसकावण्याचा प्रयत्न करतो)

केतकी: कोण आहे ही? चेहरा तर ओळखीचा वाटतोय्.

निखिल: आहे माझी एक मैत्रीण. ते जाऊ दे. (केतकी चेष्टेनं ओठ वाकडे करते पण निखिल फोटो तिच्या हातातून काढून घेतो.) तुला माझी खोली नीटनेटकी का करायचीय्?

केतकी: अरे ते अप्पांचे अनुयायी सुदाम आहेत ना ते आपल्याकडेच राहणारेत.

निखिल: मग?

केतकी: अरे असं काय करतोयस? ते दोघं आज रात्री इथं झोपतील.

निखिल: इथं?

केतकी: (ठासून सांगते) हो इथंच!

निखिल: आई, काय हे? कोण आहे हा माणूस? कोणीही उपटसुंभ...

केतकी: उपटसुंभ काय उपटसुंभ? अप्पांचे अनुयायी आहेत ते.

निखिल: हे बघ आई, मला हे अप्पा आणि त्यांचा तो गोतावळा अजिबात आवडत नाही.

केतकी: निखिल, ते तुझे आजोबा आहेत. ते मोठे समाजसेवक आणि देशभक्त आहेत. ते आजपासून तुझ्या खोलीत झोपतील. त्यांचा अनुयायी—सुदाम—बाहेरच्या गॅलरीत झोपेल. तुला काय अडचण आहे?

निखिल: हे कुठले आजोबा. माझे खरे आजोबा तर कधीच गेले. आणि इतके दिवस हे अप्पा ड्रॉइंग रूममधे झोपत होते ना? मग आत्ताच काय झालं?

केतकी: अरे त्यांना सोफ्यात झोपलं की त्रास होतो. त्यांना अशा कंफर्टची सवय नाही. त्यांना जमिनीवरच—म्हणजे पातळसं अंथरूण घालून किंवा जाडशी चादर घालून झोपल्यावरच चांगली झोप लागते.

निखिल: (खो खो हसतो) म्हणजे आम्हाला हिस्टरीमधे शिकवलंवतं की—की

केतकी: काय शिकवलवतं?

निखिल: की महाराणा प्रताप याला रानावनात राहायची एवढी सवय झाली होती की युद्ध जिंकून पुन्हा राजवाड्यात राहायला आला तर त्याला बिछान्यावर झोपच यायची नाही. मग तो जमिनीवर झोपायचा. या अप्पांचं तसंच दिसतंय्!!

केतकी: उगीच काहीतरी चहाटळपणानं बोलू नकोस. अरे तुझ्या खऱ्या आजोबांचेच चुलत-चुलत भाऊ आहेत अप्पासाहेब. आणि हे बघ उगीच फाजीलपणा करू नकोस. तुला ॲडजस्ट केलंच पाहिजे. आणि तू मला सांगितलं नाहीस—फोटोतली मुलगी कोण आहे ते?

निखिल: ती—ती अर्पिता आहे. माझ्या कॉलेजमधली. ज्युनियर आहे मला. आम्ही कॉलेजच्या गॅदरिंगमधे—

केतकी: हां, हां. तुला प्रॅक्टिसला का कशाला तरी बोलवायला एकदा आली होती तीच का ही?

निखिल: हो, हो. तीच. ती—ती…

केतकी: ती ती काय?

निखिल: ती—ती म-माझी ख-खास मैत्रीण आहे.

केतकी: जरा सांभाळून. खास मैत्रीण म्हणे. अरे, अभ्यासाकडे बघ तुझ्या. नाही तर मैत्रिणीच्या घोळात जाशील वाहावत.

निखिल: पण आई, मित्र असतातच ना तशी ही मैत्रीण.

केतकी: हे जर तुझ्या डॅडींना कळलं ना तर… तुला माहित्येय् ते काय म्हणतील?

निखिल: त्यांना कशाला सांगत्येयस? ते मला एक लांबलचक लेक्चर देतील. त्यांच्या वेळी ते कसं शिस्तीनं अभ्यास करायचे वगैरे वगैरे.

केतकी: मग काय करू ते सांग? खरं तर सांगायलाच पाहिजे.

निखिल: (केतकीकडे न पाहता) काय ग हे आई—काही नडलंय् का?

केतकी: मग काय करू? तू तर खोली आवरायला तयार नाहीस.

निखिल: असं काय करत्येयस ग आई?

केतकी: पण मग हे अप्पासाहेब आणि सुदाम वायचळ…

निखिल: आवरतो मी खोली, काही प्रॉब्लेम नाही.

केतकी: हां अस्सं. ठीक आहे. जरा नीट आवरून घे. ते इथं खाली झोपतील अंथरुणावर.

निखिल: ओ येस मॉम. तसं कशाला? मी झोपीन ना अंथरुणावर. त्यात काय? त्यांना झोपू दे आरामशीर कॉटवर.

केतकी: (स्मितहास्य करीत) अंहं. तू कॉटवरच झोपायचं. अप्पांना खाली गादीवरच झोप लागते. सांगितलं ना? वर्षानुवर्षं गावोगाव भटकत असल्यानं त्यांना जमिनीवरच झोपायला लागायचं. (जाते)

निखिल: आई ब्लॅकमेलिंग… काय करायचं? (हृदयावर हात ठेवीत) अप्पाके वास्ते कुछ समय दिलका कप्पा भूलना पडेगा और इस बदामके लिये सुदामको सहनाही पडेगा.

## प्रवेश तिसरा

(संध्याकाळची वेळ. मनोहर घाईघाईनं घरात प्रवेश करतो. कामावरून आल्यामुळे बूट, टाय काढू लागतो. केतकी दारातून तिथं येते.)

केतकी: दमलेला दिसताय्. चहा घेणार ना? आणते हं गरमागरम चहा… (परत आत जायला निघते)

मनोहर: अवश्य. व्हाय नॉट. अगदी थकून गेलोय् मी आज. चिरंजीव कुठायत?

केतकी: अहो, तो बाहेर जायला निघालाय्.

मनोहर: म्हणजे मी आत आणि तो बाहेर—छान! (केतकी नाक मुरडत आत जाते.)

(इतक्यात दारावरची बेल वाजते. मनोहर घाईघाईनं उठतो आणि दारापाशी जातो.)

मनोहर: आता नेमकं कोण आलं मी असा थकून-भागून आल्यावर? (दार उघडतो. युनिफॉर्ममधील डीसीपी सुब्रह्मण्यम आत येतात.) कोण आपण? आपल्याला कोण पाहिजे?

डीसीपी सुब्रह्मण्यम: आरे फाडके, यू हाव नाट्ट रिकनाइस्ड मी?

मनोहर: (आश्चर्यचकित होऊन आणि ओळख पटून) ओ माय गॉड—सुब्बु तू? अरे तुझा हा युनिफॉर्म. गॉगल यामध्ये मी तुला ओळखलाच नाही... सॉरी यार...

डीसीपी सुब्रह्मण्यम: धॅट्स आल रैट. आपन कीती दीवसांनी भेटलो न्ना! कसा हायेस?

मनोहर: आय ॲम ऑल राइट. तू इकडे कसा काय?

डीसीपी सुब्रह्मण्यम: आरे नांदुरबारहून बदली हून आलो. ऐ वाज ट्रान्स्फर्ड्ड अबौट थ्री वीक्स ऐगो. आन प्रमोशन. नौ ऐम डीसीपी. डेपुट्टी कामिश्नर आफ पुलिस. आत्ता तुला इथून आत शिरताना पाह्यला ऐंड ऐ डिसैडेड टु फालो यू. यू नो पुलिस हॅबिट्ट.

मनोहर: अरे काँग्रॅट्स. (हस्तांदोलन करतो) ओके. बस ना.

डीसीपी सुब्रह्मण्यम: थैंक यू. बसतो पण वण्ली फैव मिनट्स. अजून ड्यूटी संपली नाय माझी.

मनोहर: (हाक मारतो) केतकीऽऽ केतकी! (केतकी प्रवेश करते.)

a

केतकी: काय हो? (सुब्रह्मण्यमकडे लक्ष जाऊन घाबरत) अरे बापरे! काय झालं? काय प्रॉब्लेम आहे?

डीसीपी सुब्रह्मण्यम: आहो—काय पन प्राब्लेम नाय...

मनोहर: अग, हा सुब्रह्मण्यम. माझा कॉलेजचा मित्र—आयपीएस पास होऊन आता डीसीपी सुब्रह्मण्यम झालाय. आणि सुब्बु, धिस इज माय बेटर हाफ—केतकी.

केतकी: सॉरी हं. मी उगीचच...

डीसीपी सुब्रह्मण्यम: तसा काय नाय. वी काझ फीअर इण्ण जण्रल पब्लिक. बट वी आर आल्सो ह्यूमण...

(तितक्यात आतून निखिल येतो, क्षणभर थबकतो आणि दरवाज्याकडे जाऊ लागतो.)

मनोहर: अरे निखिल, हे पाहा डीसीपी सुब्रह्मण्यम, माझे कॉलेजमधले मित्र. सहजच भेटायला आलेत. सुब्बु, धिस इज माय सन—निखिल. इंजिनियरिंग कॉलेजला आहे.

निखिल: हॅलो, हाउ आर यू सर?

डीसीपी सुब्रह्मण्यम: आं हां—फार यू इट इज नाट्ट सार—इट्ट इझ सुब्बु अंकल. ऐ एम फाइन.

निखिल: सॉरी सर—सॉरी सुब्बु अंकल. आय हॅव टु गो—समबडी इज वेटिंग फॉर मी.

a

डीसीपी सुब्रह्मण्यम: ओके, ओके. नो प्राब्लेम. गो यहेड... आल्ल धि बेस्ट्ट!

(निखिल जातो.)

केतकी: मी चहा आणते हं—तयारच आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: नो, नो, नो. मिसिस केतकी. ऐ हैव टु गो नौ.

केतकी: असं कसं? तुम्ही पहिल्यांदाच आलायत?

डीसीपी सुब्रह्मण्यम: बट्ट ऐ व्हिल कम अगैण.

केतकी: अहो. दोनच मिनिटांत आणते. ह्यांच्यासाठी चहा केलाच आहे. अगदी दोनच मिनिटं.

डीसीपी सुब्रह्मण्यम: बट्ट धेन—काप्पी फार मी प्लीस...

केतकी: काय?

मनोहर: अग, कॉफी—कॉफी!

केतकी: हां, हां. (आत जाते. तेवढ्यात आतमधून मंद पावलांनी खुरडत खुरडत अप्पासाहेब येतात.)

मनोहर: या, या, या. (स्वगत) बरोब्बर नेमक्या याच वेळेला प्रकट झालात.

अप्पासाहेब: का-काय म्हणताय?

मनोहर: काही नाही, हे माझे मित्र सुब्रह्मण्यम आलेत. सुब्बु, हे—हे माझ्या मिसेसच्या रिलेशनमधले—लांबचे काका अप्पासाहेब. (अप्पासाहेब युनिफॉर्ममधील डीसीपी सुब्रह्मण्यम पाहून चरकतात.)

अप्पासाहेब: हां, हां. नमय्ते. तुमचं बोयणं चायू द्या. मी श्वातंत्यशैनिक आहे. बापूजींच्या हाकेशयशी मी आणि माझ्या अनुयायांनी…

मनोहर: …स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात उडी घेतली.

(अप्पासाहेब काहीसे चिडून मनोहरकडे पाहतात. पण डीसीपी सुब्रह्मण्यम एकदम उठून उभे राहतात.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: आर्रे फाडके, ऐ हैव सीन हिम समवैर बिफोर. ऐ क्याणाट रिकलेक्ट्ट...

अप्पासाहेब: (कावरे-बावरे होतात) तुम्ही बोयत बशा. मी जया आयाम कयतो. (उठून चालू लागतात.

डीसीपी सुब्रह्मण्यम: आप्पासाहेब, नाट्ट टु वर्री. यू टू क्याण्ण सिट्ट येंड टाक विध अस.

अप्पासाहेब: नको, नको. मया जया आयामाची गयज आहे. तुम्ही बशा.

(केतकी चहा आणि कॉफीचे कप घेऊन येते.)

केतकी: पाहा बाई, तुम्हाला आवडत्येय् की नाही ते.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (कॉफीचा एक घोट घेऊन) छान्न कीऽऽ… फस्सक्लास्स. ऐ व्हिल काम अगैन फार धिस कैंड आफ काप्पी… बट्ट धिस जंट्टलमण्ण—व्हेर डिड ऐ सी हिम (विचारात पडतो) बट्ट लेट्ट इट्ट गो. ऐ काण्ट्ट रिमेंबर. थैंक यू फार वंड्डरफुल्ल काप्पी. ऐ व्हिल कम अगैण.

केतकी: अवश्य. जरूर.

मनोहर: नक्की यायचंय् हं!

डीसीपी सुब्रह्मण्यम: ओक्के. ऐ व्हिल मुव्ह नौ. बाय! (जातो.)

## प्रवेश चौथा

(दिवाणखाना. मनोहर ऑफिसात जाण्याच्या घाईत आहे, निखिल प्रवेश करतो.)

निखिल: डॅडी, मला तुमच्याशी काही बोलायचंय्.

मनोहर: आत्ता? निखिल बेटा मी जरा घाईत आहे.

निखिल: तरी पण…

मनोहर: तरी पण? बरं बोल. पण लवकर. मी घाईत आहे. आधीच उशीर झालाय्. ही सगळी माणसं बाथरूम अडवून बसली ना?

निखिल: तेच ते…

मनोहर: अरे तेच ते काय?

निखिल: डॅडी, दोन पाहुणे आले तर तुम्ही केवढा गहजब करता…

मनोहर: दोन पाहुणे? अरे त्या अप्पाबरोबर माई आहेतच शिवाय काल त्यांचा शिष्य कोण सुदाम वायफळ—नव्हे वायचळ—तोही आलाय्.

निखिल: मग त्यात काय एवढं नुकसान झालंय् आपलं?

मनोहर: आणि काय रे निखिल, आजवर तू कधी घरातल्या गोष्टींबद्दल माझ्याशी बोलल्याचं आठवत नाही. मग आजच ही सुबुद्धी किंवा दुर्बुद्धी कशी काय सुचली तुला? मला वाटतंय् की तुझ्या तोंडातून तुझी आईच बोलत्येय्. (निखिल लाजतो)

निखिल: तसं नाही पण…

मनोहर: अरे हे पण काय? त्याऐवजी तू एक "पण" लाव.

निखिल: म्हणजे?

मनोहर: हां तुझ्या पिढीला नाही कळायचं ते. अरे “पण” म्हणजे तुझ्या भाषेत—एक चॅलेंज...

निखिल: ओ आय सी.

मनोहर: हे बघ, हा अप्पा आणि त्याचा सगळा संघर्षाचा इतिहास म्हणजे फ्रॉड आहे फ्रॉड!

निखिल: कशावरून?

मनोहर: अरे स्पष्ट दिसतंय् की. अरे हो पण तुम्हा लोकांना नाही दिसणार ते. यू आर ऑल कंडिशण्ड...

निखिल: डॅडी असं कसं म्हणता तुम्ही?

मनोहर: तुम्ही दोघं झापडं लावलेल्या जनावरांसारखं वागताय्. आज मला माझा आतला आवाज सांगतोय् की हा अप्पा बदमाष आहे म्हणून—पण एक दिवस मी ते सिद्ध करून दाखवीन. पण तुला काय सांगायचं होतं ते सांग. मला उशीर होतोय्.

निखिल: डॅडी, आमच्या कॉलेजचा कँप जाणारे म्हणून...

मनोहर: फीचे पैसे पाहिजेत होय ना?

निखिल: अं, हो.

मनोहर: अरे पण परीक्षा जवळ आल्येय ना?

निखिल: हो पण कँप परीक्षेनंतर आहे आणि फी आधीच भरायची आहे.

मनोहर: कोण कोण जाणारेत? आणि किती फी आहे?

निखिल: बरीच मुलं-मुली जाणार आहेत. फी तीनशे रुपये आहे.

मनोहर: मुली पण आहेत कँपला?

निखिल: हो—आमचं कॉलेज मुला-मुलींत भेदभाव नाही करत.

मनोहर: कधीपर्यंत भरायच्येय् फी?

निखिल: आहेत अजून तीन-चार दिवस…

मनोहर: बघू मग नंतर… (काहीतरी आठवल्यासारखं करून) हां एक काम करणार का?

निखिल: काय?

मनोहर: अरे काही नाही, हा डँबिस अप्पा फ्रॉड आहे हे सिद्ध करायला मला मदत करायची…

निखिल: डॅडी, का तुम्ही त्या अप्पांच्या मागं हात धुऊन लागलायत?

मनोहर: ते तुला नाही समजायचं. पण आहेस तयार?

निखिल: (पुटपुटतो) हे म्हणजे काही चॉइसच नाही—हॉब्सन्स चॉइस—इकडे आड आणि तिकडे विहीर…

मनोहर: काय?

निखिल: काही नाही—डन. (हात मिळवतो).

## प्रवेश पाचवा

(पुढच्या खोलीत केतकी, अप्पासाहेब, सुदाम आणि थोड्याशा दूर माईसाहेब बसल्या आहेत)

सुदाम: अप्पासायबांनी लई कष्ट घेतले—गाव सुदारन्यासाठी. तरुनपनातच झोकून दिलं स्वातंत्रसंग्रामाच्या लड्यात. कितीयेक वर्सं गावकऱ्यान्ला म्हायतीच न्हवतं आप्पासायेब खुटं हायेत ते.

अप्पासाहेब: अये शमाजकाय्यच ते. घयापाशून दूय याहावंच यागतं. अये, बापूजींच्या एका हाकेशयशी मी आणि माझ्या लोकांनी पुढचंमागचं

a

काही न बघता श्वातंत्याच्या धगधगत्या अग्निकुंडात उडी घेतयी. कशयं घय अन् कशयं काय?

सुदाम: तुम्ही येज्ञात तुमची आन तुमच्या शिश्यांची आव्हुतीच दिली म्हना की.

अप्पासाहेब: अये, ते दिवश वेगयेच होते. आम्ही शगये इतके भायावून गेयो होतो की बश्श. बयं तू शांग तुझी शेती कशी चायय्येय् ते.

सुदाम: चालल्येय्—आता ठीकच म्हनायचं की. पन गावाकडं पान्याची बोंब हाये ती तशीच हाये. पन पानी कसं वाचवायचं त्येची तुमी शिकवन द्याया पायजेल. मंग आमी प्रेत्न करू. तुमचं मार्गदर्शन आसंल तवाच कुटं काय हुइल. मागं नाय का तुमी आमच्या गावाशेजारच्या डोंगरावरच्या जांबुळवाडीमदी त्या आदिवाशी लोकान्ला चांगलं धान्याचं बेणं दिऊन कसं पिकवायचं ते शिकिवलंत? आता त्या लोकांनी समद्याचा बट्ट्याबोळ क्येला त्ये येगळं.

अप्पासाहेब: अरे शगयी बोटं काय शायखी अशतात का. त्यांना नशेय उमगयं.

केतकी: (डोळ्यात कौतुकाचा भाव) अप्पा, तुम्ही—तुम्ही आदिवासींमध्ये जागृती केलीत?

अप्पासाहेब: खूप वयषं झायी त्याया. काही आठवत नाही नीटशं.

सुदाम: पन मला आटिवतंय की समदं. तुमी ऱ्हायलावता तिथल्या मुलीला येका मुलानं नाय का फसवून पोटुशी क्येलीवती. तुमी येवढं त्या लोकान्साटी काम क्येलंत पन त्यो पोरगा तुमालाच बदनाम कराय निगाला…

अप्पासाहेब: मला काय नीट आठवत नाही. पण काही महिने त्या वाडीत याहून त्यांना खूप काय काय शिकवयं एवढं यक्षात आहे. (सभोवार नजर फिरवीत आणि केतकीच्या कौतुकाच्या नजरेला दाद देतात. माईसाहेब

मात्र नाक मुरडतात) पण शुदामा, आता कुठवय मी पुयणाय आहे? मी शांगितल्यापयमाणे कयत जा म्हंजे होईय शुधारणा.

केतकी: पण जा ना अप्पा त्यांच्या गावाला. त्यांना मदत पाहिजे तर.

(तेवढ्यात मनोहर येतो आणि जवळच एका खुर्चीवर बसतो)

मनोहर: हां जा ना त्यांच्या गावाला. त्यांना तुम्ही हवे आहात. काय? हो ना सुदामराव? आता समाजकार्याच्या धगधगत्या अग्निकुंडात (केतकी डोळे वटारते त्यासरशी जीभ चावून वाक्य अर्धवट सोडतात. अप्पासाहेब चमकून बघतात.)

सुदाम: (एकदम चमकून) हां हां. हो या ना—म्हंजी यायलाच पायजेल तुमी गावाला.

अप्पासाहेब: (गडबडून जात) अहो शगय्यांनाच मी पायजे. तिकडं आंध्यमध्ये पण बोयावतायत. अजून उत्तयेकडे बय्याच वयषात गेयो नाहीय्. काही दिवश इथं केतकीकडेच आयाम कयावा आणि मगच ठयवावं कुठं जायचं ते अशं म्हणतोय मी. पूय्वीशायखी ताकद याहियी नाहीय् आता.

सुदाम: आसं कसं. तुमी बी आमच्यासारक्यान्ला सोन्यासारखेच आहेत.

मनोहर: शिवाय… (थोडा पॉझ घेतो)

केतकी आणि सुदाम: (एकदम) शिवाय काय?

मनोहर: काही नाही. आधी स्वातंत्र्ययज्ञाच्या अग्निकुंडात—आणि नंतर सामाजिक जागृतीच्या अग्निकुंडात—हे सोनं अधिक शुद्ध होऊन तेजानं चमकू लागलंय् ना... (केतकीच्या चेहऱ्यावर चीड तर सुदाम आश्चर्यचकित)

अप्पासाहेब: शुदाम, खयं तय तुझा आग्यह मोडवत नाही पण तब्येतीया जपयं पाहिजे ना.

सुदाम: हा, त्ये बी खरंच.

मनोहर: (स्वगत) थेरड्याला काय भरल्येय् धाड. मस्त मजेत तर राह्यलाय…

(सुदाम, केतकी आणि अप्पासाहेब प्रश्नार्थक मुद्रेनं मनोहरकडे पाहतात)

अप्पासाहेब: काहीतयी बोययात का?

मनोहर: काही नाही. एक मंत्र पुटपुटतोय्…

अप्पासाहेब: अश्शं. कुठया हा मंत्य?

मनोहर: वंदे मातरम् असा मंत्र म्हणतोय्.

अप्पासाहेब: मग मोठ्यानं म्हणा की.

मनोहर: नको, तुम्हाला डिस्टर्ब व्हायला नको. (अप्पासाहेब खाली पाहू लागतात)

केतकी: अप्पा, तुम्हाला बरं वाटत नाहीये का?

अप्पासाहेब: नाही. तशं काय नाही. फक्त थोडा अशक्तपणा वाटतोय्.

केतकी: मग काही औषध वगैरे…

अप्पासाहेब: अं… अशं कय. तुझ्याकडे गुयकंद किंवा च्यवनप्याश अशं काही आहे का?

केतकी: हां, दोन्ही आहे.

अप्पासाहेब: मग अशं कय—जेवणाआधी दोन चमचे गुयकंद आणि च्यवनप्याश दोन्ही दे.

मनोहर: (हलकेच) आयला, म्हणजे म्हातारा जेवणार पण आहेच.

केतकी: आणि जेवायला मुगाची खिचडी आणि…

अप्पासाहेब: छे, छे, मी काय आजायी नाहीये. अशक्तपणा आयाय् इतकंच. जेवण नेहमीशायखंच अशू दे.

केतकी: बरं.

a

अप्पासाहेब: हां एक आठवयं.

केतकी: काय?

अप्पासाहेब: तू शिया छान कयतेश—तुपातया. ताकद यायया चांगया.

केतकी: इश्श. त्यात काय? करते ना.

अप्पासाहेब: आणि यात्यी झोपण्याआधी मया अशलं तर द्याक्षाशव दे. त्यानं झोप चांगयी यागते आणि पचनही शुधायतं. मया पूर्वी निद्रानाशाचा त्याश होत होता तेव्हा एका डॉक्टयांनी द्याक्षाशव घ्यायया शांगितयं होतं. शुदाम ते कोण ये डॉक्टय—आपण गावकय्यांशाठी शिबिय घेतयं होतं ते?

सुदाम: त्यो डाक्तर व्हय—निमगावकर—नाय, नाय. क्येडगावकर डाक्तर व्हता शिबिरामदी.

अप्पासाहेब: हां तेच. त्यांनी नियमितपणे घ्यायया शांगितयंय.

मनोहर: (स्वगत) हां, म्हणजे मजबूत जेवून झालं की मग दारू पिऊन मस्त ताणून द्यायची. अग्निकुंड—जठराग्निकुंड!

केतकी: पाहून ठेवते. नसलं तर निखिलला आणायला सांगते.

अप्पासाहेब: त्याया वेय नशेय तय शुदामया शांग आणायया.

केतकी: हो हो.

मनोहर: (स्वगत) आयला, आपलं करियर चुकलंच. या अप्पासारखं श-मा-ज-शे-व-क व्हायला हवं होतं. लोकांना कामाला लावायचं आणि आपण फुकटात बसून आरामात खायचं न् झोपायचं.

केतकी: अप्पा, उद्या आणि परवा आम्ही एका लग्नसमारंभाला जाणारोत. तेवढं सांभाळून घ्या.

अप्पासाहेब: हो, हो. त्यात काय शांभायून घ्यायचंय्. तुम्ही खुशाय जा.

# प्रवेश सहावा

(मनोहर दिवाणखान्यात बसलेला आहे. तितक्यात निखिल येतो.)

मनोहर: या, युवराज. कुठं गेला होतात?

निखिल: (कपाळावर आठ्या) आता उलट तपासणी…

मनोहर: अंहं. साधी चौकशी.

निखिल: मी—मी द्राक्षासव आणायला गेलो होतो—अप्पांसाठी. (हातातली पिशवी दाखवतो)

मनोहर: ओहो. मला वाटलं की अर्पिताकडे गेला होतास की काय.

निखिल: (दचकून) अर-अर्पिता-अर्पिता… तुम्हाला कशी माहीत?

मनोहर: हमारे जासूस…

निखिल: डॅडी!

मनोहर: ओके, ओके. अर्पिताचाच फोन आला होता.

निखिल: आँ!

मनोहर: म्हणजे तिनं नाव सांगितलं नाही पण…

निखिल: मग तुम्हाला कसं कळलं?

मनोहर: तिनं विचारलं की निखिल आहे का? मी नाही म्हटलं तर तिनं फोन ठेवून दिला.

निखिल: अरेच्या, मग तुम्हाला नाव कसं कळलं?

मनोहर: (हसून) ती फोन ठेवत असताना मागून कुणीतरी ‘ए अर्पिता’ अशी हाक मारलेली ऐकू आली आणि हिनं ‘आले’ असं उत्तर दिल्याचं अस्पष्ट ऐकू आलं.

निखिल: ओ आय सी…

मनोहर: (हसत) ही—ही अर्पिताही असेलच ना?

निखिल: असेलच ना? कुठे?

मनोहर: म्हणजे, तुझ्या त्या कँपला?

निखिल: अं. अं, हो हो आहे ना?

मनोहर: हं मला वाटलंच होतं.

निखिल: काय?

मनोहर: काही नाही. (स्वगत) याचा प्रॉब्लेम म्हणजे इकडे पिता आणि तिकडे अर्पिता!

निखिल: पण—पण ते..

मनोहर: हां, तुझ्या कँपसाठी पैसे द्यायचेत नाही का? (खिशातून पाकीट काढून ३०० रु. काढून देतो. निखिल आनंदाश्चर्यानं पाहत राहतो.)

निखिल: थँक यू डॅडी. (जायला लागतो)

मनोहर: (त्याला थांबवीत) एक मिनिट.

निखिल: काय डॅडी?

मनोहर: हे द्राक्षासव काय आहे हे तुला माहीत आहे का?

निखिल: नाही.

मनोहर: आण ती बाटली इकडे. (निखिल बाटली मनोहरच्या ताब्यात देतो. मनोहर बाटलीवरच्या लेबलचं निरीक्षण करतो) हे बघ इथं काय लिहिलंय् ते.

निखिल: अल्कोहोल कंटेंट: ५-१०%. वॉव... म्हणजे चक्क ड्रिंकच आहे की हे!

मनोहर: दॅट्स द पॉइंट. हा लेकाचा अप्पा द्राक्षासवाच्या नावाखाली चक्क दारू ढोसणारे.

निखिल: अरे बाप रे! म्हणजे तुम्ही म्हणताय् ते खरं दिसतंय्. ते खरेखुरे गांधीवादी असले तर असलं काही करणार नाहीत.

मनोहर: हे बघ, तू त्यांच्याच खोलीत झोपणार आहेस ना?

निखिल: हॅं:, ते माझ्या खोलीत झोपणारेत.

मनोहर: ओके. तेच ते. मग त्यांच्याकडे लक्ष ठेव मधून मधून. मला शंका आहे की हा अप्पा चांगलं मजबूत द्राक्षासव ढोसणारे…

निखिल: डन्. डॅडी, मला आता तुम्ही म्हणताय् ना त्यात तथ्य वाटायला लागलंय्.

मनोहर: कशात?

निखिल: हेच की अप्पासाहेब ढोंगी आहेत. ही सीम्स टु बी अ टोटल फ्रॉड…

## प्रवेश सातवा

(रात्रीची वेळ. पलंगावर निखिल झोपलाय्—म्हणजे झोपेचं सोंग घेऊन मधूनच खाली अंथरुणावर पडलेल्या अप्पासाहेबांवर लक्ष ठेवून आहे. बाल्कनीत झोपलेल्या सुदामची हालचालही दिसत आहे.)

अप्पासाहेब: (चुळबुळत) ही शिंची झोप काही नीट यागत नाही. अजून थोडं द्याक्षाशव घेतयं पायजे. (द्राक्षासवाची बाटलीच तोंडाला लावतो. निखिल अवाक् होऊन पाहतच राहतो—अर्थात् अप्पांच्या नकळत) च्यामायी. हे छानच आहे. मागय्या वेयेला त्या बाईनं दियेयं कशलं गुयचट होतं. हे मात्य छानच आहे. (आणखी एक घोट घेतो आणि पडून राहतो.)

निखिल: (स्वगत) हा माणूस चांगला बेवडाच दिसतोय्. आता काय काय करतोय् लक्ष ठेवलं पाहिजे. (थोड्या वेळानंतर)

अप्पासाहेब: आता एवढं घेतयं तरी झोप का यागत नाहीये… (अजून एक घोट घेतो) च्यामायी शंपयं वाटतं… आता काय कयायचं…

निखिल: (स्वगत) आयला यानं अख्खी बाटली संपवली वाटतं!

अप्पासाहेब: आता बाटयी शांडयी अशं शांगितयं पाहिजे शगयांना…

निखिल: (स्वगत) चांगलाच बिलंदर दिसतोय् की हा अप्पा!

(अप्पासाहेब चाचपडत भिंतीच्या कडेला ठेवलेलं तांब्या-भांडं घेतात आणि पाणी सांडून शेजारी पडलेल्या वर्तमानपत्रानं पुसतात. थोडा वेळ पडून राहतात.)

अप्पासाहेब: अजून झोप येत नाहीये. आता काय कयावं? माई बाजूच्या यूममधे एकटीच झोपय्येय नाही का… (हळूच उठतात आणि सावकाश पलीकडील खोलीत जातात. तिथे माईसाहेब कुशीवर झोपलेल्या आहेत. त्यांच्याशेजारी जाऊन झोपतात आणि त्यांच्याशी झोंबू लागतात. निखिल त्यांच्या पाठोपाठ ते काय करतायत हे पाहायला आवाज न करता जातो)

माईसाहेब: (ओरडतात) कोण आहे? हे काय करताय्? (अप्पासाहेब हातानं त्यांचं तोंड दाबून ठेवतात)

अप्पासाहेब: बोंबयू नका. मीच आहे अप्पा.

माईसाहेब: (दबक्या आवाजात) अहो, तुम्हाला काही लाज-लज्जा आहे की नाही? आपण कुणाच्या घरात आहोत नि काय करतोय् याचं काही भान? प्यालेला दिसताय्. नगरच्या करंदीकरांच्याकडे काय गोंधळ घातला होतात ते आहे ना लक्षात?

अप्पासाहेब: बोयू नका. नवयाच आहे ना मी तुमचा. शगये झोपयेत गाढ. थोडा वेळ इथं तुमच्याशेजायी…

माईसाहेब: अजिबात नाही. चालू लागा पाहू तुमच्या जागेवर. नाहीतर मीच उठून जाईन दुसरीकडे.

अप्पासाहेब: अगं पण जागे होतीय ना शगये.

माईसाहेब: होऊ देत. खूप काळ सहन केलेत मी तुमचे धंदे.

(अप्पासाहेब वरमतात आणि नरमतात आणि उठून मुकाट्यानं आपल्या जागेकडे झोपायला जाऊ लागतात. अचानक वाटेत उभ्या असलेल्या निखिलला त्यांचा धक्का लागतो)

निखिल: अप्पासाहेब, तुम्ही? काय करताय् इथं?

अप्पासाहेब: (गडबडून जात) काही नाही. बाथयूमला जायचं होतं…

निखिल: पण बाथरूम तर तिकडे आहे. (विरुद्ध दिशेला बोट दाखवतो)

अप्पासाहेब: होय का? अंधायात चुकयोच. शिवाय झोपेतून उठय्यामुये पण चुकयो अशेन. पण—पण तू इथं काय करतोयश?

निखिल: मला पण बाथरूमलाच जायचं होतं पण तुम्हाला इथं चाचपडताना पाहिलं म्हणून इकडे वळलो.

अप्पासाहेब: अश्शं का? बयं बयं. (जातात ते थेट झोपण्याच्या ठिकाणी म्हणजे निखिलच्या खोलीत जातात)

निखिल: (स्वतःशीच) अरे, यांना बाथरूमला जायचं होतं ना? मग परत झोपायला कसे गेले? अरे बच्चमजी माईसाहेबांशी लगट करायला गेलावता काय? द्राक्षासव ढोसून? (खोलीकडे जाऊ लागतो आणि हसतो) अरेच्या, मला पण बाथरूमलाच जायचं होतं नाही का? हा, हा, हा! (पलंगावर जाऊन झोपतो, तेवढ्यात गॅलरीत झोपलेल्या सुदामची

काहीतरी खुडबूड ऐकू येते) आता हा पंटर काही तरी उद्योगाला लागला का? (त्या दिशेनं पाहतो तर सुदाम उठून गाठोडं बांधून ठेवताना दिसतो.)

## प्रवेश आठवा

(अप्पासाहेब खुर्चीवर बसले आहेत आणि सतरंजीवर केतकी आणि सुदाम बसलेले आहेत. माईसाहेब दूरवर बसलेल्या आहेत)

केतकी: मग सुदामराव, व्यवस्थित झोप लागते ना?

सुदाम: मंग काय तर. आमी गावाकडली मान्सं. येकदा डोकं टेकलं की फाटंशिवाय जागच येनार नाय!

केतकी: चला हे ठीक झालं.

सुदाम: आता मातर मी निगनार. अप्पासायबांची भेट झाली आन् हुरूप आला. गावाकडं शेतीची कामं ऱ्हायल्येत्.

केतकी: पण राहा की अजून एक-दोन दिवस. तेवढंच अप्पांना बरं वाटेल.

सुदाम: नको, नको. गेलंच पायजे. कामं अडल्येयत.

केतकी: पण तुम्ही बस स्टँडपर्यंत कसे जाणार? आज रिक्षावाल्यांचा संप आहे.

सुदाम: जाईन मी कसा बी. येक गाठुडंच तर हाय माझ्याकडं. चालत बी जाऊ शकेन. आमाला गावाकडच्यान्ला सवय हाय त्येची.

अप्पासाहेब: जाऊ दे त्याया. त्याची बिचाय्याची कामं अडून ऱ्हायया नकोत.

केतकी: बरं बरं. मी निखिलला सांगते त्यांना सोडायला. पण अप्पा, तुम्हाला ठीक झोप लागली ना?

अप्पासाहेब: हां यागयी ना. चांगयी यागयी. पण—पण…

केतकी: (चिंतेनं) पण काय?

a

अप्पासाहेब: अग, ते द्याक्षाशव माझ्या हातून शांडयं. म्हंजे मी ते पुशून टाकयं यागयीच..

केतकी: इश्श. त्यात काय एवढं. आणू ना आपण पुन्हा…

अप्पासाहेब: पण तुझ्या उत्तम श्वैपाकामुये आणि या द्याक्षाशवामुये आता जया थोडी ताकत आय्याशायखी वाटत्येय्.

(मनोहर येतो आणि दुसऱ्या एका खुर्चीवर बसतो. अप्पासाहेबांच्या कपाळावर आठ्या.)

मनोहर: ताकदही आल्येय् आणि द्राक्षासवामुळे झोपही चांगली लागली ना?

अप्पासाहेब: (नाखुशीनं) हं…

केतकी: पण द्राक्षासव सांडलं ना. आता पुन्हा आणावं लागेल.

मनोहर: ये तो गजब हुवा. फिरसे आणेंगे—आपलं—लायेंगे! आत्ता तर मोठी बाटलीच आणू या.

केतकी: ती कशाला?

मनोहर: म्हणजे पुन्हा सांडलं तरी लागलीच आणायला नको.

अप्पासाहेब: म्हंजे मी काय पुन्हा शांडीन अशं वाटतंय् का तुम्हाया?

मनोहर: छे, छे. खरं तर मला हल्ली काहीच वाटेनासं झालंय्.

अप्पासाहेब: हे काय बयोबय नाही. मी काय मदत कयू शकतो का? म्हंजे माझा अभ्याश आहे अशा मानशिकतेचा.

मनोहर: नको, नको. तुम्ही मला अजिबात मदत करू नका.

अप्पासाहेब: का बयं अशं म्हणता?

मनोहर: तुम्ही मला अजिबात मदत करू नका म्हणजे मला आपोआप मदत होईल.

(अप्पासाहेब आणि केतकी आ वासून पाहतच राहतात. दुरून माईसाहेब मान डोलावतात. तितक्यात निखिल येतो. अप्पासाहेब दचकतात.)

निखिल: अरे वा, छान गप्पांचा फड रंगलाय् वाटतं.

मनोहर: अरे पण, तुला एक काम आलंय्.

निखिल: काय ते:

मनोहर: द्राक्षासवाची बाटली पुन्हा आणायची.

निखिल: हां, काल पहिली फुटली ना. (अप्पासाहेब पुन्हा दचकतात आणि कावरे-बावरे होऊन निखिलकडे पाहू लागतात)

मनोहर: अरे, तुला माहीत आहे वाटतं?

निखिल: डॅड, असं काय करताय्? ते माझ्या खोलीत झोपत नाहीत का? (अप्पासाहेब सुटकेचा निश्वास टाकतात)

मनोहर: हां, हां. खरंच की.

निखिल: पण ते जाऊ दे. मला आता फार वेळ नाहीय्. ती बाटली आणून टाकतो आणि मग अभ्यासाला लागतो. परीक्षा जवळ आलीय् ना…

अप्पासाहेब: अये पयीक्षेचं काय घेऊन बशयास? जीवनाची पयीक्षा ही जाश्त महत्वाची आहे.

निखिल: अहो, तत्त्वज्ञान म्हणून हे ठीक आहे पण मला चांगल्या मार्कांनी पास होऊन नोकरी धरली पाहिजे. तुमच्यासारखं समाजसेवेचं व्रत माझ्यासारख्याला जमणार नाही.

अप्पासाहेब: का बयं? तशं काही नाही. कुणीही झोकून दिलं की कयू शकतो.

मनोहर: हां, हे मात्र आपल्याला आवडलं?

अप्पासाहेब: म्हंजे?

मनोहर: हेच की झोकून देणं. ते—तुम्ही नाही का झोकून देता—म्हणजे समाजसेवेत म्हणतोय् मी! (अप्पासाहेब चमकतात पण सावरतात. मनोहर आणि निखिल हसू दाबतात. केतकी गोंधळते. माईसाहेब तोंडाला पदर लावतात.)

अप्पासाहेब: हां, हां. अश्शं होय!

निखिल: चला, बाबा. मला पैसे द्या. मी ती द्राक्षासवाची बाटली आणून टाकतो.

(निखिल आणि मनोहर जातात)

## प्रवेश नववा

(निखिल आणि मनोहर बोलत आहेत. मनोहर बसला आहे आणि निखिल उभा आहे.)

निखिल: हां, मग मी जातो अन् पटकन् घेऊन येतो. नंतर मला अभ्यासाला बसायचं आहे. या अप्पांचा त्रास फार झाला तर मी दुसरीकडे कुठं तरी जाऊन अभ्यास करीन.

मनोहर: हे अभ्यासाचं खूळ कसं काय तुझ्या डोक्यावर स्वार झालं?

निखिल: डॅडी. आता परीक्षा आली नाही का?

मनोहर: पण पूर्वी कधी…

निखिल: डॅड—चांगल्या मार्कांनी पास होऊन मला चांगली नोकरी धरली पाहिजे.

मनोहर: पण पूर्वी कधी तू असं म्हटल्याचं आठवत नाही.

निखिल: मला लक्षात आलंय् की नुसतं पास होऊन चालणार नाही. मार्क खरंच चांगले पाहिजेत. हल्ली काँपिटिशन किती वाढल्येय्.

a

मनोहर: मला वाटतंय् तुझं हृदयपरिवर्तन झालंय्. या अप्पानं तर तुझं हृदय परिवर्तन केलं नाही ना?

निखिल: हॅं:, काहीतरीच काय डॅडी. त्यांनी केलं असतं माझं परिवर्तन तर मी कुणाच्या तरी घरी जाऊन राह्यलो असतो—पॅरासाइट बनून! (खो खो हसतो. मनोहरही हसण्यात सामील होतो.)

मनोहर: ओहो. हृदयपरिवर्तन म्हणजे हृदयाशी संबंध आहे. मग इतर कुणी... (सूचक हसतो. निखिल काहीसा लाजतो.)

निखिल: काय हे डॅडी! हां, आणि तुम्हाला एक सांगायचं राह्यलंच.

मनोहर: ते काय?

निखिल: अहो काल रात्री अप्पा मधूनच तिथंच भिंतीशी माझ्या बेडखाली ठेवलेली द्राक्षासवाची बाटली काढून घुटके घेत होते. बरीचशी बाटली त्यांनी अशी संपवली वाटतं. कारण मी मधून मधून डोळे किलकिले करून पाहत होतो—त्यांच्या नकळत.

मनोहर: म्हणजे हा मला वाटत होतं तसा चांगला पोचलेला आहे.

निखिल: पोचलेला? म्हणजे?

मनोहर: असू दे. पण मग फुटली कशी ती बाटली?

निखिल: फुटली कसली? बाटली संपत आली मग सर्वांना शंका येईल म्हणून त्यांनी मुद्दाम पाडून फोडली. सांडलेलं पुसत होते वर्तमानपत्रानं.

मनोहर: अरेच्या.

निखिल: खरी गंमत तर पुढंच आहे.

मनोहर: आता ती काय?

निखिल: दारू—आपलं—द्राक्षासव पिऊन अप्पा रात्री कधीतरी उठले आणि जायला लागले.

मनोहर: कुठं?

निखिल: डॅडी, आपली ती छोटीशी रूम आहे ना?

मनोहर: हां म्हणजे माई झोपतात ती होय?

निखिल: बरोबर. मला काहीतरी कुजबुजण्याचा आवाज आला म्हणून मी कानोसा घेतला तर...

मनोहर: तर काय?

निखिल: अप्पा माईंवर जबरदस्ती करत होते. त्या म्हणत होत्या—*अहो, काही लाजबीज आहे की नाही? आपण दुसऱ्याच्या घरी आहोत.*

मनोहर: मग?

निखिल: मग काय? थोडी झोंबाझोंबी करून नाइलाजानं अप्पा परतले आणि झोपून गेले...

मनोहर: हां, म्हणजे झोकून मग झोपून गेले. आणि शिवाय... (दोघेही खो खो हसतात. तेवढ्यात केतकी तिथं येते. दोघंही तोंड दाबून ठेवतात.)

केतकी: का हसताय्? पण बापलेक एकत्र हसताना पाहून बरं वाटतंय्. (थोडं इकडे तिकडे पाहून काहीशा संशयानं) पण हे अप्पांच्याबद्दल नाहीये ना? कारण मला माहित्येय् की तुम्ही त्यांची चेष्टा करता म्हणून.

मनोहर: हम चेष्टा करनेकी चेष्टा नही कर सकते...

केतकी: अं?

निखिल: अग आई, हिंदीत चेष्टा म्हणजे प्रयत्न.

केतकी: मरू दे तुमचं नाटकी बोलणं. निखिल तुला एक काम आहे.

निखिल: द्राक्षासव ना?

केतकी: नाही, आणखी एक काम.

निखिल: ते कोणतं?

केतकी: अरे अप्पांचे अनुयायी सुदाम आहेत ना ते आज जायचेत परत—

मनोहर: थँक गॉड. (केतकी चिडून बघते)

केतकी: जरा इतरांचं ऐकाल का? का आपलंच म्हणणं पुढे रेटणारात नेहमीसारखं? (मनोहर दोन्ही पंजे पुढं करून ओके ओके असं दर्शवतो) हां तर निखिल, त्यांना बस स्टँडवर पोचवून यायचं. काय? बाइकवरून जा. त्यांच्याकडे काही सामान नाहीये फारसं. एक गाठोडंच आहे फक्त.

निखिल: (कावून) अग आई पण येताना ते रिक्षानं आलेवते ना? मग जाताना पण का नाही जात रिक्षानंच?

केतकी: अरे, आज रिक्षावाल्यांचा संप आहे. उगीच उशीर व्हायला नको त्यांना.

मनोहर: (मिष्किलपणे हसत) हां, हे मात्र खरं. त्यांना उशीर नको व्हायला. नाहीतर—(स्वगत) इथलाच मुक्काम वाढवायचे!

केतकी: (रागानं मनोहरकडे पाहते) तर निखिल, पाच मिनिटात ते तयार होतायत. त्यांना व्यवस्थित घेऊन जा बस स्टँडवर. काय? (जाते)

निखिल: च्या मारी (जीभ चावतो) काय कटकट आहे.

मनोहर: तू टाइम वाचवण्याकरता एक आयडिया कर. त्या पंटरला पोचवून येताना द्राक्षासव घेऊन ये म्हणजे एका फेरीतच होईल सगळं.

निखिल: हां, तसंच करतो.

(सुदाम एक गाठोडं घेऊन येतो. तो आणि निखिल बाहेर पडतात.)

# प्रवेश दहावा

(निखिल आणि मनोहर एका खोलीत बसले आहेत.)

निखिल: त्या सुदामला पोचवून आलो स्टँडवर आणि येताना ही द्राक्षासवाची बाटली घेऊन आलो. आता मी अभ्यासाला जातो. रात्री ते अप्पा काय उपद्व्याप करतायत ते पाहावं लागेल. नीट झोपू देतील की नाही माहीत नाही.

मनोहर: हो, हो. तू जा आता. तुला चांगले मार्क मिळवून मग करियर करायचंय् ना?

निखिल: येस. पण डॅड मी त्या सुदामकडून थोडीफार माहिती काढून घेतली.

मनोहर: ती काय?

निखिल: हेच की तो कुळथवाडी या गावात राहतो. नगर रोडवरून आत जावं लागतं. तिथं आणि नंतर वर डोंगरापलीकडे जांभुळवाडी म्हणून आदिवासी खेडं आहे. तिथं हे अप्पासाहेब बरीच वर्षं होते असं कळलं. अर्थात् हे देखील बऱ्याच वर्षांपूर्वी.

मनोहर: चांगलं डोकं चालवलंस की.

निखिल: भविष्यात उपयोगी पडेल असं वाटतंय्.

मनोहर: नक्कीच.

निखिल: पण सुदाम म्हणजे खरोखरीच सु-दाम आहे.

मनोहर: म्हणजे?

निखिल: अहो म्हणजे त्याच्याकडून माहिती काढून चांगल्यापैकी दाम मोजावे लागले—सु-दाम!

मनोहर: ते कसं काय?

a

निखिल: डॅड, गाडीला वेळ होता म्हणून तो म्हणाला कँटीनमध्ये बसू. मीही त्याला होय म्हटलं.

मनोहर: मग?

निखिल: म्हटलं माहिती काढून घ्यायला चांगला चान्स आहे. त्या डँबिस माणसानं चांगली डबल मिसळ हाणली आणि वर स्पेशल चहा ढोसला.

मनोहर: च्यायला. पंटर चांगलाच पोचलेला आहे की!

निखिल: शिवाय वाटेत चहा-पाण्याला म्हणून वीस रुपये मागून घेतले. म्हणाला—जवळचे पैसे संपले, पुन्हा आलो की परत करीन.

मनोहर: छान. म्हणजे सुदाम्याचा पुन्हा परत यायचा बेत दिसतोय्. या अप्पाला ना, लवकरच हाकलला पाहिजे. पण केतकीच्या प्रेमाचा गैरफायदा घेऊन इथं पाय घट्ट रोवून बसलाय्.

निखिल: आणि त्यांचे अनुयायी असे लुच्चे.

मनोहर: होय ना. पण आता खात्री पटली ना? नाहीतर मला म्हणत होतास की काय गहजब करता दोन पाहुणे घरात असले तर.

निखिल: तेव्हा वाटलं नव्हतं, डॅड की ही माणसं अशी बनेल असतील म्हणून.

मनोहर: हां, मग आता आपण या अप्पाला उघडा पाडायचा. ठरलं तर मग. (निखिल आणि मनोहर एकमेकांना हाय फाइव्ह देतात)

निखिल: आता मात्र जातो मी अभ्यासाला. या सुदामनं माझा भरपूर वेळ खाल्लाय्. (जातो)

मनोहर: निखिल एवढा अभ्यासासाठी सीरियस का झालाय्? काहीतरी गौडबंगाल आहे.

## प्रवेश अकरावा

(कॉलेजच्या एका जरा दूरवरच्या कट्ट्यावर निखिल आणि अर्पिता बसले आहेत.)

निखिल: अर्पू, मी आता झपाट्यानं अभ्यास करायला लागलोय्.

अर्पिता: काय सांगतोयस काय? कसला अभ्यास? लव्हॉलॉजीचा का?

निखिल: ए चेष्टा करू नकोस हं. बीएफएफनं—तंबी दिल्यावर काय करणार?

अर्पिता: (निखिलचा हात हातात घेत) अंहं. बीएफएफच्या डॅडनी फतवा काढलाय्.

निखिल: तेच ते. एकूण एकच!

अर्पिता: (दोन्ही हातांनी हवेत चौकोन काढीत) मला एक दृश्य दिसायला लागलं... कॅलेंडरची पानं फडफडून दोन वर्षं पुढची तारीख दाखवतायत. निखिल फडके चांगल्या मार्कांनी पास होऊन एका प्रसिद्ध कंपनीत इंजिनियर म्हणून कामाला लागलेत! पुन्हा कॅलेंडर पुढं जातंय्—आता ते एक्झिक्युटिव्ह चेअरवर बसलेत. इंटरकॉमवर सेक्रेटरीशी बोलतायत…

निखिल: पुरे, पुरे झाली हे चेष्टा. अर्पू, तू कधी तरी सीरियसली विचार करून बोल की. मला नुसत्या चांगल्या मार्कांनी नाही तर रँकमध्ये यायचंय्…

अर्पिता: (दोन्ही हात जोडून) बरं बाबा. रँक होल्डर निखिल फडके विल बी ॲन इंजिनियर इन अ बिग कंपनी…

निखिल: काय ग! पुन्हा तेच.

अर्पिता: (दोन्ही हातांचे पंजे पुढे करून) ओके. नाउ सीरियसली. काय करायचं आता?

निखिल: आपलं शिक्षण आणि पुढचं जीवन जर आपल्या प्लॅनप्रमाणे व्हायला हवं असेल तर—

अर्पिता: तर काय?

निखिल: तर आत्ता आपल्याला नाटक, म्युझिक असल्या आपल्या ॲक्टिव्हिटीज् कमी म्हणजे जवळ जवळ बंदच करायला लागतील.

अर्पिता: हं. पण खूप बोअर होईल नाही?

निखिल: पण तुझ्या डॅडनी जे सुनावलंय् त्याला जागून...

अर्पिता: जेव्हा आपल्या दोस्तीबद्दल त्यांना कळलं तेव्हाच त्यांनी मला खास त्यांच्या शैलीत सांगितलं की करियरकडे लक्ष द्यायला पाहिजे आणि त्यासाठी काही गोष्टी सोडाव्या लागतील.

निखिल: खास शैलीत म्हणजे कसं?

अर्पिता: (अभिनय करून दाखवते) हे बघ अर्पू. कुछ पानेके लिए कुछ खोना पडता है. तुला तुझी मैत्री—कोण तो तुझा—हूज द गाय—एका वेगळ्या लेव्हलला न्यायची असेल तर हे तुमचं हुंदडणं कमी करावं लागेल. ॲंड यू विल हॅव टु बी सीरियस अबाऊट युअर स्टडीज्. काय?

निखिल: आणि मी तुझा तो “गाय” आहे ना?

अर्पिता: हो—गरीब “गाय”! (दोघेही जोरात खो खो हसतात)

निखिल: पण आपण कॅंपला जाणार आहोत ना नक्की?

अर्पिता: हो. तो परीक्षेनंतर आहे ना, म्हणून मिळाली पर्मिशन.

निखिल: पण आपल्याला त्यात जरा बदल—

अर्पिता: (कपाळावर आठ्या) आता काय झालं? कुठं माशी शिंकत्येय्?

निखिल: (तिच्या कानात सांगतो) असं म्हणतोय् मी.

अर्पिता: अरे बाप रे. हे कसं काय शक्य आहे?

निखिल: अग अर्पू, तू अजिबात काळजी करू नकोस. ते आपले प्रोफेसर ताडफळे आहेत ना?

अर्पिता: त्यांचं काय? तेच तर कँप को-ऑर्डिनेटर आहेत.

निखिल: अग, त्यांचा मी फेव्हरिट स्टुडंट आहे.

अर्पिता: मग?

निखिल: मी त्यांच्याशी बोललो.

अर्पिता: काय म्हणाले ते?

निखिल: ते—ते—ही हॅज गिव्हन टॅसिट कन्सेंट…

अर्पिता: बघ हं, नाहीतर काहीतरी घोळ व्हायचा.

निखिल: हे बघ काही घोळ होणार नाही. यू ट्रस्ट मी नो?

अर्पिता: ऑफ कोर्स.

निखिल: मग झालं तर. चल उशीर होतोय्.

(हातात हात घालून जातात)

## प्रवेश बारावा

(मनोहर दिवाणखान्यात पेपर वाचत बसलेला आहे. बेल वाजते. मनोहर दरवाजा उघडतो.)

अर्पिता: मी अर्पिता—अर्पिता साने.

मनोहर: (गडबडून जातो) हां, हां. ये ना ये आत.

अर्पिता: (आत येते) तुम्ही निखिलचे डॅडी ना?

मनोहर: हो, हो.

अर्पिता: तशी मी मागे एकदा आले होते पण तेव्हा तुमची भेट झाली नव्हती.

a

मनोहर: इट्स ओके. तू बस ना. (सोफ्याकडे बोट दाखवतो. तिथलं वर्तमानपत्र, नॅपकिन इ. वस्तू घाईघाईनं उचलून ठेवतो. अर्पिता बसते.)

अर्पिता: खरं तर बसायला वेळ नाहीये. मी जरा घाईत आहे. निखिल आहे का?

मनोहर: हां बघतो हं. सकाळपासून मी बघितलाच नाहीये त्याला.

अर्पिता: असू दे. असू दे. मला एक कागद द्यायचा होता त्याला.

मनोहर: कागद?

अर्पिता: हां. म्हणजे त्याचं काय आहे. मी ज्या क्लासला जात होते ना— आमच्याच प्रोफेसरांचा क्लास आहे—तिथं पूर्वी निखिलही येत होता. हल्ली मात्र तो त्या क्लासला येत नाही. घरीच अभ्यास करतो वाटतं.

मनोहर: हो. मला वाटतं गेल्या टर्मपासूनच त्यानं क्लास बंद केलाय्. तो म्हणतो, त्यापेक्षा घरीच चांगला अभ्यास होऊ शकतो. आय ॲक्चुअली वेलकम इट्.

अर्पिता: (गोरीमोरी होते) मलाही तसं आवडलं असतं पण आमची जागा खूप लहान आहे आणि लहान बहीण-भाऊ त्रास देतात. त्यामुळे मला नाइलाजानं—

मनोहर: नाही, नाही. बरोबर आहे तुझं. मी आपलं माझं मत सांगितलं.

अर्पिता: तर माझ्या क्लासमधे निखिलच्या—म्हणजे सीनियर बॅचला माझी एक मैत्रीण जाते. तिच्याकडून मला एक्झॅममधे अपेक्षित प्रश्नांची आणि टॉपिक्सची लिस्ट मिळालीय्. मला वाटतं निखिलला या लिस्टचा उपयोग होईल. म्हणून मी ती त्याला द्यायला आणलीये.

मनोहर: ओके. (उठतो) बघतो हं आहे का तो.

अर्पिता: (उठते) असू दे. असू दे. मी निघते. तुम्ही ही लिस्ट त्याला दिलीत तरी चालेल. (कागद पुढे करते)

a

मनोहर: अग, थांब जरा. पाच मिनिटांनी काही बिघडत नाहीय्. कोर्टाची तारीख आहे का? (दोघेही हसतात)

अर्पिता: ओके. (मनोहर आत जातो. आतून केतकी आणि अप्पासाहेबांचा बोलण्याचा आवाज ऐकू येतो. काही वेळानं केतकी येते. अर्पिताला पाहून किंचित् दचकते.)

केतकी: अर्पिता ना तू?

अर्पिता: नातू नाही साने…

केतकी: (हसत) अग तसं नाही ग. अर्पिता ना—तू? असं मला विचारायचं होतं.

अर्पिता: (हसत हसत) ओ हो. असं होय. हो, हो मीच अर्पिता.

केतकी: तू मागे एकदा आली होतीस ना?

अर्पिता: अं, हो. गॅदरिंगमधल्या एका कार्यक्रमाची आयत्या वेळेला तालीम ठरली तेव्हा निरोप द्यायला आले होते. मी आणि निखिल त्या कार्यक्रमात होतो. तुमचा फोन तेव्हा…

केतकी: हो, हो. आमचा फोन तेव्हा कित्येक दिवस चालूच नव्हता. कंप्लेंट करून थकलो आम्ही. शेवटी अक्षरश: नशिबानंच आपोआप चालू झाला.

(मनोहर आणि मागोमाग डोळे चोळत निखिल येतात.)

अर्पिता: (उठून उभी राहत) अरे, निखिल, काय झालं?

निखिल: अर्पिता, तू?

अर्पिता: हो. परीक्षेत एक्सपेक्टेड प्रश्न कुठले येणारेत त्याची यादी सीनियर क्लासमधे दिली ती मी तुझ्यासाठी आणल्येय्. (निखिलच्या हातात कागद देते)

निखिल: (अजून डोळे चोळत) वा, वा…

अर्पिता: काय झालंय्? तुला बरं नाहीये का?

मनोहर: छे, छे. तो रात्री जागून अभ्यास करतो ना मग उशिरा उठतो. त्याचं सगळं टाइमटेबलच बदललंय् हल्ली.

अर्पिता: ओहो.

मनोहर: (निखिलकडे वळून) अरे तिला 'थँक यू' तरी म्हणशील की नाही?

निखिल: थँक यू.

अर्पिता: नो प्लीज. मी ही लिस्ट तुला उपयोगी पडेल असं वाटलं म्हणून दिली तुला.

मनोहर: (केतकीकडे वळून) अग, हिच्यासाठी काही चहा, सरबत वगैरे…

केतकी: (काहीशा नाखुशीनं) हं, हो आणते ना? काय ग अर्पिता, काय घेशील तू? चहा की सरबत?

अर्पिता: अहो काही नको. मी जरा घाईत आहे. पुन्हा कधी तरी.

केतकी: बरं बरं. (अर्पिता निघते)

## प्रवेश तेरावा

(सकाळची वेळ. मनोहर सोफ्यावर पेपर वाचत बसला आहे. केतकी ओरडत येते)

केतकी: (चिंतातुर आणि रडक्या चेहऱ्यानं) अहो, अहो. माझे दागिने मी मधल्या खोलीतल्या कपाटातल्या चोरकप्प्यात ठेवले होते. नंतर आपण ते पुन्हा लॉकरमधे ठेवणार होतो ना? आता ते तिथं नाहीयेत.

मनोहर: आँ? अग तू लग्नसमारंभावरून आल्यावर नीट ठेवीन म्हणाली होतीस ना? मग सावकाश लॉकरमधे ठेवायचं असं ठरलं होतं.

केतकी: अहो ऐकता का जरा माझं नीट?

मनोहर: हां, सांग.

केतकी: आपण लॉकरमधून बरेच दागिने काढून आणले होते. बरोबर?

मनोहर: बरोबर.

केतकी: मग तुम्हीच म्हणालात ना की इतके सगळे घालणार आहेस का? तुझं स्वतःचं लग्न आहे का? बरोबर?

मनोहर: बरोबर.

केतकी: मग त्यावर मी काय म्हणाले?

मनोहर: काय म्हणालीस बुवा?

केतकी: अहो असं काय करताय्? मी म्हणाले की आयत्या वेळेला त्यातले कुठले घालायचे ते ठरवीन. मी काही सगळे घालणार नाहीये. चॉइस करायला म्हणून जास्तीचे आणलेत. आणि लग्नाच्या दिवशी फक्त तीनच जिन्नस अंगावर घातलेवते.

मनोहर: मग?

केतकी: (हुंदके देत) बाकी सगळे जिन्नस कपाटाच्या चोरकप्प्यात ठेवलेवते. आज मी मी लग्नात घातलेले दागिने सुटकेसमधून काढून तिथंच ठेवायला गेले. अन् बघते तर काय? तिथले दागिने आणि साताठ हजाराची कॅश हे दोन्ही नाहीसे झालेत... (रडू लागते)

मनोहर: अरे बापरे! पण हे बघ, रडू नकोस. रडून काय होणारे? बघू आपण काय करायचं ते. पण तू नक्की सगळे दागिने आणि कॅश तिथंच ठेवली होतीस ना? का वेंधळेपणानं चुकून दुसरीकडेच कुठंतरी ठेवलीस ते पाहावं लागेल.

a

केतकी: (हमसून हमसून रडत) नाही हो. नीटच ठेवले होते दागिने. आणि कॅशला तर हातच लावला नव्हता. मला आतापर्यंत मिळालेली भाऊबीजेची आणि इतर रक्कम तिथं ठेवली होती हो. गेलं सगळं! दागिनेही गेले. काय करू मी आता? (जोरात रडू लागते)

मनोहर: बरं पण तू कशा रीतीनं दागिने ठेवलेस आणि काढलेस ते जरा व्यवस्थित सांग.

केतकी: दागिने लॉकरमधून इथं आणल्यावर व्यवस्थित कपाटातल्या चोरकप्प्यात ठेवले, कपाटाला कुलूप लावलं आणि किल्ली टेबलाच्या खणात ठेवून दिली. तुम्ही ऑफिसला जाल तेव्हा बँकेत जाऊन लॉकरमध्ये ठेवून द्यावेत अशा विचारानं कपाट उघडून बघते तर काय? दागिने नाहीत. अन् कॅशही नाही. सगळंच नाहीसं झालेलं दिसतंय्. आता काय करायचं (स्फुंदू लागते)

मनोहर: हं. बघू ना काय करायचं ते. पण तू रडू नकोस बघू.

(तेवढ्यात अप्पासाहेब तिथं येतात.)

अप्पासाहेब: काय ग केतकी, ओयडयीश का आणि यडत्येयश का अशी? काय झायं?

केतकी: काय सांगू तुम्हाला अप्पा? (परत रडू लागते. अप्पासाहेब तिच्या पाठीवरून हात फिरवतात)

अप्पासाहेब: यडू नकोश अशी. काय झायं यडायया ते शांगशीय की नाही?

मनोहर: (तिथून दूर जातात, स्वतःशीच) आता या मानभावी माणसाला सांगावं लागणारे. (अप्पासाहेबांच्या जवळ जाऊन उघड) अहो, तिचे दागिने आणि कॅश चोरीला गेल्येय् कपाटातून.

अप्पासाहेब: अये बापये. हे तय भयंकयच झायं. पण अशं कशं झायं? (केतकी अजून रडतेच आहे)

मनोहर: अहो मधे आम्ही लग्नाला गेलो होतो की नाही? तिथं तिनं जे दागिने घातले होते ते पुन्हा कपाटात ठेवायला गेली. तिथंच तिनं कॅशही ठेवली होती. दागिने आणि कॅश दोन्ही गेलंय्.

अप्पासाहेब: हे अवघडच होऊन बशयंय्. आता काय कयणाय?

मनोहर: तेच तर आम्हाला कळत नाहीये. पण मला एक सांगा. ज्या दोन दिवस—म्हणजे ॲक्चुअली—आदल्या दिवसाच्या संध्याकाळपासून दुसरे दिवशी संध्याकाळपर्यंत—आम्ही इथं नव्हतो तेव्हा कुणी इथं आलं होतं का? किंवा काही संशयास्पद असं घडलं होतं का?

अप्पासाहेब: (काही क्षण विचार करून) आं काय बयं झायं होतं त्या दिवशी? हां, एक जण दुपायी आया होता. प्लंबय आहे म्हणाया आणि श्वैपाकघयातया नय दुयुश्त कयायशाठी म्याडमनी बोयावयंय् अशं शांगत होता. तो श्वैपाकघयात होता काही वेय पण आमचं फाय काय त्याच्यावय यक्ष नव्हतं. कदाचित् आमचं यक्ष चुकवून त्या कपाटाच्या खोयीत गेया अशया तय काही कय्पना नाही.

केतकी: (अचंबित होऊन) पण-पण मी कुणाला—प्लंबरला वगैरे बोलावलंच नव्हतं. (मनोहरकडे वळून) असलं काही काम असलं की मी तुम्हालाच कामगाराला बोलवायला सांगते.

मनोहर: हं. गुंतागुंतीचं दिसतंय् हे प्रकरण.

अप्पासाहेब: मया वाटतंय् की कुणीतयी नीट पायत ठेवूनच ही चोयी केयीय अशणाय. याशिवाय तुमची ती मोयकयीण—ती पण दुशया दिवशी जया जाश्तच वेय काम कयत होती. तेव्हा ती शुद्धा अशू शकेय…

केतकी: अहो अप्पा, पण आमची सखू खूप विश्वासातली आहे. गेली पंधरा वर्षं आमच्याकडे काम करत्येय् ती.

अप्पासाहेब: हां, हां. मया आपयं वाटयं ते मी शांगितयं.

मनोहर: (एकीकडे) हा अप्पा दोन-दोन संशयितांबद्दल का बोलतोय्? मला तर याचाच संशय येतोय्. पण कसं पुढं जावं?

अप्पासाहेब: (मनोहरकडे वळून) काही म्हणायात का?

मनोहर: हां. आता पुढं काय करावं असं म्हणत होतो.

अप्पासाहेब: काही नाही. त्या मोयकयणीया विचायून बघा. त्या प्लंबयचा तय थांग यागेय अशं वाटत नाही.

मनोहर: (थोडा वेळ विचार करून) मला वाटतं पोलिसात तक्रार द्यावी. बघू या ते काही करतात का ते?

अप्पासाहेब: (चमकतात) ते कशाया? ते काय कयू शकणाय आहेत? उगीच चायचौघात आपयंच हशू…

मनोहर: त्यात काय प्रॉब्लेम? तक्रार द्यायला काय हरकत आहे? नाहीतरी दागिने-पैसे गेलेच आहेत. आपला एक प्रयत्न.

केतकी: हां मला वाटतं पोलिसात तक्रार द्यायलाच पाहिजे. माझी सगळी ठेव… (पुन्हा रडू लागते)

मनोहर: केतू, तू काळजी करू नकोस. अग माझा मित्र डीसीपी सुब्रह्मण्यम आहे ना? त्यालाच फोन करतो. तो लावेल छडा प्रकरणाचा.

अप्पासाहेब: (एकदम लटपटून) मया वाटतं त्याचा काही उपयोग होणाय नाही.

मनोहर: (स्वगत) मला आणखीनच शंका येऊ लागल्येय्. (उघड) पण मी तक्रार देऊन तर बघतो.

# प्रवेश चौदावा

(मनोहर आणि पोलिस इन्स्पेक्टर वाघमारे येतात)

इ. वाघमारे: काय साहेब, किती घाई करता? आमच्या सायबालाच फोन केलात—अर्जंट तपास करा म्हणून. त्यांनी मला कामाला लावलं. आम्ही सावकाश येऊन चौकशी करून गेलो असतो की. पण तुम्हा लोकांना इतकी घाई झालेली असते की तुम्हाला वाटतं—लवकर चौकशी केली की गुन्हेगारही तितक्याच लवकर पकडला जाईल.

मनोहर: तसं नाही वाघमारे साहेब. घरातल्या चीजवस्तूची चोरी होणं म्हणजे— म्हणजे...

इ. वाघमारे: म्हणजे काय?

मनोहर: म्हणजे जरा सीरियसच नाही का?

इ. वाघमारे: अहो, आमच्याकडे दिवसाला डझनानं अशा केसेस येत असतात. तुम्ही लोक नीट दक्षता घेत नाही आपल्या मौल्यवान् वस्तूंची.

मनोहर: हं बरोबर आहे पण जरा बघता का?

इ. वाघमारे: (काहीशी करडी नजर टाकून) हं, हं. बघू या. कुठं झाली चोरी?

(मनोहर त्यांना काही काळ आतल्या खोलीत घेऊन जातो. तेवढ्यात अप्पासाहेब प्रवेशतात आणि उगीचच इकडे-तिकडे करतात.)

अप्पासाहेब: हे कशाया पोयीश-बियीश यफडं घयात आणयंय्? उगीच नशतं झेंगट...

(मनोहर आणि इ. वाघमारे येतात. अप्पासाहेब कोपऱ्यात आहेत त्यामुळे मनोहर व इ. वाघमारे यांचं त्यांच्याकडे लक्ष जात नाही.)

इ. वाघमारे: हां तर त्या कपाटातून जिन्नस गेले. आता असं करा—गेलेल्या वस्तूंची लिस्ट करा, त्यांची अदमासे किंमत द्या आणि आमच्याकडे पाठवून द्या.

मनोहर: हां, हां. पण आता…

इ. वाघमारे: आता काय झालं? तुम्ही लोक ना गेलेल्या वस्तूंची नीट मोजदाद पण करू शकत नाही. परवा पेठेमध्ये एका घरी अशीच चोरी झाली आणि पंधरा दिवस चोरी झाली याचाच त्या कुटुंबाला पत्ता नव्हता आणि किती किंमतीचा ऐवज गेला तेही नीट सांगता येईना.

मनोहर: नाही तसं काही नाही आमच्या बाबतीत. आम्हाला माहीत आहे काय काय गेलं ते. फक्त आजच्या दिवसाला किती किंमत होईल त्या जिनसांची ते मात्र पाहावं लागेल. पण मी तुम्हाला हवी तशी यादी पाठवून देतो.

इ. वाघमारे: अहो आम्हाला हवी तशी नाही. हे सगळं तुमच्याचसाठी चाललंय्. बरं ते असू द्या. तुमचा कुणावर वहीम आहे?

मनोहर: वहीम?

इ. वाघमारे: वहीम—संशय…

अप्पासाहेब: (हे अजून पाठमोरेच आहेत) शंशय तय मोयकयीण आणि प्लंबय यांच्यावय आहे…

इ. वाघमारे: हे कोण? घरातले जुने नोकर दिसतायत. (मनोहर फिसकन हसतो. अप्पासाहेब वळतात व इ. वाघमाऱ्यांना दृग्गोचर होतात. इ. वाघमारे त्यांना नीट निरखून पाहतात.)

अप्पासाहेब: मी नोकय नाही…

इ. वाघमारे: ओहो! अप्पासाहेब! सॉरी. मी तुम्हाला ओळखलंच नाही. (वाकून नमस्कार करतात)

अप्पासाहेब: अशू दे, अशू दे. पण मीही तुम्हाया ओयखयं नाही…

इ. वाघमारे: अहो मी लहानपणी कुळथवाडीला होतो. तिथं तुमचा काय दबदबा होता. मी एकदोनदा तुमच्या बैठकींना हजर होतो. तुम्ही फार बदलला नाहीत—वाढत्या वयामुळं जे असेल तेवढंच काय ते.

अप्पासाहेब: हो का? अये वा. बयं वाटयं अशं कुणीतयी ओयखनायं भेटयं म्हणून. आम्ही काय भणंग फकीय. घय नाही दाय नाही. आंदोयन किंवा शमाजकाय्य अशयं की…

मनोहर: त्या धगधगत्या अग्निकुंडात उडी ठरलेली. (अप्पासाहेब चमकतात आणि काहीसे चिडून मनोहरकडे बघतात.) (स्वगत) आयला, हा इन्स्पेक्टरही अप्पाचाच भक्त निघाला. आता हा काय थांग लावणार या प्रकरणाचा?

इ. वाघमारे: (मनोहरकडे वळून) अगदी खरंय्. यांच्यासारखे लोकच समाजाला वेगळं वळण देऊ शकतात.

मनोहर: पण, जग किती लहान आहे नाही?

इ. वाघमारे: हां, हां. (अप्पासाहेबांकडे वळून) तुम्ही म्हणालात की तुमचा कुणावर तरी वहीम आहे म्हणून.

अप्पासाहेब: बयोबय. मया वाटतंय् की एकदा इथं आयेया प्लंबय किंवा मोयकयीण…

इ. वाघमारे: प्लंबय?

मनोहर: अहो ते प्लंबर आणि मोलकरीण म्हणतायत…

इ. वाघमारे: असं होय. मग आपण त्यांची चौकशी करू या. अप्पासाहेबांचं म्हणणं विचारात घेतलंच पाहिजे.

मनोहर: अहो पण ते जो प्लंबर म्हणतायत तो कोण आहे तेच मुळी आम्हाला माहीत नाही. आम्ही घरी नसताना—म्हणजे फक्त अप्पासाहेब आणि त्यांचा एक अनुयायी एवढेच घरी होते. तेव्हा तो आला होता असं त्यांचं म्हणणं आहे. आणि आम्ही तर कुणा प्लंबरला बोलावलंच नव्हतं.

इ. वाघमारे: ओ आय सी. (अप्पासाहेबांकडे वळून) अप्पासाहेब, मला जरा सांगता का की तो प्लंबर साधारणपणे कसा दिसत होता? म्हणजे आम्हाला आमचं रेकॉर्ड पाहून त्याला शोधून काढता येईल. मोलकरणीबद्दल आम्ही साहेबांकडून माहिती घेऊच.

अप्पासाहेब: म्हंजे अशं बघा की तो जयाशा उंच पण थोडाशा ठेंगणा होता. (इ. वाघमारे लिहून घेतात)

इ. वाघमारे: आणि रंग कसा होता?

अप्पासाहेब: तो-तो गोया पण काहीशा शावया होता.

इ. वाघमारे: आणि जाड होता की पातळ—म्हणजे बारीक?

अप्पासाहेब: थोडाशा जाड आणि बायीक पण होता.

इ. वाघमारे: बरं. केस कसे होते?

मनोहर: मी सांगतो. थोडंसं टक्कल आणि भरपूर केस!

इ. वाघमारे: अहो पण तुम्ही त्याला बघितलं नाहीत ना?

मनोहर: पण ह्यांच्या सांगण्यावरून मी अंदाज बांधू शकतो.

अप्पासाहेब: हां शाधायण तशंच.

मनोहर: बघा, काय सांगितलं मी?

इ. वाघमारे: (मनोहरकडे वळून) अहो मला माझं काम करू दे ना. (अप्पासाहेबांकडे वळून) त्याचा वेष कसा होता?

अप्पासाहेब: एवढं नीट यक्ष गेयं नाही पण पँट होती आणि वय शय्ट होता.

इ. वाघमारे: कुठल्या रंगाचा?

अप्पासाहेब: तांबडा किंवा निया अशेल.

मनोहर: (थोडं लांबवर जाऊन स्वगत) आयला काय फेकू आहे हा थेरडा. याच्या वर्णनात बसणारा एकपण माणूस सापडणार नाही अख्ख्या जगात!

अप्पासाहेब: हां. अजून एक यक्षात आयं. एक मयकट टोपी पण होती डोक्यावय…

मनोहर: काय बंडल आहे हा अप्पा. डोक्यावर टोपी होती तर याला केस आणि टक्कल कसं दिसलं? का तो प्लंबर यांच्यासमोर उभा राहून टोपी काढून टकलावरून आणि भरघोस केसांवरून—या दोन्हीवरून—हात फिरवत उभा राहिला होता?

इ. वाघमारे: (लिहिणं बंद करून नोटबुक खिशात ठेवतात) ओके. नमस्कार करतो अप्पासाहेब. (वाकून नमस्कार करतात) सॉरी तुम्हाला त्रास दिल्याबद्दल.

अप्पासाहेब: शॉयी कशाबद्दय? तुमचं कामच आहे चौकशी कयण्याचं.

इ. वाघमारे: (मनोहरकडे वळून) हां आता मी निघतो. माझ्याबरोबर चार पावलं चला बघू. जाताजाता तुमच्या मोलकरणीबद्दल सांगा. (दोघं बरोबर चालत विंगेत जातात)

मनोहर: सखूबाई आमच्याकडे १५-२० वर्षं काम करतायत. वय साधारणपणे… (जातात)

## प्रवेश पंधरावा

(मनोहर पेपर वाचत बसला आहे. केतकी प्रवेशते.)

केतकी: काय म्हणतायत पोलीस?

मनोहर: दुसरं काय म्हणणार? तपास चालू आहे. तरी सुब्बुला फोन केला होता. तोही म्हणाला वेळ लागेल.

केतकी: (मुसमुसू लागते) मला वाटायला लागलंय् की आता माझे ते दागिने आणि कॅश कधीच मिळणार नाहीत.

मनोहर: केतकी, रडू नकोस. नाही मिळाले तर मी तुला पुन्हा घेऊन देईन. मग तर झालं?

केतकी: (स्फुंदत) पण त्या प्रत्येक दागिन्यामागे आणि जमलेल्या कॅशमागे काही भावना निगडित आहेत. त्यांची भरपाई नवीन दागिन्यांनी आणि रकमेनं होईल का?

मनोहर: पण आता त्याला आपण काय करू शकतो? (जवळ जाऊन तिचे डोळे पुसतो आणि जवळ घेतो) केतू, मग आता तूच सांग काय करू या?

केतकी: (रडत) मलाच काही कळेनासं झालंय्. निखिलही नाहीये घरात...

मनोहर: तो आला की आपण पुन्हा जोमानं या बाबतीत काहीतरी करू या.

केतकी: तो येणारे अजून एक आठवड्यानं. मला तर काही सुचतच नाहीये. (अप्पासाहेब प्रवेशतात)

अप्पासाहेब: काय केतकी, तू चिंतेत दिशत्येयश. दागिन्यांबद्दयच कायजी कयत्येयश ना? अग, चिंता कयून काय होणायेय? चिंता हीच माणशाची शय्वात मोठी शत्यू आहे.

मनोहर: अहो, इथं तत्त्वज्ञान सांगून काय उपयोग? संकटाशी सामना कसा करावा यावर आम्ही विचार करतोय्.

अप्पासाहेब: (काहीसं वरमून) ते बयोबय आहे. पण पोयीश तपाश कयतायत ना?

मनोहर: पण त्यांना काहीच धागादोरा सापडत नाहीये.

अप्पासाहेब: चोय चांगयाच हुशाय दिशतोय्.

मनोहर: (अप्पासाहेबांकडे रोखून बघत) हां, चांगलाच हुशार असला पाहिजे हा चोर हे मात्र नक्की.

अप्पासाहेब: (वरमतात) मया नाही वाटत की पोयीश काही कयू शकतीय.

मनोहर: का बयं—आपलं—बरं?

केतकी: (डोळे पुसत) अहो असं काय करताय? अप्पा त्यांचा अंदाज सांगतायत.

अप्पासाहेब: हो. कितीतयी दिवश झाये. तपाश यागया अशता आतापय्यंत तय आये अशते ना शांगायया?

मनोहर: (स्वगत) हा लेकाचा इतका खात्रीनं सांगतोय् की नक्की काहीतरी इंगित असलं पाहिजे यात.

अप्पासाहेब: काय म्हणायात?

मनोहर: नाही, मी म्हणत होतो की ते तपासात कुठल्या तरी टप्प्यावर आले असतील.

अप्पासाहेब: हां, हां. आये अशतीय कदाचित.

केतकी: मला बाई वेड्यासारखंच झालंय्. कशातही मन लागत नाहीये. आपण कुठंतरी लांब जाऊ या का? ट्रिपला?

मनोहर: अप्पासाहेबांना इथंच ठेवून? म्हणजे चोराला निमंत्रणच की.

केतकी: काऽऽऽय?

मनोहर: नाही म्हणजे असं बघ. गेल्या वेळी आपण घर अप्पासाहेबांवर सोडून गेलो होतो तेव्हा चोराचं फावलं की नाही चोरी करायला? आता आपण आणखी काही दिवस गेलो तर त्याला चांगलंच की!

केतकी: पण आता राह्यलंयच काय चोरायला? सगळं तर गेलं.

मनोहर: हां हेही खरंच. पण आपण असं करू या. निखिल आला की आपण जाऊ.

केतकी: ठीक आहे.

मनोहर: मग आता तरी हास बघू केतू.

{पडदा पडतो. पहिला अंक समाप्त}

***

a

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

(स्थळ: रानातील मोकळ्या जागेत राहुट्या उभारलेल्या दिसत आहेत. राहुट्यांमधून मंद प्रकाश येतो आहे. काही अंतरावर निखिल आणि अर्पिता हळूहळू चालत आहेत.)

अर्पिता: निखिल, हे आपण जे करतो आहोत ते खूप थ्रिलिंग आहे. मला तर एखाद्या मिस्टरी थ्रिलर पिक्चरसारखं वाटतंय. अंधारात झाडीतून आपण चाललोय... मग निळसर मंद प्रकाशात धुक्याचे लोट...

निखिल: अहो वेडाबाई—शुद्धीवर या. इथं काही भुताची मिस्टरी आपण सोडवायला आलो नाहीयेत.

अर्पिता: (निखिलचा हात पकडून) ए आपल्याला रस्टिकेट वगैरे तर करणार नाहीत ना?

निखिल: अर्पू, अग असं काय करत्येयस? ही आपली एक्स्ट्रा-करिक्युलर ॲक्टिव्हिटी आहे. त्यांनी आपल्याकडून ऑलरेडी लिहून घेतलंय् की कुठल्याही बाबतीत कॉलेज जबाबदार राहणार नाही. शिवाय सगळ्या गोष्टींना आपणच जबाबदार आहोत असंही आपण लिहून दिलंय्. शिवाय मी प्रोफेसर ताडफळ्यांना कल्पना दिल्येय.

अर्पिता: ओके, ओके. लेट्स गो. मला तर खूप मज्जा वाटत्येय. पण एक सांग, ताडफळे सरांचा तुझ्यावर एवढा विश्वास कसा?

निखिल: अग अर्पू, त्यांच्या हातून एकदा ॲक्सिडंट झाला. त्यावेळी मी तिथून जात होतो. ते खूप घाबरले होते. पोलिस केस होईल आणि नोकरीवर गदा येईल असं त्यांना वाटत होतं. त्यावेळी मी तो दोष माझ्यावर घेतला. मी पोलिसांचे पाय धरले आणि असा अभिनय केला की ते विरघळलेच. मला समज देऊन त्यांनी सोडून दिलं.

अर्पिता: क्या बाऽऽत है. ये है ना मेरा हीरो! (निखिलचा गालगुच्चा घेते), तरीच त्यांनी तुझ्याबर खूष होऊन तुला गॅदरिंगमधे कार्यक्रम करायला सांगितला. आणि मग तेव्हाच तर आपली भेट झाली.

निखिल: बघ म्हणजे आपल्या भेटीमध्ये ताडफळे सर किती महत्त्वाचा दुवा आहेत ते. तर ते म्हणाले की तुम्ही तुमच्या जबाबदारीवर पळून जाणार आहात. दोन दिवसांनी पब्लिक टेलिफोनवरून ते आपल्या दोघांच्या घरी कळवणार आहेत. त्यांचा स्टँड असा राहणार आहे की आपण त्यांच्या नकळत पळून गेलेलो आहोत.

अर्पिता: पण आपल्या घरी… (गाल फुगवून म्हणते) माजा बा नाय ना माला मारायचा?

निखिल: मी माझ्या डॅडींना आधीच असं सांगून ठेवलंय् की कँपचा कंटाळा आला तर जवळपास आम्ही ट्रेकला जाऊ. ते कदाचित् तुझ्या डॅडींशी बोलतील. पण बहुतेक ते फोन करण्याच्या आतच आपण घरी पोचलेले असू.

अर्पिता: हॅलो माय जेम्स बाँड, पण—पण ताडफळे सर दोन दिवसांनी का फोन करणारेत? आधीच का नाही?

निखिल: अग, ते आपल्यासाठी. इथून—या रानामधून फोन कुठून करणार अशी सबब ते सांगणार आहेत. शिवाय मी माझ्या तंबूत चिठ्ठी लिहून ठेवलीय्

की आम्हाला कंटाळा आल्यामुळे आम्ही कँप सोडून एका जवळच्या ट्रेकला चाललोय्.

अर्पिता: पण आपण दोघं बरोबर असणं म्हणजे…

निखिल: आर यू क्रेझी. वुइ आर अबव्ह एटीन. आपल्याला आपली जबाबदारी कळते. आणि हल्ली कॉलेजातली मुलं-मुली पंधरा-पंधरा दिवस एकत्र कुठंतरी जाऊन राहतात—ट्रिपला जातात. आपण तर दोन दिवसात...

अर्पिता: ओके, माय रोमिओ. पण आता काय करायचंय्?

निखिल: ह्या झाडीत मी आधीच बाइक लपवून ठेवलेली आहे. वुइ आर गोइंग टु राइड इट टु अवर डेस्टिनेशन!

अर्पिता: कूल. बाइक राइड! मज्जा येईल नाही?

निखिल: ऑफ कोर्स…

(दोघे झाडीत जातात. मोटरसायकल स्टार्ट केल्याचा आणि नंतर तिचा दूरवर लहान होत जाणारा आवाज ऐकू येतो.)

## प्रवेश दुसरा

(स्थळ: गावाकडच्या सुस्थितीतील घरातील एक खोली. सुदाम वायचळ, निखिल आणि अर्पिता खुर्च्या आणि एक कॉट यावर बसलेले आहेत. मध्येच एक स्टूल.)

सुदाम: ह्ये मातर लई ब्येश केलंत. नायतर आमच्यासारक्यान्ला हुडकीत कोन शेरातून हिकडं येतुय?

निखिल: अहो तसं नाही. आम्ही आमच्या कँपमध्ये इथून जवळच मुक्कामाला होतो. सरांनी दोन दिवस सुट्टी दिली. मग म्हटलं थोडा आजूबाजूचा परिसर पायाखालून घालावा. ही माझी वर्गमैत्रीण अर्पिता. हिला ट्रेकिंगची खूप आवड आहे.

सुदाम: अरे वा. (जरा निरखून पाहतो.)

अर्पिता: नमस्कार. ट्रेकिंग करता करता थोडेफार थकलो होतो. निखिल म्हणाला इथून जवळच कुळथवाडी गाव आहे. तिथं आमच्या ओळखीचे सुदाम वायचळ राहतात. त्यांच्याकडे जाऊन येऊ या. मी म्हटलं बरं. असं आम्ही इथं आलो.

सुदाम: अहो मी अप्पासायेब निखिलच्या वडिलांकडे हायेत म्हून त्यांना भेटाय गेलो त मला बी ठिवून घ्येतलं की त्यांनी दोन दिवस. लई मोट्या मनाचे हायेत ते.

अर्पिता: कोण अप्पासाहेब का?

सुदाम: अप्पासाहेब तर हायेतच... पन फडकेसायेब—निखिलचे वडील त्येबी लई मोट्या दिलाचे हायेत.

अर्पिता: असं असं.

सुदाम: आसं करा. आज रातच्याला हितंच ऱ्हावा की.

निखिल: नको, नको. कशाला उगीच तुम्हाला त्रास.

सुदाम: आसं का? मंग आमीबी तुमाला तरासच दिला तुमच्याकडं ऱ्हायलोवतो तवा आसं म्हनायचंय् का तुमाला?

निखिल: नाही, नाही. तसं नाही...

सुदाम: मंग ठीक हाये तर. ऱ्हावा हितंच आन मंग जा उंद्या सकाळी कुटं जायाचं तकडं.

निखिल: (सुस्कारा सोडीत) चला तर मग ठीकाय्.

सुदाम: मी जरा कायतरी खायाला घिऊन येतो. (आत जातो. आतून आवाज येतो “*आगं पारवती, पावन्यांसाटी काय खायाला घिऊन येतीस न्हवं. बरं बरं मीच घिऊन जातो.*” तोवर निखिल आणि अर्पिता खोली निरखून पाहतात. थोड्या वेळानं आतून ताटल्या आणि ग्लास घेऊन सुदाम येतो.)

निखिल: (एका फ्रेमकडे बोट दाखवीत) तुम्हाला कसला तरी पुरस्कार मिळालेला दिसतोय्.

सुदाम: नाय, ते काय ग्रामपंचायतीनं सत्कार क्येला हुता तवाचा फोटू हाये.

अर्पिता: असं. कसला सत्कार?

सुदाम: आवो इमरजेन्शीमदी आमी आंदोलन क्येलं होतं ना तवा आमाला जेलमदी टाकलं व्हतं. त्याबद्दल माजा आन इतरांचा बी सत्कार केला होता गावकऱ्यांनी.

निखिल: अरे वा.

सुदाम: आपल्याला पेन्शन बी भेटतं की त्याचं राव. आप्पासायबान्ला बी भेटतं पेन्शन—त्यांना तर डबल पेन्शन भेटतं—येक स्वातंत्राच्या अग्निकुंडात उडी घेतली आन जेलमदी गेले म्हून…

निखिल: धगधगत्या अग्निकुंडात.

सुदाम: हा, हा. त्येच त्ये. आन दुसरं इमरजेन्शीमदी पन जेलात गेले हुते त्या येळचं.

निखिल: हां हां. पण हे काय आणलंत?

सुदाम: कायतरी चावायला—आन ह्ये सरबात हाये.

निखिल: सुदामदादा, मी काय म्हणतो…

सुदाम: काय म्हन्ताय?

निखिल: आम्ही—म्हणजे मी तर खूप दमलोय्. आणि दमल्यावर मी थोडं हे घेतो. (मान वाकडी करून अंगठ्यानं दारू पिण्याची खूण करतो.) तर मी थोडी घेतली तर चालेल का?

सुदाम: आरं निखिलभाऊ तुमी लई म्हंजी लईच च्याप्टर म्हना की! हां चालंल की. पन…

निखिल: पण काय?

सुदाम: म्हंजी आमीबी कदी कदी थोडी घ्येतो म्हना की. म्हंजी ह्ये बगा—तुमच्याकडं तिवडी आसंल तर. कारन आमच्या म्हारानी पारूबाई आसलं काय बी घरामंदी ठिऊन द्येत नायी. मंग आमाला पारावर बसून नायतर—

निखिल: म्हणजे तुम्ही पण चांगलेच चॅप्टर म्हणायचे की (टाळी देतो आणि सुदामही प्रतिसाद देऊन टाळी स्वीकारतो.)

सुदाम: आवो आमाला जपुन या गोष्टी कराया लागतात. आता पेन्शन भेटतं ना त्या टायमाला तर अलीकडं आन पलीकडं येकदम दारूबंदी बगा. (जोरात हसतो आणि पुन्हा निखिलला टाळी देतो.)

अर्पिता: (हलकेच) हे तर चॅप्टर काय अख्खं पुस्तकच दिसतायत मला. (मोठ्याने) निखिल, आपण दुसऱ्याच्या घरी आहोत तेव्हा जरा जपूनच.

सुदाम: तशी काय बी काळजी करू नगा. आपलं जेवन झालं की हितंच हातरून घालतो बगा की. मंग झोपताल फाटंपर्यंत मढ्यावानी. (हसतो हाः हाः करून. निखिलही त्याच्या हसण्यात सामील होतो.)

निखिल: (दोघांच्या ग्लासात दारू ओततो) हां घ्या आता. तुम्ही म्हणताय तसं खरंच जेवण झाल्यावर मेल्यासारखी झोप आली पाहिजे.

सुदाम: मंग व्हईलच तसं.

(थोडा काळ दोघं दारू पितात. अर्पिता सरबत पित्येय. स्पॉटलाइट या तिघांवरच. निखिल थोडीशीच घेतो पण सुदामला चांगली पाजतो आणि बोलतं करतो. काही काळ सुदामचं बोलणं मधूनच असंबद्ध होतं तर काही वेळा व्यवस्थित समजेल असं. काही काळ गेल्याचंही सूचित.)

निखिल: अहो त्यांना झोप येत नव्हती म्हणून ते द्राक्षासव घेत होते.

सुदाम: कसलं काय न कसलं काय. तेबी यातलेच प-पन आपला पब्लिकमदला म-मुखवटा सांभाळून. आन आमी—आमी स-समदी आरिजम्यान करायचो.

निखिल: म्हणजे?

सुदाम: (बाटलीकडे बोट दाखवून) म्हंजी ह्ये समदं! आन आप्पासयेब तर डबल पेन्शनवाले देशभक्त. त्ये लीडर आन आमी अनुयायी. (जोरात हसतो. हसण्यात निखिल सामील होतो.)

निखिल: सुदामराव. आपण आता मित्रच झालो की (बाटलीकडे बोट दाखवून) याच्यामुळे. आणखी काय काय गंमत केली ती सांगा की. मग आम्ही पण आमच्या गमती जमती सांगू. तसं गावाकडे बरंच काय काय करता येतं—गाव मुठीत असल्यावर!

सुदाम: मंग आपल्या मुठीत हायेच की गाव. उगीच नाय तीनदा सरपंच झालो.

निखिल: अहो पण काय काय गंमत केली ते सांगा की राव. (सुदामच्या पेल्यात दारू ओततो. सुदाम एका घोटात ती रिचवतो.)

सुदाम: काय काय सांगू? लै गमती केल्यात. ती नोनी—लै टेचात हुती आन त्या इशऱ्याबरुबर लफडं हुतं तिचं. मंग काय आमी समद्यांनी मारला ना चान्स. आप्पासायेब बी होतं की त्यात. (निखिल-अर्पिताची नजरानजर

होते). मंग आला की त्यो इशऱ्या भांडत इचारायला. त्याच्या मायला आस्सा झोडपला की पुन्यांदा नीट हुबाच ऱ्हानार नाय…

(पडद्यावर हळूहळू अंधार)

## प्रवेश तिसरा

(स्थळ आदिवासी पाड्यातील झोपडी. निखिल, अर्पिता, नोनी बसले आहेत. त्यांच्यापुढे मळक्या कपांमध्ये काळा चहा ठेवलेला आहे.)

नोनी: काय सांगायाचं तुमाला. आवं माजं शिक्षान बी चाललं हुतं. तिकडं वडाच्या झाडापलीकडं साळा हुती माजी. आता लई मोटी झालीया. पन तवा येका खोपटामदीच हुती. मीबी लई हुश्यार हुते—म्हंजी येकदम स्कालर नाय बरं का पन गुर्जी म्हनायचे—नोने तू शिकून लई मोटी हुशील बग.

अर्पिता: (नोनीचा हात धरत) मग काय झालं?

नोनी: मंग कसलं काय न कसलं काय? ह्ये समदं इस्कूट झालं आन (मुसमुसू लागते)

निखिल: कसलं इस्कूट?

नोनी: (डोळे पुसत) ह्येच की त्या समद्यांनी मला—मला नाशिवली… (पुन्हा रडू लागते. निखिल आणि अर्पिता तिला सावरायला वेळ देतात.)

अर्पिता: अरे बाप रे!

नोनी: इशऱ्यानं काय बी पाप केलं न्हवतं. त्यो मला बरेच वेळा त्याच्या सायकलवरून मल्ला साळंत सोडायचा आन कदी कदी घरी बी आणून

सोडायचा. पन या समद्यांनी मला तर भोगलीच पन नाव मात्र त्येचं घ्येतलं. (ढसढसा रडू लागते)

अर्पिता: रडू नकोस नोनी. सांग आम्हाला कुणी कुणी काय काय केलं ते. आम्ही तुझी मदत करायला आलो आहोत.

नोनी: (मुसमुसत) अवो इशऱ्यानं कंदी बी मला हातबी लावला न्हवता. आन ही रांडेची मोटी मोटी मान्सं. त्येंनी काय-काय वंगाळ केलं माज्याशी…

निखिल: कुणी कुणी आणि काय काय केलं ते नीट सांगशील तर आम्ही त्या हरामखोरांना पकडू शकतो. तेव्हा नीट सर्व सांग.

नोनी: (स्फुंदत) अवो इतकं काय काय घान घान केलं त्येंनी माज्यासंगट रानात—सर्वी बाजूनी. (हमसाहमशी रडू लागते). काही दिसांनी मी पोटुशी ऱ्हायले. माजं आंग समद्या बाजूनी लई दुकत होतं. मला कायबी कळत न्हवतं काय व्हतंय् ते.

निखिल: असं घृणास्पद कृत्य करणाऱ्यांना शासन झालंच पाहिजे.

अर्पिता: हो ना. आता त्या हलकट, नीच लोकांचा बुरखा फाडल्याशिवाय मी पण स्वस्थ बसणार नाही.

निखिल: नोनी, मग सांग पुढं काय झालं?

नोनी: आवं माज्या आयबापानी तर मलाच रांड ठरवून घराबाहेर काडली. तवापासून मी या म्हाताऱ्या आजीसोबत ऱ्हात्येय. मंग काय दिसांनी माज्या प्वाटामंदी लई दुकाय लागलं. (डोळे पुसते)

अर्पिता: हे सगळं भयंकरच आहे.

नोनी: प्वाटातला जीवबी ग्येला. मला मातुर लई तरास झाला. आता या आजीबरुबर ऱ्हाते न काय पडंल त्ये काम करून चार पैशे कमावते. पन माजा इशऱ्या द्येवमानूस हाये. मला आजूनबी मदत करतो त्यो. समद्यांनी

माला टाकून दिलं वोऽऽ पन ही आजीबाई आन माजा इशऱ्या ह्येच माजे आदार हायेत. तुमाला येक सांगू?

अर्पिता: हो सांग ना.

नोनी: इशऱ्याचं माज्यावर लई—लई…

अर्पिता: लई काय?

नोनी: (डोळे पुसत पण तरी लाजत) लई प-पिरेम हाये!

अर्पिता: आणि तुझं त्याच्यावर?

नोनी: (दोन्ही हातात आपला चेहरा लपवीत) माजा ब-बी त-त्याच्यावर जीव हाय…

निखिल: अर्पू, आपल्याला नोनीला मदत केलीच पाहिजे. आपण अजून माहिती गोळा करू. पण नोनीला डीटेल्स माझ्यासमोर सांगणं अवघड होत असेल तर मी बाहेर जातो. तू तिच्याशी बोलशील?

अर्पिता: ओ येस. सर्टनली. नोनी, तुला मदत करायच्येय् आम्हाला. पण काय काय आणि कसं कसं घडलं ते सगळं नीट तपशीलवार हवंय्. पाहिजे तर मला एकटीला सांग. (नोनीच्या पाठीवरून हात फिरवते)

नोनी: (एकदम बांध फुटून अर्पिताच्या गळयात पडते आणि स्फुंदून स्फुंदून रडू लागते) ताई, ताई. क-कसं सांगू मी त्ये समदं? लई व-वंगाळ हा-हायेत वो ती मान्सं. मला आन तुमालाबी ज-जितं ठिवनार न-न्हाईत ते राकुस. (निखिल बाहेर जातो)

अर्पिता: कुणीही तुला आणि मला काहीही करणार नाहीत. कुठलाही आडपडदा ठेवू नकोस आणि सगळं नीट सांग. त्या सैतानांना शिक्षा होण्यासाठी ते आवश्यकच आहे. (नोनीची पाठ थोपटते. नोनी रडत रडत सांगू लागते. रंगमंचावरील आवाज आणि प्रकाश मंद होत जातो. नोनी आणि

अर्पितामध्ये काही काळ संवाद चालू असताना फक्त दिसतो. मग हळू हळू प्रकाश आणि आवाज तीव्र होतो. निखिल प्रवेशतो)

नोनी: ताई, माज्या डोसक्यात येक आयडिया आलीय्. कुणी दम देनारं आलंच तर मी त्याला सांगेल की गावात शायडी आलेवते आन् चौकशी करत हुते. त्यांनी इचारलं की तुला कसं कळलं तर सांगंल की आजी म्हनत हुती. आजीलाबी तसं पडवून ठेवील मी.

अर्पिता: नोने, नोने. तू खूप हुशार आहेस ग. फक्त अजून थोडी धीट हो. पण ते शायडी म्हणजे?

निखिल: अर्पू, ती धीट आहेच. शायडी म्हणजे सीआयडी!

अर्पिता: ओहो. ग्रेट. (हळूच त्याला चिमटा काढून) आणि तू खराच शायडी आहेस की—सगळ्या मिस्टरीची उकल करणारा.

निखिल: आणि तू शायडीची असिस्टंट...

## प्रवेश चौथा

(रानातील एका टपरीच्या मागची बाजू. छोटीशी पत्र्याची शेडच. जमिनीवर चटई अंथरून इशऱ्या—एक उंच, नाकेला पण बारीक आदिवासी तरुण— व निखिल-अर्पिता बसले आहेत. समोर झाडाला टेकून एक जुनाट सायकल ठेवली आहे.)

निखिल: हे बघ, इशऱ्या, आम्ही तुला मदत करायला आलोय्. आम्हाला माहीत आहे तुला काय काय सहन करावं लागलं आहे ते. आम्हालाही त्याच माणसांकडून त्रास झालेला आहे. त्या सगळ्या हरामखोरांना शिक्षा झाल्यशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.

अर्पिता: मला नोनीनं सगळं सांगितलं आहे. पण आता आम्हाला तुझ्याकडून तुझ्या बाबतीत काय काय घडलं ते ऐकायचंय्.

इशऱ्या: काय करनार तुमी ते आयकून? निस्ता खोपडीला ताप. माज्या समद्या आयुष्याचं वाटुळं केलं त्या हरामजाद्यांनी. आनि—आनि... (हुंदके देऊ लागतो)

निखिल: आणि काय?

इशऱ्या: (उजव्या पायाकडे बोट दाखवून) म-मला फकस्त कायमचा पांगुळा बनवायचं ब-बाकी ठि-ठिवलं बगा त्यांनी.

अर्पिता: काय—काय झालं तुझ्या पायाला, इशऱ्या?

इशऱ्या: त्या-त्या मान्सांनी माजा पायच तोडायचा बाकी ठेवला व्हता. लाठ्याकाठ्यांनी बेदम मारलं हो मला (कळवळतो)

निखिल: अरे बाप रे.

अर्पिता: हे तर फारच वाईट. पण जरा सविस्तर सांगशील का काय काय झालं ते?

इशऱ्या: आ-आता कसं सांगू मी? (निखिल इशऱ्याच्या खांद्यावर हात ठेवून धीर देतो. इशऱ्या हळू हळू बोलायला लागतो. प्रथम या तिघांवर ब्राइट स्पॉटलाइट मग हळूहळू तो मंद होत जातो आणि आवाजही ऐकू येईनासा होतो. मधून मधून निखिल आणि अर्पिता त्याला धीर देताना दिसतात. मग हळू हळू स्पॉटलाइट पुन्हा प्रखर होत जातो व आवाजही मोठा होतो.)

निखिल: हे, हे म्हणजे फारच झालं. ही मंडळी सैतानापेक्षा कमी नाहीत. यांचा बुरखा फाडलाच पाहिजे

a

इशऱ्या: मंग पाड्यावरचे लोक पन घाबरले. त्या समद्यांनी मला वाळीत टाकलं. म्हून मला या पाड्याबाहेर या टपरीत ऱ्हावं लागतंय्. इथंच मंग जंगलात जे काम मिळंल ते करून जगतुय् बगा?

निखिल: आणि ती सायकल?

इशऱ्या: ती येका पायानं कशी-बशी चालिवतो आन् लाकडं, गवत, बोरं जे काय मिळंल ते गोळा करून आन्तो.

अर्पिता: आणि पाय एखाद्या डॉक्टरला का दाखवीत नाही?

इशऱ्या: हां येकदा तालुक्याची गावी गेल्तो तवा डागदरला इचारलं की?

निखिल: मग काय म्हणाले ते?

इशऱ्या: बरा हुईल म्हन्ले त्ये. पन—पन आप्रेशन करावं लागेल म्हनाले.

अर्पिता: मग?

इशऱ्या: मंग काय? लई खर्च यील म्हनाले. त्यो कुटला मला गरिबाला परवडायला. शिवाय माजं कुनीच नाही.

निखिल: असं का म्हणतोस? आम्ही आहोत ना. आम्ही बघू काय करता येईल ते. (इशऱ्या दोघांचे पाय धरतो)

इशऱ्या: लई उपकार व्हतील बगा…

अर्पिता: आणि कुणीच नाही असं कसं म्हणतोस? नोनी… (इशऱ्या लाजतो. जमिनीकडे बघत राहतो)

निखिल: (पुन्हा इशऱ्याच्या पाठीवर हात ठेवतो) पण मग नोनीबद्दल काय?

इशऱ्या: म्हसोबाची आन. माजं तिच्यावर लई पिरेम हाये पन…

अर्पिता: पण काय?

इशऱ्या: ह्ये दुष्ट लोकं आमाला येकत्र यिऊ देनार न्हाईत. आमाला दोगालान्बी पाड्यातल्या लोकांनी वाळीत टाकलंय्. ती आजीकडं आन् मी हितं कसंबसं जगतुय्.
अर्पिता: तू काही काळजी करू नकोस. कुणी तुला दमात घ्यायला लागलं तर एवढंच सांग की गावात सीआयडी फिरतायत.
इशऱ्या: आसं का? मंग समदं ठीक हुईल म्हनता?
निखिल: हो नक्कीच होईल.

## प्रवेश पाचवा

(इन्स्पेक्टर वाघमारे यांचं ऑफिस. त्यांच्यासमोर अर्पिता आणि निखिल बसलेले आहेत. वाघमारे हे सरळ सरळ दुर्लक्ष करताना दिसताहेत.)
निखिल: तुम्ही आमची तक्रार सीरियसली घेत नाही असं आम्हाला स्पष्ट दिसतंय्.
इ. वाघमारे: मग?
अर्पिता: मग काय? हे बरोबर नाही.
इ. वाघमारे: अहो बाई, मी यांच्याशी बोलतोय्. तुम्ही का मधेमधे बोलताय्?
अर्पिता: म्हणजे काय? आम्ही दोघं मिळून कंप्लेंट करतोय्.
इ. वाघमारे: हे बघा, तुम्ही कॉलेजातली मुलं आहात. मी तुमची तक्रार नोंदवून घ्यायला बांधील नाही. शिवाय ज्यांच्याबद्दल तुमची तक्रार आहे ती माणसं चांगली आहेत. मी त्यांना ओळखतो.
निखिल: हं, इथं आपली डाळ शिजेलसं वाटत नाही. चल आपण निघू या.
अर्पिता: आणि?

निखिल: बघू या. दुसरा काही तरी मार्ग शोधला पाहिजे. (वाघमारेंच्या ऑफिसमधून बाहेर येतात. निखिलला डीसीपी सुब्रह्मण्यम असा बोर्ड दिसतो. तो बोर्ड न्याहाळून पाहू लागतो.)

अर्पिता: काय रे, काय झालं?

निखिल: काही नाही, हे सुब्रह्मण्यम साहेब खूप चांगले म्हणून प्रसिद्ध आहेत. आमच्याकडे एकदा आले होते.

अर्पिता: मग काही नाही काय म्हणतोयस?

निखिल: अग अर्पू तसं नाही. पुढं जावं की नाही असा विचार डोक्यात आला— चलबिचल झाली म्हणून…

अर्पिता: आता चलबिचल वगैरे काही नाही. तू येत नसलास तर मी जाते.

निखिल: चल, चल. आपण जाऊ. (दोघे विंगेत जातात. सुब्रह्मण्यम साहेबांचा पीए आणि त्यांचा वाद ऐकू येतो. *साहेबांची अपॉइंटमेंट असल्याशिवाय भेटता येणार नाही; अहो असं कसं; एकदा नाही म्हणून सांगितलं ना; अहो मनोहर फडके त्यांचे चांगले मित्र आहेत—त्यांचा मी मुलगा; असला काही वशिला चालणार नाही—साहेब एकदम स्ट्रिक्ट आहेत. अर्पिताचा आवाज: अहो महत्त्वाचं आहे. आम्ही दोन मिनिटंच घेऊ; नो मीन्स नो. मी तुम्हाला पुढच्या आठवड्याची अपॉइंटमेंट देऊ शकतो.* अर्पिता आणि निखिल निराश होऊन बाहेर म्हणजे रंगमंचावर येतात.)

अर्पिता: आता काय करायचं?

निखिल: काही नाही. पुढच्या आठवड्याची अपॉइंटमेंट घेऊ या. दुसरं काय आहे आपल्या हातात.

अर्पिता: अरे पण तोपर्यंत पार्टीला सुगावा लागेल ना? सावज निसटून जाईल की.

a

निखिल: हो. मला कळतंय् पण काय करू मी तरी? (मागून दक्षिण भारतीय हेलात आवाज येतो: काय पन करू नक्को—डोंट्ट वर्री. निखिल आणि अर्पिता चमकून बघतात तर एक जाडसर पोलिसी पोशाखातील व्यक्तिमत्व—म्हणजेच डीसीपी सुब्रह्मण्यम—पुढं येऊन उभं राहतं.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: तू फाडकेचा मूलगा ना? ऐयम डीसीपी सुब्रह्माण्यम. ऐ लिसंड्ड व्हाट्ट यू वेर सेयिंग. फाडके वाज मै क्लासमेट्ट. बोला तुमचं काय काम हाय ते.

निखिल: सर, ती जरा लांब स्टोरी आहे...

डीसीपी सुब्रह्मण्यम: डोंट काल मी सार. काल मी सुब्बु अंकल. ऐंड हू इस धिस लेड्डी?

निखिल: सर—सॉरी सुब्बु अंकल. ती माझी कॉलेज फ्रेंड आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (निरखून पाहत आणि डोळे मिचकावीत) आल रैट, आल रैट. आपण कान्फ्रंस रूममदी जाऊ. व्हील टाक धेर.

निखिल: पण सर—सुब्बु अंकल, आत्ता लगेच डॅडींना काही बोलू नका. त्यांना सरप्राइज द्यायचंय्. पण एक मोठी गँग तुमच्या हाती लागेल असा आमच्याकडे पुरावा आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: आल रैट. व्हील सी अबौट धॅट.

(तिघे एका दरवाज्यातून आत जातात. आतून बोलण्याचे आवाज येतात पण नीटसं काही प्रेक्षकांना ऐकू येत नाही. मधूनच डीसीपी सुब्रह्मण्यम यांचा ऐ *सी*, ऐ *सी* असा आवाज येतो. मधेच घाबरलेला इ. वाघमारे केबिनमध्ये जातो. डीसीपी सुब्रह्मण्यम यांचा चढलेला आवाज ऐकू येतो—*हौ कैन यू डू लैक धिस? तुम्हाला माझ्याबरोबर यावं लागेल. मी सांगतो तसं करा. अंडस्टैंड?* वाघमारेचा

आवाजः *यस्सर, यस्सर.* वाघमारे बाहेर येतो. काही सेकंदात डीसीपी, निखिल आणि अर्पिता बाहेर येतात.)

निखिलः थँक यू सर—आपलं सुब्बु अंकल. मग आम्ही वाट पाहतो.

डीसीपी सुब्रह्मण्यमः हां, हां. वैट टिल मै बी टुमारो. ऐ विल पर्सानली लुक इंटु धिस. गाड ब्लेइस यू! (दोघांच्या पाठीवरून हात फिरवतात आणि आपल्या केबिनमध्ये जातात.)

निखिलः बघ, क्षणात कसं फिरलं ते. होनी की अनहोनी आणि अनहोनी की होनी! आपलं असं असतं. पेशन्स, बेबी पेशन्स!

अर्पिताः ॲहॅहॅ, ॲहॅहॅ. म्हणे आपलं असं असतं. हुंः. लिसन ड्यूड. मी होते बरोबर म्हणून हे सगळं व्यवस्थित झालं. अ वुमन्स प्रेझेन्स डज इट ऑल. तू निराश झालावतास आणि परत जाण्याच्या गोष्टी करत होतास. माहित्येय?

निखिलः हे बेब! सुब्बु अंकल बाहेर आले ते म्हणजे इट वॉज अ स्ट्रोक ऑफ लक.

अर्पिताः डोंट कॉल मी बेबी ऑर बेब हं. आधीच सांगून ठेवते. अँड लिसन बडी, मी काय म्हटलं होतं, आठवतंय् का तुला?

निखिलः काय?

अर्पिताः (वेडावून दाखवीत) क्वॅय्य!! तुला काय मेमरी लॉस झालाय का? मी म्हणालेवते की तू परत फिरलास तरी मी अशी माघार घेणार नाही आणि डीसीपी साहेबांच्या केबिनमधे घुशीन!

निखिलः (दोन्ही पंजे पुढे करून) ओके, ओके. बाईसाहेब, तुमच्यामुळेच झालं सगळं. माझ्या डॅडींची आणि सुब्बु अंकलची मैत्री केवळ योगायोग. मग तर झालं?

अर्पिता: हं. पण मला बाई किंवा बाईसाहेबही म्हणायचं नाही.

निखिल: कमाल आहे. बेब नाही, बेबी नाही, बाई नाही, बाईसाहेब नाही मग म्हणायचं तरी काय तुला? मॅडम किंवा मॅम चालेल?

अर्पिता: (चिडून पाठ फिरवते) हंः. जसं काही तुला माहीतच नाही. द नेम इज अर्पिता. अजून डोक्यात शिरत नसेल तर—अ-र्पि-ता.

निखिल: (तिच्या खांद्याला पकडून वळवतो) अर्पिऽऽऽता! अर्पूऽऽऽ

अर्पिता: (आनंदून जाते आणि निखिलच्या गळयात हात टाकते) दॅट्स लाइक अ गुड बॉय! चल कुठं तरी जाऊन कॉफी घेऊ या!

(ते जात असताना इ. वाघमारे त्यांना क्रॉस होतो आणि दातओठ खात त्यांच्याकडे पाहत जातो.)

## प्रवेश सहावा

(मनोहरच्या घरातील दिवाणखाना. केतकी, मनोहर बसले आहेत. समोर निखिल उभा.)

केतकी: हां मग सांग मला, तू कँपमधून पळून कुठं गेला होतास? आम्हाला तुझ्या त्या धडफळे सरांचा फोन आल्यापासून आम्ही किती काळजीत पडलो होतो. हो की नाही हो?

मनोहर: हां, हां. कुठं गेला होतास? (दरडावून पण निखिलला डोळा मारत) केवढे काळजीत होतो आम्ही!

केतकी: (मनोहरकडे वळून) मला अशी शंका येत्येय् की तुम्ही त्याला हवं तसं फैलावर घेत नाही आहात.

मनोहर: आं, आपलं ते हे—असं कसं म्हणतेस तू? काय रे निखिल, दे ना उत्तर. आता का बोलत नाहीयेस?

केतकी: तुझी मैत्रीण अर्पिता पण तुझ्याबरोबर होती ना पळून जाताना? कुठं होतात तुम्ही दोन दिवस? काय केलंत?

निखिल: (गडबडून जात) आम्ही—आम्ही ना…

केतकी: आम्ही ना, आम्ही ना काय करतोयस? काही वेडंवाकडं केलं नाहीस ना?

मनोहर: अग, अशी पोलिसांसारखी का उलटतपासणी घेत्येयस? अशानं घाबरून जाऊन तो काही केलं नसलं तरी कबूल करून बसेल हां.

केतकी: उगीच भलत्या वेळी त्याची बाजू घेऊ नका हां—आधीच सांगून ठेवते.

निखिल: अग आई, तू मला दोन दिवसांचा वेळ दे ना. मग—मग…

केतकी: मग काय होणारे?

मनोहर: हां. सिर्फ दो दिनकी मोहलत…

केतकी: हे पाहा, भलते फिल्मी डायलॉग मारू नका. जरा सीरियसली घ्या. उद्या काही प्रकरण अंगाशी आलं ना तर…

मनोहर: अग कसलं प्रकरण अंगाशी येतंय्? हल्ली मुलं-मुली दोन दिवस काय आठ-आठ दहा-दहा दिवस एकत्र राहतात कुठं तरी दूर जाऊन. त्यांना मोकळीक द्यावी लागते हल्ली. आपल्या वेळेसारखं राह्यलं नाहीये. जमाना बदल गया है.

केतकी: परत फिल्मी डायलॉग मारून मुद्द्यापासून दूर जाऊ नका. मला ना—मला त्या अर्पिताची जरा शंका येत्येय्.

मनोहर: कसली शंका?

निखिल: आऽऽई…

a

केतकी: ती अर्पिता सारखी काही तरी कारण काढून येत असते. कधी निरोप द्यायला तर कधी नोट्स द्यायला. आता तर दोन दिवस निखिलबरोबर राह्यल्येय कुठं तरी. तिचा निखिलला गटवण्याचा प्लॅन दिसतोय् मला. निखिल, मला उत्तर पाह्यजे. कुठं गेलावतास दोन दिवस तिच्याबरोबर? कुठं राह्यलावतास?

निखिल: अग आई, खरंच दोन-तीन दिवसात सगळं क्लिअर होईल. जरा थांब ना अशी उतावीळ का होत्येयस? आई प्लीऽऽज…

केतकी: हंः. आईच्या मायेचा असा दुरुपयोग करणारच तू. नेहमी शेवटी आई नावाच्या प्राण्यालाच माघार घ्यावी लागते ना? पण हे बघ, जर तीन दिवसांच्या आत तू म्हणतोस तसं क्लिअर झालं नाही तर मात्र मी डायरेक्ट अर्पिताच्या आई-वडिलांना भेटणार…

मनोहर: त्यांचा सकाळीच फोन आला होता. त्यांना काहीच प्रॉब्लेम नाहीये…

केतकी: पण मला आहे—समजलं? (निखिलकडे वळून) तुझ्या डॅडींचा तुला सपोर्ट असला ना तरी मी तुझे असले खेळ चालू देणार नाही, समजलं? अर्पिताच्या फोटोबद्दल सांगू का? (निखिल कावरा-बावरा होतो. केतकी तणतणत जाते.)

मनोहर: काय रे? कसला फोटो म्हणत होती ती?

निखिल: (ओशाळून जात) काही नाही हो. आम्ही गॅदरिंगमधे एकत्र काम करत होतो तेव्हा फोटो एक्स्चेंज केले होते तेव्हाचा ति-तिचा एक फोटो माझ्याकडे होता. तो—तो तिनं पाह्यला…

मनोहर: हात्तिच्या एवढंच ना?

निखिल: (हायसं वाटून) आं?

मनोहर: इतकंच ना? अरे आम्ही तर पोरींचे फोटो मिळवण्यासाठी तडफडायचो. तुम्हाला लेको काही पण न करता मिळतायत…

निखिल: (एकीकडे) हुश्श!

## प्रवेश सातवा

(मनोहरच्या घरातील पुढची खोली-दिवाणखाना. सकाळची वेळ. सुटीचा दिवस असल्यानं सगळे घरीच आहेत. केतकी आणि मनोहर चहा पीत बसले आहेत. निखिल जवळच पुस्तक घेऊन बसला आहे. दरवाज्यावरची घंटा वाजते. केतकी उठून दरवाज्याकडे जाते. अस्पष्ट संभाषण ऐकू येतं…)

केतकी: क-कोण पाहिजे आपल्याला?

(डीसीपी सुब्रह्मण्यम आणि इ. वाघमारे आत येतात.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: (जोरात हसतो) तुम्हीच पायजेल वयनी…! अहो, मी डीसीपी सुब्रह्मण्यम. ऐ हैड कम्म हियर्र सम डैस ऐगो.

केतकी: (सावरत) हां, हां. या ना. आत या ना.

मनोहर: (उठून उभा राहतो) अरे सुब्बु. सक्काळीच कसा काय आलास? अरे आणि हे इन्स्पेक्टरही आधी इथं आलेले होते.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (इ. वाघमारेकडे पाहून) व्हाट्ट?

इ. वाघमारे: सर, यांच्याकडे एक छोटीशी चोरी झाली होती त्याची चौकशी करायला आलो होतो.

डीसीपी सुब्रह्मण्यम: वोके, वोके.

मनोहर: छोटीशी नाही—बऱ्यापैकी मोठी चोरी होती ती.

डीसीपी सुब्रह्मण्यम: वोके, व्हाग्मरे, डिड यू गेट्ट धी कल्प्रिट्ट?

इ. वाघमारे: नो सर. तपास चालू आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: बट्ट एक्स्पिडैट इट्ट. अंडरस्टँड?

इ. वाघमारे: यस्सर.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (मनोहरकडे वळून) ऐ थाट्ट यू आल मस्ट बी होम्म. ईट ईस हालिड्डे टुड्डे. म्हटलं तुमच्याबरोबर काप्पी घ्यावी. काय वाघमारे?

इ. वाघमारे: (चुळबुळत, अस्वस्थ होत) येस्सर, येस्सर.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (निखिलकडे लक्ष जाऊन) ओहो—यंग बॉय इस हिय्यर.

निखिल: गुड मॉर्निंग सर!

डीसीपी सुब्रह्मण्यम: (चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह) आं?

निखिल: सॉरी, सॉरी—सुब्बु अंकल.

मनोहर: (गोंधळून जात) तुम्ही ओळखता एकमेकांना?

निखिल: डॅड, असं काय करताय? मागं एकदा आले नव्हते का ते आपल्याकडे?

डीसीपी सुब्रह्मण्यम: हां, यस्स. ही थेन व्हेंट औट…

निखिल: आत्ताही मी बाहेरच चाललोय्.

डीसीपी सुब्रह्मण्यम: वोके, वोके. विल मीट्ट लैटर… (निखिल जातो)

मनोहर: मग सुब्बु, कसं काय येणं केलं.

डीसीपी सुब्रह्मण्यम: एस डिसैडेड्ड व्हि व्हिल हॅव काप्पी.

केतकी: हो, हो. आणते ना. (आत जाते.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: मनोहर. माझा काम हाय इथं. ऐ हैव कम्म फार एन इन्क्वैरी.

मनोहर: इनक्वायरी? ती कसली?

डीसीपी सुब्रह्मण्यम: अर्रे, तुझ्याकडे कोण-कोण राहतो?

मनोहर: मी, माझी बायको केतकी आणि मुलगा निखिल. पण इन्क्वायरी कसली?

डीसीपी सुब्रह्मण्यम: आणखी कोण—हू येल्स?

मनोहर: आणखी—आणखी अप्पासाहेब आणि माईसाहेब?

डीसीपी सुब्रह्मण्यम: ह्ये काय रिलेशनमधी आहेत का?

मनोहर: आं, हो—हो. म्हणजे माझ्या रिलेशनमध्ये नाहीत पण केतकीच्या आहेत.

डीसीपी सुब्रह्मण्यम: ओहो—कैंड आफ इन-लास्स...

मनोहर: येस. पण सुब्बु तू मला इन्क्वायरी कसली ती सांगितली नाहीस.

डीसीपी सुब्रह्मण्यम: हां, हां, हां. वोके. व्हागमरे, व्हाट्ट इस्स धी कंप्लेंट्ट—ऐ मीन हू हैस गिवन?

इ. वाघमारे: सर—इशऱ्या.

डीसीपी सुब्रह्मण्यम: हां, हां. इशऱ्या.

मनोहर: ही का-काय भानगड आहे? कोण हा इशऱ्या?

डीसीपी सुब्रह्मण्यम: धेर इस्स नो भान्गड... ऐ मीन यस्स, धेर इस्स भान्गड... टैल मी फाडके, मी मागे आलो होतो तेव्हा... धेर वास्स ऐन वोल्ड मॅन हियर. ही वैंट अवे इम्मिडिएटली...

मनोहर: (आठवून) हां, तेच अप्पासाहेब.

डीसीपी सुब्रह्मण्यम: फाडके, कैन यू काल हिम्म? ऐ वांट टु स्पीक टु हिम्म.

मनोहर: अप्पासाहेब?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स, यस्स. (केतकी कॉफी घेऊन येते.) नौ ऐ व्हिल येनजाय धिस्स काप्पी.

मनोहर: केतकी, अप्पासाहेबांना बोलावतेस का इथे?

केतकी: अप्पासाहेबांना? इथे? (मनोहर कॉफीचा सावकाश घोट घेतो तर सुब्रह्मण्यम फुर्र-फुर्र करून आधाशासारखी कॉफी पीत आहेत.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: नैस काप्पी—आल्मोस्ट लैक इन मॅड्रास्स. हां मला आप्पासाहेबशीच बोलायचाय.

केतकी: पण त्यांच्याशी काय बोलायचंय्?

मनोहर: अग ते मागं म्हणालेवते ना की ते त्यांना पूर्वी कधीतरी भेटलेवते. त्यासंबंधी असेल. जा, त्यांना घेऊन ये. (केतकी जाते)

डीसीपी सुब्रह्मण्यम: फाडके, ऐ व्हिल टैल यू अबौट धिस नौ धैट मिसिस इस्स नाट हियर्र. धेर इस्स ये कंप्लैंट अबौट धिस्स आप्पासाहेब फ्राम—फ्राम धिस्स—व्हाट्ट इस्स धी कंप्लैनंट्स नैम, व्हाग्मरे?

इ. वाघमारे: (त्रासून) इशऱ्या.

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स, इशऱ्या. (केतकी येते.)

केतकी: ते झोपलेत. बरं नाही म्हणतायत.

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हाट्ट? ही इस्स नाट्ट कमिंग? धेन ऐ व्हिल गो ऐंड मीट्ट हिम.

केतकी: थांबा, थांबा. मी परत एकदा विचारते. तुमचं काही तरी अर्जंट दिसतंय्. (घाईघाईनं आत जाते.)

मनोहर: हां तर त्या इश-इशऱ्याचं काय?

डीसीपी सुब्रह्मण्यम: इशऱ्याची आणि अजून एकाची कंप्लैंट्ट आहे—या आप्पासाहेबवर.

मनोहर: कसली कंप्लेंट?

डीसीपी सुब्रह्मण्यम: फाडके, डोंट्ट वर्री. यू व्हिल कम्म टु नो.

(केतकी आणि अप्पासाहेब येतात. अप्पासाहेब लटपटतायत. इ. वाघमारे अप्पासाहेबांच्या पायाला हात लावतात.)

a

डीसीपी सुब्रह्मण्यम: (इ. वाघमारेला उद्देशून) व्हाग्मरे, वाट्ट इस धिस? (इ. वाघमारे वरमतात—सॉरी म्हणतात) (अप्पासाहेबांकडे वळून) नमस्कार, तुमीच आप्पासाहेब ना?

अप्पासाहेब: न-म-श्का-य. मी-मीच अप्पाशाहेब योंढे. काय काम काह्यत मायाकये?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यू नो येन्नीवान काल्ड इशऱ्या?

अप्पासाहेब: आं? काय?

मनोहर: (सावकाशपणे सांगतो) तुम्ही इशऱ्या नावाच्या व्यक्तीला ओळखता का?

अप्पासाहेब: (दूरवर बघत विचार करून) आंहां. नाही.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (इ. वाघमारेकडे वळून) व्हाग्मरे, व्हाट इस्स धि नेम आफ धि आदर पर्सण्ण?

इ. वाघमारे: नोनी—नोनी.

डीसीपी सुब्रह्मण्यम: येंड ये पर्सण्ण—ये गर्ल—काल्ड नोनी?

अप्पासाहेब: (पुन्हा दूरवर बघत विचार करून) आंहां. नाही.

डीसीपी सुब्रह्मण्यम: वोक्के. धेर इस्स ये कंप्लैंट्ट अबौट यू रज्जिस्टर्र्ड्ड बै धिस्स इशऱ्या येंड… (इ. वाघमारेंकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहतो.)

इ. वाघमारे: (त्रासिक स्वरात) नोनी—नोनी.

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स, धीस टू हैव कम्प्लैंड अगैन्स्ट यू—मिस्टर आप्पासाहेब…

अप्पासाहेब: मया काही कयतच नाही—मी या दोघांना ओयखत पण नाही तय…

डीसीपी सुब्रह्मण्यम: बट्ट धेर आर सीरियस्स चार्जेस अगैन्स्ट यू…

अप्पासाहेब: पण मी काय केयंय?

डीसीपी सुब्रह्मण्यम: तुम्ही—यू हॅव रेप्ड येंड कान्स्पाइर्ड टु गँग रेप येन यिनसंट गर्ल. आल्सो यू हॅव बीटन ये यिनसंट बॉय…

मनोहर: ओ माय गॉड! अप्पासाहेब, तुम्ही—तुम्ही…

केतकी: अरे बाप रे! काय भयंकरच ऐकत्येय् मी… (हताश होऊन आणि कपाळावर हात ठेवून सोफ्यावर पडते.)

अप्पासाहेब: हे सगयं खोटं आहे. मया बदनाम कयायचा कुणाचा तयी बेत आहे. काही पुयावा आहे का? मी—मी शाशनानं दिलेल्या ताम्यपटाचा मानकयी आहे. मला शयकाय पेन्शनशुद्धा देतं. मी श्वातंत्यशंग्यामाच्या…

मनोहर: धगधगत्या अग्निकुंडात आहुती दिलेला स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसेवक आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (चमकून मनोहरकडे पाहतात. मनोहर डोळा मारतो तसे ते स्मित करतात.) ओ, इस्स इट्ट? बट्ट व्हि हैव ये स्टेटमेंट्ट फ्राम धी अग्रीव्हड पार्टी.

अप्पासाहेब: अहो साहेब, मया खयंच हे कुणी माहीत नाहीत. कुणीतरी माझ्यावय कपट-कायश्थान केयेय्यं दिशतंय. माझं वय आणि तब्येत अशी खयाब झाय्येय…

मनोहर: (हलकेच) काही नाही झालेलं या म्हाताऱ्याला. उगीच नाटकं करतंय्…

डीसीपी सुब्रह्मण्यम: (विचारात पडतात इ. वाघमारेला कोपऱ्यात घेऊन हलकेच बातचीत करतात.) वोके. ऐ व्हिल्ल गिव्ह यू सम आपर्च्युनिटी टु

रिकूर्परेट्ट. बट्ट बी प्रेस्सेन्ट्ट यिन मै आप्फिस यिन टू डेस...बट्ट डोंट्ट ट्रै येन्नी मिश्चिफ. (मनोहरकडे वळून) ऐ व्हिल्ल मुव नौ. (दोघे दारापाशी जाऊन कुजबुजतात)

डीसीपी सुब्रह्मण्यम: ए फाडके, कीप येन ऐ आन धिस वोल्ड मॅन. ही सीम्स टु मी ये स्लिप्परी गै.

मनोहर: ऑफ कोर्स. डोंट वरी, सुब्बु.

डीसीपी सुब्रह्मण्यम: डोंट अलाउ धिस रास्कल्ला—ऐ एम सार्री—यन्नीव्हेर नियर टेलिफोन्न. टैक क्येर.

इ. वाघमारे: (अप्पासाहेबांकडे वळून हलकेच) अप्पासाहेब, मला माहीत नव्हतं तुम्ही असे असाल. तुमचा शिष्य वायचळ मला तुमच्याबद्दल खूप चांगलं सांगायचा—माझं तिथं जवळच पोस्टिंग होतं तेव्हा. मी एकदा तुमच्या मीटिंगलाही आलो होतो. किती गोड आणि चांगलं बोलला होतात तुम्ही. पण—पण मला तुमची ही बाजू माहीत नव्हती. पण-पण अजूनही मन मानायला तयार होत नाहीये... (अप्पासाहेब दुसरीकडे पाहतात. काहीच बोलत नाहीत.)

मनोहर: ऑल राइट. बाय. (डीसीपी सुब्रह्मण्यम आणि इ. वाघमारे जातात.)

## प्रवेश आठवा

(मनोहरच्या घरातील खोली. अप्पासाहेब मान खाली घालून बसले आहेत. त्यांच्यासमोर केतकी बसली आहे. मनोहर आणि निखिल खुर्च्यांवर बसले आहेत. दूरवर माईसाहेब बसल्या आहेत.)

केतकी: (मुसमुसत, रडत) खरंच का हो असं काही केलंत तुम्ही, अप्पा?
(अप्पासाहेब काहीच न बोलता मान खाली घालूनच बसलेत)

केतकी: सांगा ना अप्पा? तुम्ही—तुम्ही का बोलत नाही आहात?

मनोहर: आता काय बोलायचं राह्यलंय्? तरी मला वाटतच होतं की कुठं तरी पाणी मुरतंय्. ही साउंडेड सो मच फोनी... (निखिल मान डोलावतो)

केतकी: बोला ना अप्पा. तुम्ही नाही बोललात ना तर मी अन्नपाण्याला स्पर्शही करणार नाही. सांगा हे कुणीतरी कुभांड रचलंय्. मला वाटतंय् की कुणीतरी नतद्रष्ट आणि तुमच्या वाइटावर असलेल्या कुणीतरी तुम्हाला गोवलंय्. पण अप्पा, मला तुमच्याच तोंडून ऐकायचंय्.

अप्पासाहेब: केतकी, काय शांगू मी तुया?

मनोहर: हे काय सांगणार? त्यांचं मौनच सगळं सांगून जातंय्. (निखिल अंगठा दाखवून ‘ओके’ असं सुचवतो.)

केतकी: (रडत रडत अप्पासाहेबांचा हात धरते) मला ते सगळं नाही हो खरं वाटत. लहानपणापासून तुमच्याबद्दल जे आम्ही ऐकलंय् आणि पाह्यलंय् त्याच्याशी नाही हो हे जुळत...

(एकाएकी माईसाहेब उठून केतकीकडे येऊ लागतात)

माईसाहेब: (मोठ्या आवाजात) केतकी सोड त्यांचा हात. ते नाही बोलणार काही. मीच सांगते तुला. ऐक!

(माईसाहेब केतकीशेजारी बसतात आणि सांगू लागतात. रंगमंचावर प्रकाश आणि आवाज हे हळूहळू मंद होत जाऊन पूर्ण अंधार आणि शांतता प्रस्थापित होते.)

# प्रवेश नववा

(डीसीपी सुब्रह्मण्यम यांचं ऑफिस. ते आणि अप्पासाहेब समोरासमोर बसले आहेत. शेजारी एका खुर्चीवर इ. वाघमारे बसले आहेत. टेबलावर एक टेपरेकॉर्डर आहे.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: हां मग ऐकलंत ना हे-हे…

इ. वाघमारे: नोनी आणि इशऱ्या…

डीसीपी सुब्रह्मण्यम: तुमच्याबद्दल काय काय म्हणाले… ऐ मीन व्हाट्ट धेर कंप्लैन्ट्ट सेस अबौट यू?

अप्पासाहेब: अहो शायेब. तशं काही नाही. काही तयी गैयशमज झाला अशेल…

डीसीपी सुब्रह्मण्यम: (एकदम आवाज चढवून) इनफ आफ्फ धिस्स… ऐ व्हिल हॅव टु अरेस्ट यू. धेर इस्स येव्हिडन्स्…

अप्पासाहेब: तशं कयू नका हो शायेब. माझ्या वयाकडे बघा. मया आणि माझ्या बायकोया हे अशं शहन नाही व्हायचं.

डीसीपी सुब्रह्मण्यम: मग काय तुमच्यासारख्या गुन्हेगाराला मोकाट सोडायचं? हौ कॅन ऐ लीव्ह यू लैक धॅट? यू हॅव ब्राट्ट शेम टु धी टैटल आफ्फ फ्रीडम फैटर्स. ॲज टु युर वैफ, व्हि व्हिल क्वश्चन हर सेपरेट्टली.

(तितक्यात माईसाहेब प्रवेशतात. अप्पासाहेब डोळे विस्फारून बघतात पण काही बोलत नाहीत.)

माईसाहेब: त्याची काही गरज नाही, साहेब. माझं पण स्टेटमेंट घ्या.

डीसीपी सुब्रह्मण्यम: तुमी कोण्ण? व्हाग्मरे, हू इस्स धिस लेड्डी?

इ. वाघमारे: सर, ती अप्पासाहेबांची बायको—वाइफ आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: स्टेटमेंट कशासाठी?

माईसाहेब: माझी सुद्धा यांच्याबद्दल तक्रार आहे. त्याबद्दल मला स्टेटमेंट द्यायचंय्?

डीसीपी सुब्रह्मण्यम: ऐ यम्म कन्फ्यूस्ड. स्टेटमेंट आर्र कंप्लैंट्ट?

माईसाहेब: काय वाट्टेल ते म्हणा. पण माझं स्टेटमेंट घ्या.

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हाग्मरे, यू रैट डौन व्हाट्टेव्हर शी इस्स सेयिंग—व्हिल्ल डिसैड लेट्टर व्हाट्ट टु डू विथ इट्ट.

इ. वाघमारे: यस्सर.

माईसाहेब: मी अप्पासाहेब लोंढे यांची पत्नी असले तरी त्यांनी मला आणि माझ्या कुटुंबियांना फसवून माझ्याशी लग्न केलं आहे. मोठ्या जमीन-जुमल्याचे मालक आहेत असं सांगून फसवलं. खरं ती जमीन त्यांच्या चुलत भावाची होती. तो भाऊ अगदी गरीब स्वभावाचा असल्यानं त्यानं यांच्यावर विश्वास ठेवला. भावाच्या भोळेपणाचा गैरफायदा घेऊन यांनी जमीन आपल्या नावावर करून घेतली. लुबाडलेल्या संपत्तीचा वापर करून हे गावचे लीडर झाले. चळवळीत भाग घेऊन नेते झाले. भाऊ वेडा झाला. त्याच्या बायकोलाही यांनी सोडली नाही.

अप्पासाहेब: का—का त्या जुन्या गोष्टी उकयून काढत्येयश. आपयी अब्यू चव्हाट्यावय टांगायची का हौश आय्ये तुया?

माईसाहेब: तुमच्याएवढा पाताळयंत्री माणूस मी आजवर पाह्यला नाहीय्. हे मी जे आज करत्येय् ते खूप पूर्वीच करायला हवं होतं, पण धैर्य झालं नाही.

इ. वाघमारे: अप्पासाहेब, मधे मधे बोलू नका. मला त्या काय म्हणतायत ते रेकॉर्ड करू दे. सरकारी कामात अडथळा आणू नका.

माईसाहेब: पुढे भावानं आत्महत्या केली. यांच्यावर संशय आला तेव्हा हे चळवळीचा फायदा घेऊन भूमिगत झाले. मी भावजयीला जमीन देऊन टाकली. मी कष्टानं संसार कसाबसा चालवला आणि मुलाला शिक्षण दिलं. मला कुणाचाच आधार नव्हता. मुलगा शिकून मोठा झाल्यावर अमेरिकेला निघून गेला. त्यानं वडिलांची कृष्णकृत्यं समजल्यावर त्यांच्याशी संबंध तोडून टाकले. मलाही तिकडे चलण्यासाठी अनेकदा विनवलं. तेव्हा त्याचं ऐकलं असतं तर बरं झालं असतं असं आता वाटतं.

इ. वाघमारे: अरे बाप रे. आणि आम्ही यांना काय समजत होतो… (डीसीपी सुब्रह्मण्यम डोळे वटारतात त्यासरशी इ. वाघमारे लिहून घेऊ लागतो.)

माईसाहेब: सगळं शांत झाल्यावर हे आले गावाकडे. पण आता जमीन नव्हती काहीच नव्हतं. सगळा संसार उघड्यावरच होता असं म्हटलं तरी चालेल. शिवाय काही गावकऱ्यांना यांच्याबद्दल संशय यायला लागला होता म्हणून मला बरोबर घेऊन हे समाजाचा उद्धार करण्याच्या नावाखाली गावोगाव हिंडू लागले. सुरुवातीला मला वाटलं की खरोखरीच जुनं सगळं विसरून हे समाजकार्य करू इच्छितात. पण हळूहळू यांचे धंदे माझ्या लक्षात यायला लागले. गावातल्या महत्त्वाच्या पण लबाड लोकांना हाताशी धरून कुणाकडून पाहुणचार घे तर कुणाला लुबाड. पोरीबाळींशी संबंध ठेवणे इतकंच काय पण भागीदारीत चोऱ्या करून पैसा जमा करणे हा देखील यांचा व्यवसायच झाला. पेन्शन घ्यायची वेळ झाली की काही दिवस साळसुदासारखे वागायचे. उगीच कुणी तक्रार नको करायला. कुणाच्या डोळ्यावर नको यायला.

इ. वाघमारे: म्ह-म्हणजे ते मिसेस फडक्यांचे चोरीला गेलेले दागिने…

माईसाहेब: (अप्पासाहेबांकडे हात करून) तर काय—यांचा पार्टनर तो सुदाम्या… त्याला धरा. सगळा माल मिळेल. (अप्पासाहेब हताश नजरेनं आळीपाळीनं इ. वाघमारे आणि डीसीपी सुब्रह्मण्यम यांच्याकडे बघत राहतात.)

इ. वाघमारे: (डीसीपी सुब्रह्मण्यम यांच्याकडे वळून) सर, मी यांना प्रश्न विचारू का?

डीसीपी सुब्रह्मण्यम: ओ यस्स. वै नाट्ट—इफ इट्ट ह्येल्प्स धि कैस…

इ. वाघमारे: मॅडम, मग तुम्ही तेव्हा पोलिसांकडे का नाही गेलात—आय मीन—आलात?

माईसाहेब: एक तर माझ्याकडे पुरावे नव्हते आणि दुसरं म्हणजे मी कुठं जाणार हा प्रश्न मला भेडसावत होता. त्यामुळे मी वेड्यासारखी मनाविरुद्ध यांच्याबरोबर चिकटून राहिले.

इ. वाघमारे: आता हे तुमचे पती…

माईसाहेब: एक मिनिट. मी आत्ता या क्षणी यांच्या आणि माझ्या नात्याचा त्याग करीत आहे. (गळ्यातील मंगळसूत्र काढून टेबलावर ठेवतात आणि कपाळावरचं कुंकू पुसून टाकतात. (डीसीपी सुब्रह्मण्यम व इ. वाघमारे चकित होतात तर अप्पासाहेब आ वासून पाहतच राहतात.) जे मी खूप आधीच करायला हवं होतं ते मी आत्ता करत्येय्. तेव्हा भीती होती की कुठं जायचं; कसं होईल आपलं अशी. पण आता तशी भीती वाटत नाही. मी कुठंही राहीन—अगदी रस्त्यावर सुद्धा राहीन—पण या पापाचं ओझं माझ्या खांद्यांवर नको.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (वाघमारेकडे वळून) ऐ डोंट थिंक्क धेट ला टैक्स काग्निझन्स आफ सच डिसओनिंग. बट्ट यू टैक डौन आल व्हाट्ट शी

a

इस्स सेयिंग.

माईसाहेब: माझ्या लक्षात आलं तुम्हाला काय म्हणायचंय् ते. पण माझ्या बाजूनं यांचा माझा काही संबंध नाही हे मी स्पष्ट करत्येय्. हां, आणि इतके दिवस त्यांच्याबरोबर या सगळ्या प्रकरणांत मी सामील होते असा निष्कर्ष निघत असेल तर मी त्याबद्दलची शिक्षाही भोगायला तयार आहे. (डीसीपी सुब्रह्मण्यम व इ. वाघमारे एकमेकांकडे पाहतच राहतात.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: ऐ ऐडमैर धिस ब्रेव्ह उमन…

अप्पासाहेब: माई, तुम्ही फाय कठोय बोययात. श्वातंत्ययज्ञाच्या धगधगत्या…

माईसाहेब: दांभिकपणा आता तरी सोडून द्या. स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात नव्हे तर यांच्या लोभाच्या आणि वासनेच्या अग्निकुंडात अनेक निष्पाप जिवांची आहुती नक्की पडलेली आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: आल रैट, इफ धी स्टेटमेंट इस्स वोव्हर, लेट्ट धि लेड्डी गो.

इ. वाघमारे: मॅडम, जर तुमचं स्टेटमेंट संपलं असेल तर त्यावर सही करा आणि मग तुम्ही जाऊ शकता.

माईसाहेब: म्हणजे, तुम्ही मला पण अटक नाही करणार?

इ. वाघमारे: कशाबद्दल?

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हाट्ट फार्र?

माईसाहेब: अहो मी अप्पांच्या गुन्ह्यात सहभागी झाले नाही का?

(डीसीपी सुब्रह्मण्यम व इ. वाघमारे एकमेकांकडे काही क्षण पाहत राहतात)

इ. वाघमारे: अहो मॅडम, तुमच्याविरुद्ध कुणाची तक्रार नाहीये. आम्ही उगीचच अशी अटक नाही करू शकत. (अप्पासाहेबांकडे पाहत) शिवाय या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्याशिवाय आम्ही कसं तुम्हाला दोषी धरू?

a

डीसीपी सुब्रह्मण्यम: (कौतुकानं इ.वाघमाऱ्यांकडे पाहत) वेल सेड्ड, वेल सेड्ड

माईसाहेब: पण मी आता कुठं जाऊ? मला राहायला आता ठिकाणच नाहीये.

इ. वाघमारे: का? फडके साहेबांकडे राहू शकत नाही का तुम्ही?

माईसाहेब: अहो मी तिथं कशी राहू? मी तिथं अप्पांची बायको म्हणून राहत होते. आता मी अप्पांची बायको नाही. शिवाय अप्पा तिथं पाहुणे म्हणून राहत होते म्हणून मी पण राहत होते. आता ते तिथं नाहीत तर मी कशी आगंतुकासारखी तिथं राहू?

इ. वाघमारे: एक मिनिट, मॅडम. तुम्ही अजूनही अप्पांची बायकोच आहात.

माईसाहेब: ते कसं काय? मी आत्ता काही वेळापूर्वीच नाही का जाहीर केलं की मी आता त्यांची बायको नाही म्हणून!

इ. वाघमारे: अहो पण नुसतं तुम्ही म्हणून चालत नाही. कायद्यानं तुम्हाला घटस्फोट दिलाय् का? (डीसीपी सुब्रह्मण्यम कौतुकानं इ. वाघमाऱ्यांकडे पाहतात. माईसाहेब हताश होऊन इकडं-तिकडं पाहू लागतात.)

माईसाहेब: (डीसीपी सुब्रह्मण्यम यांच्याकडे पाहत) सर, आपण काही तरी करा ना? मी इतकं सगळं झाल्यावर फडक्यांकडे नाही जाऊ शकत.

(डीसीपी सुब्रह्मण्यम विचारात पडतात. मग काही वेळानं फोन उचलतात आणि एक नंबर फिरवून फोनमध्ये काहीतरी बोलतात. फक्त *कैन यू मॅनेज... ये रिक्वेस्ट्ट... आल* रैट एवढंच ऐकू येतं.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: तुमी फाडक्यांच्या कडेच ऱ्हावा. ऐ स्पोक विथ्थ फाडके जस्ट नौ. फाडकेस फॅमिली विल्ल वेल्ल्कम यू. धे डोंट्ट हॅव येन्नी प्राब्लेम्म विथ्थ यू.

माईसाहेब: पण मी कशी जाणार? मला तोंड दाखवायला तरी जागा...

(डीसीपी सुब्रह्मण्यम आणि इ. वाघमारे एकमेकांशी कुजबुजतात.)

इ. वाघमारे: (माईसाहेबांकडे वळून) साहेब आत्ताच फडकेसाहेबांशी बोलले. त्यांनी इथं घडलेलं सगळं त्यांना सांगितलं. फडकेसाहेब आणि त्यांच्या घरातल्यांना तुमच्या धैर्याचं कौतुक वाटतंय्. तुम्ही त्यांचाकडेच राहावं असा त्यांचा आग्रह आहे. आमचं असं म्हणणं आहे की तुम्ही तिथं काही दिवस राहा. त्यातून तुम्हाला नंतर तिथं राहू नये असं वाटलंच तर साहेब तुमची सोय एखाद्या वृद्धाश्रमात करतील.

माईसाहेब: खरंच का फडके असं म्हणाले?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स. इन फॅक्ट फाडके इस्स प्रौड आफ्फ यू. मी सांगतो—तुम्ही तिथे जावा.

इ. वाघमारे: आणि तुम्हाला जायची गरजच नाही. फडकेसाहेबच तुम्हाला न्यायला इथं येणारेत.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (अप्पासाहेबांकडे बोट दाखवीत) व्हाग्मरे, पुट्ट धिस रास्कल्ला इंट्टु कस्टडी.

अप्पासाहेब: साहेब, नका ना मया कोठडीत टाकू. माय्या वयाकडे पाहा. मी केलेलं काय्य पाहा. याष्ट्र आणि समाजकायणाच्या धगधगत्या…

इ. वाघमारे: अग्निकुंडात कुणाकुणाच्या आहुत्या दिल्यात तुम्ही? तुमच्या बोलण्यामुळे प्रभावित होऊन मी देखील तुम्हाला खराखुरा देशभक्त समजत होतो. पण तुमचा बुरखा आता फाडला गेलेला आहे आणि तुमचं खरं रूप आम्हाला कळून चुकलेलं आहे. तुमच्या वयाचा विचार करायला सांगताय् तुम्ही? तुम्ही त्या कोवळ्या मुलीच्या वयाचा आणि असहायतेचा विचार केलात का? इशाऱ्याच्या वयाचा विचार केलात का?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यू डिड्ड येव्हरीथिंग्ग बॅड. व्हि हॅव स्ट्रांग येव्हिडन्स यगेन्स्ट यू. यू विल फेस जैल टर्म्म… (माईसाहेब रडू लागतात.)

इ. वाघमारे: (अप्पासाहेबांना घेऊन जाऊ लागतात. पण थबकतात कारण मनोहर येतो.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हेल्कम, फाडके.

मनोहर: (माईसाहेबांच्या पाठीवरून हात फिरवतो) चला माईसाहेब, मी तुम्हाला न्यायला आलोय्. अजिबात संकोच करू नका. आमच्याकडेच राहा—अगदी कायमच्याच. (माईसाहेब उठतात.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: वैल डन्न, फाडके. ऐ रियल्ली येप्रिशियेट इट्ट.

मनोहर: (एक पुडकं टेबलावर ठेवतो) थँक यू, सुब्बु.

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हाट्ट इस्स धिस्स?

मनोहर: हे द्राक्षासव आहे. (इ. वाघमारे पुढे होतात आणि पुडकं उचलतात.)

इ. वाघमारे: सर, हे खूप चांगलं असतं. आयुर्वेदिक टॉनिक. यानं थकवा दूर होतो आणि अशक्तपणा जातो…

डीसीपी सुब्रह्मण्यम: (चढ्या आवाजात) व्हाग्मरे!

इ. वाघमारे: सॉरी सर.

मनोहर: पण हे मी (अप्पासाहेबांकडे बोट दाखवतो) यांच्याकरता आणलंय्. आमच्याकडे ते नेहमी घेत असत. यामुळे त्यांना चांगली झोप लागते. आणि—आणि इथं कोठडीत तर त्यांना याची जास्तच गरज आहे.

(अप्पासाहेबांची मान खाली जाते. इ. वाघमारे आणि डीसीपी सुब्रह्मण्यम यांच्या चेहऱ्यावर स्मित. मनोहर माईसाहेबांना हाताशी धरून नेऊ लागतो.)

a

# प्रवेश दहावा

(मनोहरच्या घरातील खोली. मनोहर आणि निखिल बसले आहेत.)

मनोहर: तुझा कँप, नंतरची तुझी अर्पिताबरोबरची ट्रिप आणि घरातलं अप्पासाहेबाचं नाट्य हे सगळं संपलंय्. आता फक्त पुढे शिकायचं असलं तर त्याचा विचार कर. अर्थात् अजून रिझल्ट लागायचाय्. पुढे शिकायचं नसलं तर नोकरी धर आणि मग… (एक मोठा पॉझ घेतो)

निखिल: मग काय?

मनोहर: मग चांगली नोकरी आणि त्यानंतर तुझी ती मैत्रिण आहे ना…

निखिल: डॅऽऽऽड…

मनोहर: डॅऽऽऽड काय? आहे ना तुझी ती मैत्रिण. आणि कँपमधून पळून ट्रेकवर गेलावततात ना दोघं?

निखिल: हो, पण…

मनोहर: पण काय?

निखिल: खरं सांगायचं तर—तर आम्ही ट्रेकला गेलोच नव्हतो.

मनोहर: अरे, बाप रे. म्हणजे?

निखिल: डॅड, आम्ही कुळथवाडीला गेलो होतो.

मनोहर: कुळथवाडीला? हे कुठलं गाव काढलंस?

निखिल: डॅड, आपल्याकडे अप्पासाहेबांचा अनुयायी आला होता ना—सुदाम वायचळ म्हणून…

मनोहर: मग?

निखिल: अहो तो कुळथवाडीचा आहे असं त्यानंच सांगितलं नव्हतं का?

मनोहर: पण मग तू कशाला गेलावतास तिथं?

निखिल: अहो, मला संशय होता की या अप्पासाहेबांचं आणि सुदामचं काही तरी गूळपीठ आहे.

मनोहर: ओ, धिस इज गेटिंग इंटरेस्टिंग! मग काय केलंत तुम्ही तिथं?

निखिल: आम्ही चातुर्यानं सुदामकडून अनेक गोष्टी काढून घेतल्या, त्या रेकॉर्ड केल्या.

मनोहर: अरे वा, फारच चांगलं केलंत.

निखिल: तुम्हाला आठवत असेल की सुदाम म्हणत होता—एका मुलानं तिथल्या एका मुलीला फसवलं आणि त्याचा आळ अप्पासाहेबांवर आला म्हणून?

मनोहर: हां, हां. आठवतंय् ना.

निखिल: मला अशी शंका होती की हे काहीसं चोराच्या उलट्या बोंबासारखं प्रकरण असावं.

मनोहर: मग तू त्याचा शोध घेतलास वाटतं?

निखिल: येस्स. आणि मला वाटत होतं—म्हणजे मी अर्पितालाही सगळं सांगून तिचं मत विचारलं. आणि तिलाही माझ्यासारखंच वाटत होतं. आम्ही इशऱ्या—त्या मुलाचा आणि नोनी या मुलीचा शोध घेतला. त्यांच्याकडून खरं काय ते कळलं.

मनोहर: काय कळलं?

निखिल: ओ माय गॉड! अजूनही ती घटना आठवली की अंगावर शहारे येतात.

मनोहर: पण काय झालंवतं?

निखिल: डॅड, या-या सगळ्या गँगनं मिळून त्या शाळकरी मुलीवर—नोनीवर गँग रेप केला…

मनोहर: कुठली गँग?

निखिल: अहो, अप्पासाहेब, सुदाम आणि तिथली काही गुंड माणसं.

मनोहर: अरे बाप रे.

निखिल: अर्पिता बरोबर होती म्हणून ठीक. नोनीनं तिला सगळं व्यवस्थित सांगितलं—जे जे घडलं ते सर्व.

मनोहर: ग्रेट जॉब डन बाय यू बोथ—अर्पितानं सुद्धा चांगलंच काम केलं.

निखिल: डॅड, इशऱ्या—म्हणजे तो मुलगा ज्याच्यावर या गँगनं उलटा आरोप केला तो—अन् नोनी हे दोघंही इतके घाबरले होते की ते सगळं सांगायला पण घाबरत होते. इशऱ्याचा तर पायच मोडून ठेवला या हरामखोरांनी आणि नोनी आणि इशऱ्याला गावात जगणं असह्य करून टाकलं. कसंबसं गावाबाहेर जगत होते. आम्ही खूप समजूत घालून त्यांना बोलतं केलं. सुदाम दारूच्या नशेत जे आम्हाला सांगत होता ते तसंच नोनी आणि इशऱ्याचं सगळं म्हणणं आम्ही व्यवस्थित रेकॉर्ड करून घेतलं.

मनोहर: अरे वा! मग आता ते आपल्या डीसीपी सुब्रह्मण्यमला देऊन टाका. म्हणजे या हलकट लोकांना कायमचा धडा शिकवता येईल.

निखिल: डॅऽऽऽड...

मनोहर: काय?

निखिल: हे आम्ही सगळं करून मगच घरी आलो. म्हणून तर अप्पासाहेबांना अरेस्ट केलंय्.

मनोहर: म्हणजे—म्हणजे तुम्ही सुब्बुला पुरावा दिलात?

निखिल: येस. खरं सांगायचं तर इशऱ्या आणि नोनी इतके घाबरले होते की ते तक्रार द्यायला तयारच नव्हते. खूप मार बसेल—कदाचित् ही गँग ठारही मारायला कमी करणार नाही असं त्यांना वाटत होतं.

मनोहर: बरोबरच आहे.

निखिल: मग आम्ही सांगितलं की तुम्हाला पोलिस प्रोटेक्शन मिळेल. तुम्ही शहरात या म्हणजे तुम्हाला सुरक्षित वाटेल. शिवाय इशऱ्याचा पायही बरा करता येईल आणि त्यांच्या शिक्षणाचंही बघता येईल.

मनोहर: ओहो. मग तुम्ही सुब्बुला भेटलात…

निखिल: छे. ते इतकं सोपं नव्हतं. इन्स्पेक्टर वाघमारे आमची तक्रारच लिहून घेत नव्हता. लकीली आम्हाला सुब्बु अंकल भेटले आणि मग पुढचं काम सोपं झालं.

मनोहर: अरे या कोवळ्या वयात तुम्ही एवढं छान काम केलंयत की बास्स. या समाजकारणाच्या धगधगत्या अग्निकुंडात…

निखिल: पुरे, पुरे. तसलं वर्णन नको. कसल्या अग्निकुंडाच्या बाता करतायत ही मंडळी? खरं सांगायचं तर या हरामखोर गँगलाच धगधगत्या अग्निकुंडात ढकलून द्यायला पाहिजे.

मनोहर: त्यापेक्षा एक चांगली आयडिया आहे…

निखिल: काय?

मनोहर: छे, छे. तशानं ते स्वर्गात पोचतील. यांच्या कुंडी—कुंडीलाच (कुंडी शब्दावर जोर देतो) अग्नीनं चटके दिले पाहिजेत.

# प्रवेश अकरावा

(मनोहरच्या घरातील खोली. केतकी रडत बसली आहे. मनोहर आणि निखिल तिचं सांत्वन करीत आहेत.)

मनोहर: केतकी, रडून काय उपयोग. करावे तसे भरावे या नात्यानं अप्पासाहेब त्यांच्या पापाचं प्रायश्चित्त भोगताहेत—भोगतील.

केतकी: (स्फुंदत) का असं केलंत अप्पा तुम्ही? लहानपणापासून आम्ही तुमच्याकडे एक-एक आदर्श व्यक्ती म्हणून पाहत होतो. काय मिळालं तुम्हाला त्या क्षणिक सुखानं? आमच्या—माझ्या विश्वासावर पाणी फेरलंत तुम्ही. तुमच्या स्वार्थत्यागाच्या गोष्टी ऐकून आम्ही लहानाचे मोठे झालो… काय करून बसलात तुम्ही हे?

निखिल: आई, तू रडू नकोस. जे व्हायचं ते होऊन गेलं आहे.

मनोहर: केतकी, तुला मी आधीच सांगत होतो की हे काही खरे समाजसेवक आणि देशभक्त नाहीयेत. ते फ्रॉड आहेत म्हणून. पण तुझा माझ्यापेक्षा त्यांच्यावर जास्त विश्वास होता.

केतकी: हं. पण ते देशभक्त नव्हते असं तरी म्हणू नका. त्यांनी घरादाराचा त्याग करून…

मनोहर: देशभक्त मी म्हणणारच नाही पण तू जे घरादाराचा त्याग वगैरे म्हणत्येयस ना, तेच, तेच मीही म्हणतोय्.

केतकी: (डोळे पुसत आश्चर्यानं) म्हणजे?

मनोहर: म्हणजे, घरादाराचा त्याग करून आणि स्वतःच निर्माण केलेल्या जबाबदाऱ्या टाळून—दुसऱ्यावर ढकलून देऊन—परागंदा झालेल्याला मी तरी देशभक्त म्हणणार नाही. खऱ्या देशभक्त तर (माईसाहेब हळूहळू

खोलीत येतात. मनोहर त्यांच्याकडे बोट दाखवतो) या आहेत. (केतकी चमकून बघते)

केतकी: माईसाहेब?

मनोहर: होय, माईसाहेब. संसाराला उद्ध्वस्त करून अप्पासाहेब चालते झाले तेव्हा यांनीच कष्ट करून संसार सांभाळला. अप्पासाहेबांनी फसवून काबीज केलेली जमीन दिराला परत केली आणि अप्पासाहेब परत आल्यावर सर्व विसरून पुन्हा त्यांच्याबरोबर राहिल्या—सर्व प्रकारचे अन्याय सहन करीत—समोर चाललेली पापं, अप्पासाहेबांचे सहस्र अपराध मुकाट्यानं गिळून—सगळं सहन करीत राहिल्या. शेवटी अप्पासाहेबांच्या दुष्कृत्यांचा घडा भरल्यावर त्यांच्याविरुद्ध जबानी दिली ती यांनी. खऱ्या देशभक्त या माईसाहेब आहेत!

माईसाहेब: नाही हो मनोहर. मी उगीचच सहन करीत राहिले. पाप, अन्याय घडत असताना गप्प राहिले. हे चुकलंच माझं. तेव्हाच उघड करायला पाहिजे होतं सगळं. पण धैर्य झालं नाही. गप्प राहून मी त्या अन्यायाला खत-पाणीच देत राहिले ना?

मनोहर: पण माईसाहेब, तुमचा काळ वेगळा होता. त्या काळी तुम्ही आवाज उठवला असतात तरी काही साध्य झालं नसतं. शिवाय ज्या परिस्थितीत तुम्ही मुलाला वाढवलंत, दिरावरचा अन्याय दूर केलात ते सगळं मोठंच काम नव्हतं का?

केतकी: (मनोहरकडे वळून) हे सगळं तुम्हाला कसं कळलं?

मनोहर: मला सुब्बुनं सांगितलं.

माईसाहेब: पण अजूनही मला कळत नाहीये की मी तेव्हा आणि आत्ता जे केलं ते बरोबर की चूक.

मनोहर: अन्यायाविरुद्ध लढणं हे केव्हाही बरोबरच असतं!

निखिल: खरंच. विश्वास बसत नाही की माईसाहेब कशा जगल्या असतील त्या कठीण काळात. आणि नंतरचं सगळं सहन करण्याकरता केवढी मनाची ताकद लागली असेल.

माईसाहेब: केतकी, तुला तुझे अप्पा ऐकून आणि काही काळ पाहून माहीत आहेत. मी तर त्यांच्याबरोबर वर्षानुवर्षं संसार केला आहे—फरपटले गेले आहे. आणि तरीही मनाचा हिय्या करून मी त्यांच्याविरुद्ध उभी राहिले. आणि तू इथं आसवं गाळत बसल्येस्. माझ्याकडे पाहा. भावना बाजूला ठेव आणि धैर्यानं सामोरं जायला शीक.

केतकी: (माईसाहेबांच्या जवळ जाऊन त्यांचा हात हातात घेते) खरंच. माई, तुम्ही मला जीवनाकडे पाहायचा नवा दृष्टिकोन दिलात. (माईसाहेब आपल्या पदरानं तिचे डोळे पुसतात.)

माईसाहेब: हां, आणखी एक गोष्ट. मला कृपा करून माईसाहेब म्हणू नका. केतकी जसं मला 'माई' म्हणते तसं तुम्ही सगळे माईच म्हणा. म्हणजेच त्या अग्निकुंडाच्या धुरानं काळ्या झालेल्या आठवणी पुसता येतील.

निखिल: माई, तुम्ही आमच्याकडेच राहा आता—कायमच्याच.

माईसाहेब: अरे, कशाला? माझी काहीतरी सोय करणारेत सुब्रह्मण्यम साहेब. तोपर्यंत मी आहेच की इथं.

मनोहर: तरी पण आम्हाला अभिमान वाटेल की माईसारखी थोर व्यक्ती आमच्या कुटुंबाचाच एक भाग आहे म्हणून.

केतकी: हो, हो. माई इथंच राहा तुम्ही.

# प्रवेश बारावा

(मनोहरच्या घरातील पुढची खोली. मनोहर, निखिल, केतकी आणि माईसाहेब चहा घेत बसलेले आहेत.)

मनोहर: चला आता निखिलच्या रिझल्टची वाट पाहायची. तो मार्गी लागला की आपल्या डोक्यावरचं ओझं कमी होईल.

केतकी: पण निखिलला पुढं शिकायचं असेल तर?

निखिल: आई, मी निश्चय केलाय्.

केतकी: कसला निश्चय?

निखिल: लागलीच जॉब करायचा—बऱ्यापैकी पॅकेजचा. काही वर्षं नोकरी करायची. आणि मग…

केतकी: (संशयानं बघत) मग काय?

निखिल: मग नोकरी सोडून समाजकार्याला वाहून घ्यायचं—कुणाला तरी सोबतीला घेऊन.

मनोहर: (डोळे मिचकावीत) हं, आलं लक्षात!

केतकी: काय आलं लक्षात?

मनोहर: कुणाला तरी बरोबर घेऊन म्हणजे—

निखिल: डॅड!

केतकी: कोण ती अर्पिता का? अरे पण ती अजून लहान आहे. तिचं शिक्षण पण व्हायचंय्.

निखिल: आई, पण काही वर्षं माझी नोकरी झाल्यावर तिचं शिक्षण संपलेलं असेलच ना…

केतकी: तरी पण मी म्हणते…

मनोहर: तू काही म्हणू नकोस. त्यांनी ठरवलेलंच आहे!

केतकी: निखिल!

निखिल: होय, आई.

केतकी: पण—ती समाजसेवा नको हं! आधीच काय झालंय् इथं अन्…

मनोहर: पण—पण या दोघांनीच तर हे—हे सगळं हुडकून काढलं.

केतकी: काय हुडकून काढलं?

मनोहर: अप्पासाहेबांची सगळी कृत्यं—शिवाय सुदामनं आणि त्यांनी चोरलेले दागिने या सगळ्याचा शोध निखिल-अर्पिता जोडीनंच तर लावला.

केतकी: काऽऽऽऽय? निखिल आणि अर्पिता या दोघांनी? आणि तुम्ही कुणी मला सांगितलं नाहीत!

मनोहर: एक तर तू अप्पासाहेबांच्या भक्तीमध्ये आकंठ बुडलेली होतीस. शिवाय मलाही उशिराच कळलं. त्यातून तुझा सगळ्यांनाच—म्हणजे अप्पासाहेबांना सोडून हं—विरोध करत होतीस. तेव्हा तुला असलं काही पचलं नसतं.

निखिल: आणि—आणि तुझा आमच्या मैत्रीला आधीपासूनच विरोध होता…

केतकी: नाही रे, नाही राजा. तुझ्या अभ्यासाची काळजी होती ना म्हणून.

निखिल: हो, हो. या काळजीपोटीच तू त्या दोघांची—सुदाम आणि अप्पासाहेबांची—माझ्या खोलीत सोय केलीस ना?

केतकी: चुकलं रे माझं, निखिल. आता हेच बघ ना—अप्पासाहेबांना मी लहानपणापासूनच पाहात आल्येय् ना पण माझं जजमेंट चुकलंच की.

निखिल: पण आता तरी सांग की माझा प्लॅन तुला कसा वाटतोय्?

केतकी: अरे, तुला ज्यात आनंद आहे ते तू कर… तुला घर-संसार सांभाळून समाजसेवा करायची असेल तर खुशाल कर. हाती घेतलेल्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून मनाजोगतं हवं ते कर!

मनोहर: दॅट्स लाइक अ गुड वुमन!

माईसाहेब: अरे, खरंच समाजातली जळमटं काढणारं समाजकार्य केलंत ना तुम्ही तर माझे आशीर्वाद आहेत तुम्हाला.

निखिल: (माईसाहेबांना वाकून नमस्कार करतो) थँक्यू, माईसाहेब.

(दारावरची बेल वाजते. निखिल दार उघडतो.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: आर्रे वा, वा. आवर यंग हीरो इस्स हियर. (केतकी कौतुकानं पाहते.)

मनोहर: वेलकम, सुब्बु.

निखिल: वेलकम, सुब्बु अंकल. (सगळे मनसोक्त हसतात)

डीसीपी सुब्रह्मण्यम: वोक्के, फाडके, ऐ हॅव कम्म टु टेक्क मिसिस मा-माईसाहेब.

मनोहर: व्हॉट? त्या आता इथंच राहणार आहेत.

केतकी: त्यांना पण इथंच राह्यचंय्. त्यांना वृद्धाश्रमात राहायचं नसेल—आमच्या इथंच राहायचं असेल तर? आम्ही माईंना जाऊच देणार नाही.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (जोरात हसतात) नो, नो, नो. शी कांट्ट स्टेई हियर.

मनोहर: बट व्हाय? तो त्यांचा चॉइस आहे.

डीसीपी सुब्रह्मण्यम: वै ऐ विल्ल टेल्ल यू. हर सण्ण हैस्स कम्म फ्राम्म इस्टेट्स.

मनोहर: सो? तो भेटू शकतो इथं त्यांना.

डीसीपी सुब्रह्मण्यम: नो, नो. ही वांट्ट्स टु मीट हर यँड्ड टेक हर टु इस्टेट्स.

मनोहर: मला काही समजत नाही…

केतकी: हे काय चाललंय्? माईसाहेबांना का विचारत नाहीयेत हे?

माईसाहेब: खरंच सुदेश इथं आलाय्?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स मॅम. बट्ट ही इस्स इन्न बाँबे. ही डझंट नो धिस्स सिट्टी वेल्ल. वि हॅव मेड अरेंजमेंट्स टु टेक्क मॅम टु बाँबे.

माईसाहेब: (हुंदके देत) मी जाते साहेबांबरोबर. किती वर्षांनी सुदेश भेटणारे. पण मला त्याच्याबरोबर अमेरिकेला नाही जायचं.

डीसीपी सुब्रह्मण्यम: बट्ट हर सण्ण हैस मेड्ड अरेंजमेंट्स टु टेक हर टु इस्टेट्स…

मनोहर: पण ते कसं काय शक्य आहे? माईसाहेबांचा पासपोर्ट…

डीसीपी सुब्रह्मण्यम: वि हैव हेल्प्ड्ड हिम्म टु आर्गनैझ दि पासपोर्ट. ही हैज आलरेडी यप्प्लैड फार व्हिसा…

निखिल: काय गंमत आहे. काही वेळा पोलिसांच्या मदतीनं फटाफट कामं होतात. नाहीतर आम्हाला महिनोन् महिने रखडत बसावं लागतं.

डीसीपी सुब्रह्मण्यम: (हसून) यिफ धेर इस्स अ काझ वि विल्ल आलवेस हेल्प. ऐ विल्ल हेल्प यू टू सण्ण व्हेण्ण इट्ट कम्स्स टु इट्ट.

मनोहर: (हात वर करीत) सुब्बु व्हॉट कॅन आय डू? माईसाहेबही राजी असतील तर घेऊन जा त्यांना. पण त्यांची काळजी घ्या.

डीसीपी सुब्रह्मण्यम: नो प्राब्लिम्म. वि विल्ल टेक येव्वरी क्येर.

(माईसाहेब सामान आणण्यासाठी आत जातात.)

## प्रवेश तेरावा:

(मनोहरच्या घरातील दिवाणखाना. मनोहर वाचत बसला आहे. केतकी आत-बाहेर करीत आहे. निखिल जवळच एक इंग्रजी पुस्तक चाळत बसला आहे.)

निखिल: कंटाळा आला आता. कधी जॉइन व्हायचंय् तेच कळत नाहीये.

मनोहर: कंटाळा कशानं यायला लागला. चांगलं वाचतोयस की ते पुस्तक.

निखिल: हॅः, रटाळ आहे हे पुस्तक. घरात बसून कंटाळा आलाय्. माईसाहेब अमेरिकेला गेल्यापासून तर आणखीनच बोर झालंय्.

मनोहर: का माईसाहेबांचं काय एवढं विशेष?

निखिल: डॅड, त्या मला त्यांच्या आयुष्यातले खूप अनुभव सांगायच्या. महत्त्वाचं म्हणजे—हे भोंदू सामाजिक कार्यकर्ते ज्या काय भानगडी करतात त्या त्यांनी जवळून पाहिल्यायत. ते ऐकून मला माझ्या भविष्यातल्या कामाची दिशा समजली.

मनोहर: हं.

केतकी: (तेवढ्यात आत येते) अजून सामाजिक कार्याचं वेड आहेच वाटतं?

निखिल: नुसतंच नाही तर अजून भक्कम झालंय्. (सगळे हसतात. निखिल बाहेर जाण्यासाठी दरवाज्याकडे जातो आणि लागलीच परत येतो.)

मनोहर: (चेष्टेनं) हे काय बाहेर जाण्याचाही कंटाळा आला का?

निखिल: डॅड! अहो आपल्याला कुणी भेटायला आलेत.

मनोहर: कोण?

निखिल: इशऱ्या आणि नोनी.

मनोहर: कोऽऽण?

केतकी: (प्रवेश करीत) आता कोण आलं बाई-आणि ही कसली विचित्र नावं? तुझ्या मित्र-मैत्रिणींपैकी दिसतायत,आणि ही कसली त्यांची निक-नेम्स?

निखिल: मित्र-मैत्रिण—बरोबर. पण निक-नेम्स नाहीत. ही त्यांची खरी नावं आहेत. (दरवाज्याकडे वळून) अरे या ना, या आत. लाजू नका घर आपलंच आहे. (इशऱ्या व नोनी समोर येतात. इशऱ्या लंगडत येतो. दोघांच्या गळ्यात पिशवी आहे)

इशऱ्या व नोनी: (मनोहर आणि केतकी यांच्याकडे वळून) नमस्कार, भाऊसाहेब आनि आईसाहेब.

केतकी: (अवघडून) न-म-स्का-र.

मनोहर: नमस्कार, नमस्कार.

निखिल: (सोफ्याकडे बोट दाखवून) अरे बसा ना.

इशऱ्या: आसू दे. हितंच हुबं बरं आहे.

निखिल: अरे, लाजू नका—दोघंही बसा बघू इथं सोफ्यावर. (धरून सोफ्यावर बसवतो. दोघंही अंग चोरून बसतात. मनोहर आणि केतकी प्रश्नार्थक मुद्रेनं बघत राहतात.)

निखिल: इशऱ्या, पाय कसा आहे.

इशऱ्या: बरा आहे—बराच म्हनायचा की.

मनोहर: (खाकरून लक्ष वेधून घेतो) अंऽऽ

निखिल: डॅड, आई, हे इशऱ्या आणि नोनी. दोघंही जांभुळवाडी नावाच्या दुर्गम खेड्यात राहतात.

केतकी: बरं मग? तुझ्या ओळखीचे कसे काय झाले?

निखिल: आई, या दोघांच्यावरच तो सुदाम वायचळ आणि त्याच्या गँगनं अत्याचार केले. बिचाऱ्या इशऱ्याचा पायच मोडला त्या हलकट माणसांनी. आणि—आणि नोनी... हिच्यावर—हिच्यावर... आता कसं सांगू? मी आणि अर्पितानी मिळून यांच्याकडून सगळं वदवून

घेतलं—रेकॉर्ड केलं आणि सुब्बु अंकलना नेऊन दिलं. आता त्या सगळ्यांना शिक्षा होत्येय्.

मनोहर: आणि या सगळ्या गोष्टींच्या सूत्रधारालाही—होय ना?

निखिल: होय. पण इशऱ्या आणि नोनी, तुम्ही इथं कसे आलात?

नोनी: त्या—त्या माईसायेब हायेत ना त्यांनी पोलिसांना सांगून आम्हाला बोलावून घेतलं. माईसायेबांचा मुलगा खुटं लांबवर आसतुय. त्यांनीच आमा दोगांच्या शिक्शनाची आन् इसऱ्याच्या आप्रेशनसाटी मदत केल्लीय. त्यांनीच तुमचा पत्ता आमाला दिला. तुमी सांगितलेल्या पोलिस सायबांनीच मदत केली आनि आमाला ऱ्हायला वसतिगृह आनि स्कालरशिपबी मिळवून दिली.

निखिल: अरे वा. म्हणजे तुम्ही मार्गाला लागलात म्हणायचं की.

इशऱ्या: पन निखिलभाऊ, तुमचे आनि आरपितातांईचे लै उपकार हायेत आम्हा दोघांवर. त्येच सांगाय आमी हिकडं आलुय्.

निखिल: अरे, आमचे कसले उपकार? आम्ही आमच्या मनाला जे योग्य वाटलं ते केलं. तुमच्यावर सुदाम आणि इतरांनी केलेले अत्याचार आम्हाला सहन झाले नाहीत म्हणून आम्ही हे सगळं केलं.

इशऱ्या: पन आता त्यो हैवान सुदाम आनि त्याचे गुंड कायतरी गडबड करनार नाहीत ना?

निखिल: नाही, नाही. ते काही करू शकणार नाहीत, हे शहर आहे. पण इशऱ्या तुझा पाय कधीपर्यंत ठीक होईल?

इशऱ्या: डाक्टर म्हनत्यात की आजून दोन-तीन म्हैने लागतील. पन आता खूपच बरं आहे. थोड्या आधारानं चालता येतंय् की. डाक्टर म्हनाले की आप्रेशननंतर वेवस्थित चालता यील.

मनोहर: अरे, वा. चांगलीच प्रगती आहे की.

केतकी: थांबा, मी चहा घेऊन येते.

नोनी: (ओशाळून) नको, नको. तुमाला उगीच तरास…

केतकी: त्यात कसला आलाय् त्रास? बसा आरामशीर तुम्ही. मी आलेच. (कौतुकानं निखिलकडे पाहत पाहत जाते)

मनोहर: मग आता काय करायचं ठरवलंय्?

इशऱ्या: मी धावी पूर्ण करनारे आन मंग येक बागकामाचा कोर्स करनारे. तेच्या नंतर काम करता करता त्याच इषयामदी फुडं शिकनाराय्.

मनोहर: वा: छान, छान. आणि तू नो-नो…

निखिल: नोनी—नोनी!

मनोहर: हां, हां नोनी. नोनी, तू काय करणार आहेस?

नोनी: मीबी धावी पास करनार आदी आनि मंग… मंग…

मनोहर: मग पुढं काय?

नोनी: (काहीशी लाजत) मंग मी कायतरी चित्तरकलेमदी शिकनारे.

मनोहर: चित्रकलेची आवड आहे वाटतं?

नोनी: (खाली बघत) हा, हा.

इशऱ्या: आवो तिला लै चांगली कला आवगत हाये. नोने, दाकीव की…

नोनी: (इशऱ्याकडे बघून किंचितसं वेडावीत) आन् तूबी दाकीव की त्यान्ला काय आनलंयस ते…

मनोहर: (निखिल आणि मनोहर दोघेही हसतात) नो-नोनी, काय आणलंयस दाखवायला?

नोनी: (परत काहीशी लाजत) खरं म्हंजी दाकवाया नाय पन द्यायालाच आनलंय्. म्हाईत नाय की तुमाला आवडंल की नाय ते!

a

इशऱ्या: (चिडवीत) आता बास कर की तुजं पुरान आन् दाकव... (नोनी खांद्यावरच्या शबनम पिशवीतून कागदचं एक भेंडोळं काढते आणि हळू हळू मनोहरच्या पुढे उलगडते)

मनोहर: अरे, वा. सुंदरच आहे की हे चित्र. (निखिलसमोर चित्र अशा रीतीनं धरतो की ते प्रेक्षकांनाही दिसेल असं. आदिवासी स्टाइलनं काढलेलं डोक्यावर टोपली घेऊन जाणाऱ्या बाईचं ते चित्र आहे.)

निखिल: वा, फारच सुंदर. अगदी फ्रेम करून भिंतीवर लावावं इतकं छान आहे.

नोनी: हां. आवडलं ना? तुमच्याकरताच आनलंय् ते.

मनोहर: हां, हां. पण आम्ही ते भिंतीवर लावायला विकत घेणार तुझ्याकडून...

निखिल: अगदी बरोबर.

नोनी: नाय पन ते तुमाला देन्याकरता आनलंय्. मी त्याचे पैशे नाय घेनार.

इशऱ्या: बरुबर हाय त्ये. भेटवस्तू म्हून आनल्येय् ती इकत कशी देनार? मीबी तुमच्याकरता रानचा मेवा आनलाय्. (पिशवीतून कागदात बांधलेला रानमेवा निखिलला देतो)

निखिल: (पुडक्यातील मेवा पाहतो) मला आवडतो हा मेवा... ही करवंदं, ही जांभळं, रायआवळे, आवळे. इशऱ्या, थँक यू. (इशऱ्या बघतच राहतो पण त्याच्या चेहऱ्यावर समाधान)

मनोहर: ठीक आहे. मग मी असं करतो की हे चित्र भेट म्हणून स्वीकारतो. पण माझ्यासाठी अजून एक चित्र काढण्यासाठी आणि ते विकत घेण्यासाठी मी नोनीला पैसे देणार. आहे का मंजूर?

नोनी: आता काय म्हननार मी? पन कसलं चित्र काडून हवंय तुमाला?

मनोहर: तुला आवडेल त्या विषयावर काढ. (आत जातो)

नोनी: (इशऱ्याकडे वळून) इशऱ्या, आता काय करायचं?

इशऱ्या: आता काय करायचं? भाऊसायेबांना पायजे तर तुला काडावंच लागंल.

नोनी: ते ठीक हाये पन पैशे? मी कशे घेनार उपकार करनाऱ्यान्कडून?

इशऱ्या: भाऊसायेब द्येत्यात—आन् ते बी तुजं चित्र इकत घेन्यासाटी—तर तुला ते पैशे घ्यावेच लागतील.

नोनी: हा. मंग तसंच करावं लागंल.

(केतकी चहा घेऊन येते. सर्वांच्या हातात कप देते. इशऱ्या आणि नोनी लाजत-काजत चहा पिऊ लागतात. मनोहर येतो आणि एक नोट नोनीच्या हातावर ठेवतो.)

मनोहर: आता मला चित्र काढून द्यायचं, बरं का, नोनी?

नोनी: हा. (पैशांकडे पाहते आणि चक्रावून जाते) पन—पन येवडे पैशे. आवो ह्ये लै व्हतात...

मनोहर: असू देत. ती तुझ्या कलेची किंमत आहे. घे, घे. (नोनी नाइलाजानं पिशवीत टाकते) आणि यापुढं कुठलीही अवघड परिस्थिती आली तर आमच्याकडे यायचं आणि न लाजता आमच्याकडून मदत घ्यायची, काय? इशऱ्या, नोनी—तुम्हा दोघांकरता सांगतोय् मी. (इशऱ्या आणि नोनी मान डोलावतात)

केतकी: मी पण तुम्हा दोघांना एक गोष्ट सांगते—तुमचं शिक्षण पूर्ण होऊन तुम्ही कमवायला लागल्याशिवाय एकमेकांच्या जवळ जायचं नाही? काय?

इशऱ्या: हो, हो. आमी वेगवेगळ्या होस्टेलला ऱ्हातो आन् तसं काय बी वंगाळ करनार नाय, आमचं पिरेम आसलं तरी. आनि... आनि...

केतकी: आणि काय?

इशऱ्या: त्या पोलीससायबांनी बी सांगितलंय् की काय बी भानगड क्येली तर मला येकदम आतच टाकनार. त्यामुळं आमी सांबाळूनच ऱ्हानार. बरं

निगतो आमी. (मनोहर आणि केतकी यांना पायाला हात लावून नमस्कार करतात)

मनोहर आणि केतकी: ठीक आहे. यशस्वी व्हा आणि या कधीही. तुमचंच घर आहे असं समजा. (इशऱ्या आणि नोनी जातात.)

केतकी: हां, मग ठीक आहे. निखिल, तू खरंच चांगलं काम केलंयस.

निखिल: काय सांगत्येयस काय तू आई? खरंच?

केतकी: अगदी खर्रं...

निखिल: म्हणजे, माझ्या आणि अर्पिताच्या प्लॅनला तुझी मंजुरी आहे तर...

मनोहर: येस्, बट कंडिशन्स अप्लाय...

निखिल: व्हॉट कंडिशन्स?

केतकी: मघाशी इशऱ्या आणि नोनीला सांगितल्या त्याच कंडिशन्स!!

(तिघेही हसतात.)

## प्रवेश चौदावा

(डीसीपी सुब्रह्मण्यमचं ऑफिस. नेहमीचा गलबला चालू आहे. इ. वाघमारे काही तरी लिहीत बसला आहे. ट्रेमधलं एक पाकीट उघडून पाहतो आणि त्याचा चेहरा आनंदानं चमकून जातो.)

इ. वाघमारे: प्रमोशन? इ. वाघमारे, क्या बात है? सायबांना भेटलंच पायजे— आणि आभार मानले पायजेत.

(ताडकन् उठून डीसीपी सुब्रह्मण्यम यांच्यासमोर जाऊन उभा राहतो. कडक सॅल्यूट ठोकतो.)

डीसीपी सुब्रह्मण्यम: येस्स, व्हाग्मरे?

इ. वाघमारे: सर, थँक्स फॉर द प्रमोशन.

डीसीपी सुब्रह्मण्यम: ओ नो. यू डिसर्व इट्ट. व्हाग्मरे, तुला माहित्येय का तुला कशामुळे प्रमोशन मिळाला ते?

इ. वाघमारे: नो सर.

डीसीपी सुब्रह्मण्यम: इट्स बिकास आफ धि आप्पासायेब लोंढे केस. खरा सांगायचा तर—बिकास आफ फाडके. निखिल फाडके…

इ. वाघमारे: निखिल फडके?

डीसीपी सुब्रह्मण्यम: यस्स. निखिल गेव्ह यू धि प्रूफ येन्ड यू इन्वेस्टिगेटेड आल्दो यू वेर अगैन्स्टिट फर्ष्ट... बट्ट लैट्टर यू डिड्ड ये गुड्ड जाब. सो इट्ट इस बिकास आफ निखिल फाडके, सीणियर इन्स्पेक्टर व्हाग्मरे…

सी.इ. वाघमारे: थँक यू सर. (पुन्हा कडक सॅल्यूट ठोकतो.) निखिल फडके... नाही फाडके... तुमने तो छप्पर 'फाडके' दिया!!

डीसीपी सुब्रह्मण्यम: व्हाट्ट?

सी.इ. वाघमारे: नथिंग सर…

**(पडदा पडतो)**

—समाप्त—



व्यवसायाने अभियंता असलेले श्रीनिवास शारंगपाणी संशोधक / लेखक आहेत. त्यांच्या मराठी / इंग्रजी कादंबऱ्या, मराठी कथासंग्रह इत्यादी साहित्य प्रसिद्ध झालेले असून त्यांनी इंग्रजी-मराठी नाटकेही लिहिली आहेत. त्यांच्या काही नाटकांचे किंवा नाटकांच्या रूपांतरणाचे रंगमंचीय तसेच नभोवाणीवर श्राव्य माध्यमांत सादरीकरण झाले आहे . श्रीनिवास शारंगपाणी यांनी सहा मराठी नाटके आणि दोन इंग्रजी नाटके लिहिली आहेत. काही नाटके ई-साहित्यने प्रकाशित केली आहेत. ‘अग्निकुंड’ हे सामाजिक नाटक कृतक स्वातंत्र्यसैनिक व्यक्ती समाजाची कशी फसवणूक करतात आणि त्याचे परिणाम काय होतात ते दाखवते. प्रामाणिक समाजसेवक आणि मानभावी व दांभिक नेते यांच्यातील फरक सामान्य माणसाला कळावा हाच या नाटकाचा मूळ हेतू आहे.